# ब्राह्मणांतील बेकारी

## ( तिचीं कारणें व उपाय )

आतांचे ब्राह्मणीं काय केलें । अ

आतां तरी ब्राह्मणीं आपणाला

SHRI.CHA.PRATAPSINH
MAHARAJ (THORALE)
NAGAR WACHNALAYA, SATARA.
087373

लेखक

विश्वनाथ गणेश पटवर्धन,

बी. ए. एलएल. बी.

मूल्य ८ आणे.

शके [illegible] ईसवी सन १९३४

प्रकाशक :
वि. ग. पटवर्धन,
आजरा. ( ज० इंचलकरंजी )

[ सर्व हक्क लेखकाचे स्वाधीन ]

मुद्रक :
कृ० ह० सहस्रबुद्धे,
श्रीज्ञानेश्वर प्रेस, कोल्हापूर.

नगर वाचनालय सातारा
संगणकीकृत

माझी परमपूज्य,

प्रेमळ, अपत्यवत्सल, जन्मदात्री मातु:श्री

**कै० सौ० सरस्वतीबाई गणेश पटवर्धन**

(मृत्यु मार्गशीर्ष शु० ७ शके १८३५)

हिच्या

पुण्यस्मृतिमूर्तींच्या चरणीं

नम्रभावें समर्पण.

पिता जरि विटे, विटो; न जननी कुपुत्रीं विटे ;
दयामृतरसार्द्रधी न कुलकज्जलें त्या किटे; ।
प्रसादपट झांकिती परि परा गुरूंचे थिटे;
म्हणून म्हणती भले ' न ऋण जन्मदेचें फिटे ' ॥ १ ॥

नगर वाचनालय, सातारा

# अनुक्रमणिका


दोन अवस्था ( चित्र )

आत्मनिवेदन

प्रस्तावना (लेखक–श्रीमंत नारायणराव बाबासाहेब घोरपडे)

प्रकरण १ लें—जागतिक बेकारीः कारणें व उपाय.........१

,, २ रें—ब्राह्मणांतील बेकारीः कारणें व उपाय... ...१३

,, ३ रें—ब्राह्मणांच्या बेकारीवर रामबाण उपाय......४०

,, ४ थें—उपसंहार... ... ... ... ...९९

परिशिष्ट प्रकरण... ... ... ... ... ...११०

( १ ) ब्राह्मण स्त्रिया आणि बेकारी

( २ ) पारशी व बेकारी

( ३ ) बेकारी व प्रचलित शिक्षण यांवरील थोर व विद्वान लोकांचे त्यांच्याच शब्दांत अभिप्राय


---

**सूचनाः**—संयुक्त प्रांतांतील "फैजाबाद शेतकी वसाहत योजना" व बंगाल व बिहारमधील मध्यम वर्गांतील बेकारी निवारक योजना याबद्दल कोणी माहिती मागितल्यास आनंदानें पाठवूं. छपाईचा खर्च अंदाजाबाहेर बराच वाढल्यामुळें फैझाबाद योजना वगैरे मजकूर परिशिष्ट प्रकरणांतील नाखुषीनें गाळावा लागला तो ठेविला असता तर पुस्तकाची किंमत वाढवावी लागती पण शक्य तितकी कमी ठेवण्याचा हेतु साधला नसता.

# आत्मनिवेदन

बेकारीचें पिशाच्च भेसुर
पिंगा घालित हिंडे जगभर।
नाचवितें कोलीत घरोघर
तांडव बघुनी जीव दडपतो ॥

— काव्यविहारी.

"But why so vehement, so unyielding, so severe; because, the cause and the times demand vehemance. An immense iceberg larger and more impenetrable than any which floats in the Arctic Ocean is to be dissolved and a little heat is not only pardonable but absolutely necessary. How then ought I to feel and speak and write in view of a system which is red with innocent blood? My soul should be, as it were, on fire, I should lighten. I should thunder. I will not waste my strength in foolishly endeavouring to beat down the Bastille with a feather."

—**W. L. Garrison**

(Greatest American Idealist who championed the cause of the Negro Slaves in U. S. A.)

बेकारीचें भेसुर पिशाच्च जगभर पिंगा घालित आहे, तसेंच महाराष्ट्रांतही घालत आहे. त्यांतल्यात्यांत ब्राह्मणाच्या घरांत हें पिशाच्च कोलीत चांगलीच नाचवीत आहे. तथापि आश्चर्याची व त्याबरोबरच दुःखाची गोष्ट ही कीं, ब्राह्मण समाज अगदीं बेफिकीर आहे. या आळशी

अजगर वृत्तीच्या कुंभकर्णी समाजास शब्दरूपी बॉंबगोळे फेंकून जागृत करण्याकरितां एखादा गॅरिसनच येथें जन्मास यावयास पाहिजे; त्याशिवाय जागृति होणार नाहीं. चाळीस वर्षांपूर्वी महाभाग प्रिन्सिपाल गोळे यांनीं या समाजाची झांपड जावी म्हणून "ब्राह्मण आणि त्यांची विद्या" हा पुस्तकरूपी नगारा वाजविला. पण त्याचा कांहींच उपयोग झालेला दिसत नाहीं. उलट या समाजाचे दुर्गुण वाढतच आहेत. तेव्हां आमच्यासारख्यांचा तिथें पाड काय ? शिवाय कोणीकडे बेकारीसारखा गंभीर व अवघड विषय आणि कोणीकडे आमची अल्पमति ! तथापि या बाबत कोणीच कांहींच चर्चा करीत नाहींत व ब्राह्मण जातीचा नाश टाळण्याकरितां उपायचिंतनही चालल्याचें आढळत नाहीं. सबब जात-गंगेचें कांहीं ऋण फेडावें या हेतूनें व "अकरणान्मंदकरणं श्रेयः।" या न्यायानें आम्हीं हा प्रयत्न केला आहे. खरें पाहूं गेलें तर प्रो. वा. गो. काळे, प्रि. लिमये, प्रि. गाडगीळ, प्रि. भाटे 'अस्पृष्टांचा प्रश्न' कर्ते माटे मास्तर यांनीं अगर 'केसरीचे' सम्पादक दे. भ. ज. स. करंदीकर अगर 'सकाळचे' सहसंपादक प्रो. ओतूरकर अगर राव० ना. गो. चापेकर या अधिकारी मंडळीपैकीं कोणीतरी या विषयावर लिहावयास पाहिजे होतें. असो.

खेडेगांवांत बसून जी सामुग्री उपलब्ध झाली त्यावर आह्मांस गुजारा करावा लागला आहे; आणि पोटाचा व्यवसाय संभाळून या विषयाच्या अभ्यासाकडे जितकें लक्ष पुरवावयास पाहिजे होतें तितकें पुरवतां आलेलें नाहीं. त्यामुळें ग्रंथांत दोष व वैगुण्य पुष्कळच राहिलें आहे, याची जाणीव आम्हांस आहे. शिवाय आम्ही कलोपासक साहित्यभक्तही नाहीं. तेव्हां त्या दृष्टीनेंही पाहतां पुस्तकांत बऱ्याच उणीवा दिसणार. तथापि बेकारीनें भ्रान्त झालेल्या एखाद्या बांधवाला आमच्या या विचारकंथेच्या सहाय्यानें जर मार्गाला लागतां आलें तर आमच्या श्रमांचें सार्थक झालें असें आम्हीं समजूं.

ब्राह्मणांतील बेकारी असा जरी मथळा असला व प्रामुख्यानें जरी या एकाच जातींतील बेकारी-निवारणाचें विवरण आम्हीं केलेलें

असलें तरी हल्लींच्या शिक्षणचक्रांतून बाहेर पडलेल्या व पडणाऱ्या इतर सर्व जातींच्या शिक्षणप्रेमी स्त्रीपुरुषांना ही आमची अल्पकृति खातीनें उद्बोधक व मनोरंजक वाटेल असा आम्हांस दृढ विश्वास वाटतो.

ब्राह्मण बेकारीवर गिरणी हाच एकमेव उपाय असें आम्ही तिसऱ्या प्रकरणांत प्रतिपादलें आहेच. तसेंच परिशिष्ट प्रकरणांत पारशी पुढारी आपल्या ज्ञातींतील बेकारीवर उपायचिंतन करीत आहेत असें आम्ही म्हटलें आहे. आतां पारशी पुढाऱ्यांनीं ‘लहानशी पारशांची कापडाची गिरणी काढणें’ (A small Parsi Textile Mill) हा एक उपाय सुचवला आहे हें पाहून आम्हांस समाधान वाटतें. वाचकांनींही यावरून योग्य तो निष्कर्ष काढावा. (ता० २०-११-३४ चा टाईम्स ऑफ इंडिया पहा) असो. याबाबत चर्चा करतांना मंदी जमेस धरून ती केली आहे. आतां सुदैवानें मंदी संपली असून भरभराटीचा काल सुरू झाला आहे. तेव्हां कापडाच्या गिरणीच्या धंद्यांत आतां बिलकूल धोका राहिलेला नाहीं. याबाबत परिशिष्ट प्रकरणांत मि. एस्. एच्. बाटलीवाला यांचा लेख अवश्य पहावा. पुस्तकाचे शेवटीं पत्राचा छापील नमुना जोडला आहे तो वाचकांनीं जरूर भरून आमचेकडे पाठवावा अशी आग्रहाची विनंति आहे. म्हणजे पुढील कार्याची दिशा ठरवण्यास मदत होईल. तरी विचार करून, तरुण वाचकांनीं तरी निदान, नमुना अवश्य भरून पाठवावा.

सदर पुस्तक लिहिण्याचा संकल्प केल्यावर तें लिहून छापण्यास परवानगी आमचे प्रभु **श्रीमंत नारायणराव बाबासाहेब** यांचेकडे आम्हीं मागितली व ती दयाळु अंतःकरणानें **श्रीमंतांनीं** लगेच दिली. याबद्दल **श्रीमंतांचे** आभार मानावे तितके थोडेच आहेत. पण **श्रीमंत** एवढेंच करून थांबले नाहींत, तर आमच्या विनंतीस मान देऊन त्यांनीं हस्तलिखित वाचण्याची तसदी घेतली, मार्मिक सूचनाही केल्या व पुस्तकास सुंदर व विद्वत्ताप्रचुर अशी प्रस्तावनाही लिहून दिली; याबद्दल **श्रीमंतांचे** आभार कोणत्या शब्दांत व कसे मानावेत हें आम्हांस कळत नाहीं. किंबहुना हें पुस्तक एक प्रकारें **श्रीमंतांच्या** सौजन्याचें व कृपेचें फळ

आहे. प्रस्तावना लिहून श्रीमंतांनीं आमचा गौरव केला असला तरी एक प्रकारें हा गौरव आमचा नसून आम्ही अंगीकृत केलेल्या कार्यांचाच तो आहे असें समजतों; आणि असेंच जर इतर संस्थानाधिपति व व श्रीमंत लोक या कार्याकडे लक्ष देतील तर हें बेकारीचें भूत गाडण्यास फारसा विलंब लागणार नाहीं.

बंगालमध्यें येथल्यापेक्षां कितीतरी पट अधिक बेकारी आहे. सर पी. सी. रे यांच्या मतें बंगालचे १२० कोटी रुपयांइतकें शोषण, मारवाडी, गुजराथी, पारशी वगैरे परप्रांतीय दरसाल करतात; आणि खुद्द बंगाली, कारकुनांची जात बनून, बेकारींत खितपत पडलेले आहेत. ही परिस्थिति पालटावी म्हणून रे गेल्या पावशतकभर जोराची चळवळ करीत आहेत. आमची स्थिति अगदीं बंगालसारखी आहे. तेव्हां असे असंख्य " रे " महाराष्ट्रांत निर्माण होऊन तशी चळवळ येथें केल्यास हें भूत तेव्हांच गाडलें जाईल.

यू. पी. प्रांताचे शिक्षणखात्याचे दिवाण नामदार सर जे. पी. श्रीवास्तव यांनीं आमच्या विनंतीवरून आपली 'फैझाबाद योजना' व 'नवीन शिक्षणपद्धतीचा ठराव' अशीं आम्हांकडे पाठवून आम्हांस उपकृत केलें आहे. तसेंच त्रावणकोरचे शिक्षणखात्याचे डायरेक्टर सी. व्ही. चन्द्रशेखरन् M. A. (Oxon) यांनींही आमच्या विनंतीवरून आपला बेकारीचा रिपोर्ट पाठविला व बंगाल, ओरिसा व मुंबई या प्रांतांच्या डायरेक्टर ऑफ इंडस्ट्रीज यांनीं आम्ही मागितलेली माहिती पुरविली याबद्दल नामदार श्रीवास्तव, चन्द्रशेखरन् व वरील डायरेक्टर ऑफ इंडस्ट्रीज या सर्वांचे आम्हीं फार आभारी आहोंत. तसेंच ज्या मण्डळीनीं हस्तलिखित प्रत तयार करणेस मदत केली त्या सर्वांचेच, पण विशेषतः त्यांतील रा. रा. मलशेटी वकील यांचे, आम्ही फार आभारी आहोंत. आपुलकीच्या भावनेनें छपाईचें काम करून देण्याचें अभिवचन देऊन पुस्तक शक्य तितकें सुंदर व माफक दरांत छापून दिल्याबद्दल कोल्हापूर येथील श्रीज्ञानेश्वर छापखान्याचे मालक रा. रा. सहस्रबुद्धे यांचेही आभार मानणें उचित आहे. रा. सहस्रबुद्धे

नगर वाचनालय, सातारा.
यांना पुस्तकास स्वदेशीच कागद वापरा; थोडा महाग पडला तरी चालेल अशी सूचना केली होती. त्याप्रमाणें त्यांनीं स्वदेशी कागद वापरला याजबद्दलही आम्हीं त्यांचे आभारी आहोंत. स्वदेशी ही बेकारीस पूर्णपणें मारक आहे. सबब स्वदेशी कागद मिळाल्याबद्दल आम्हांस फार समाधान वाटतें. पुणें येथील "सकाळ" चे सहसम्पादक प्रो. ओतूरकर यांनीं पुस्तकांत घालण्यासाठीं चित्राचा ब्लॉक दिल्याबद्दल आम्हीं त्यांचे आभार मानतों. सरतेशेवटीं श्रीज्ञानेश्वरांच्या शब्दांत 'न्युन तें पुरतें। अधिक तें सरतें। करोनि घ्यावें हें तुमते। विनवीत असें॥' अशी वाचकांना विनंति करून व 'बेकारीचें तिमिर जावो। ब्राह्मण-उद्योग सुर्यें पाहो। जें जें वांच्छील तें तें लाहो। ब्रह्मजात॥' अशी परमेश्वराची प्रार्थना करून हें आत्मनिवेदन संपवितों.

मु० आजरा
मार्गशीर्ष शु० ७ शके १८५६ — वि. ग. पटवर्धन.
ता० १३।१२।१९३४.

# प्रस्तावना

'ब्राह्मणांतील बेकारी' या प्रश्नाची सांगोपांग चर्चा रा० रा० विश्वनाथ गणेश पटवर्धन यांनीं या पुस्तकांत केली असून बेकारी निवारणार्थ उपायही सुचविले आहेत. या प्रश्नाकडे विचारी व विद्वान् लोकांचें लक्ष वेधूं लागलें आहे, हें सुचिन्ह होय. या विषयाचा शक्य तितका सांगोपांग अभ्यास व्हावयास पाहिजे व उपाय सुचतील तितके जनतेपुढें यावयास हवेत. आधुनिक सुधारणांच्या व संस्कृतीच्या केंद्रापासून दूर अशा आजऱ्यासारख्या ठिकाणीं असूनसुद्धां, शिवाय आपलें जबाबदारीचें सरकारी काम संभाळून, या प्रश्नाचा परिश्रमपूर्वक अभ्यास करून रा. पटवर्धन आपले विचार जनतेपुढें मांडीत आहेत, याबद्दल त्यांचें अभिनंदन करणें जरूर आहे. मराठींत ग्रंथकर्तृत्वाचा हा जरी त्यांचा पहिलाच प्रयत्न असला तरी या विषयाचा व इतर विषयाचा त्यांचा व्यासंग मोठा आहे. कायद्यावर, विद्यार्थ्यांना उपयोगी असें, 'A Synopsis of Jurisprudence" या नांवाचें त्यांनीं लिहिलेलें पुस्तक पुष्कळांना माहित असेलच.

'ब्राह्मणांतील बेकारी' या शब्दामुळें कांहींना बिचकल्यासारखें होणार आहे. सुशिक्षितांतील बेकारी असेंही नांव पुस्तकास दिलें असतें तरी तें योग्यच झालें असतें. परंतु सध्यांची बेकारी सुशिक्षित ब्राह्मण वर्गालाच विशेषतः जाणवत असल्यानें, पुस्तकास दिलेलें नांवही एकपरी अन्वर्थक आहे यांत शंका नाहीं.

या पुस्तकांत केलेलीं सर्वच विधानें सर्वांस मान्य होतील असें नाहीं; मतभेद हा असणारच. परंतु एकंदर पुस्तकाची विचारसरणी बहुतेकांस मान्य होईल असें वाटतें. बेकारी निवारणार्थ सुचविलेले उपाय अनेक असून विचारणीय आहेत. नवीन उद्योगधंद्याकडे लक्ष देणें,

परीक्षांचें अवास्तव स्तोम माजूं न देणें, लहान मोठ्या संकलित भांडवलावर ज्ञातिविशिष्ट गिरण्या काढणें व इतर कारखाने काढणें वगैरे उपाय सुचविलेले आहेत. त्या संबंधानें विशेष विचार न करितां या ठिकाणीं बेकारीच्या प्रश्नाबद्दल तात्त्विक विचार त्रोटक स्वरुपांत मांडण्याचें योजिलें आहे.

ग्रंथकर्त्यांनीं म्हटल्याप्रमाणें विलायतेंतील बेकारी व येथील बेकारी यांमध्यें फरक आहे. तिकडील बेकारीमुळें बेकार लोक काम करण्यास तयार असून त्यांना काम मिळत नाहीं व पोटालाही मिळत नाहीं. येथें अशी स्थिति अद्यापि आलेली नाहीं. हिंदु लोकांतील 'एकत्र कुटुंब संस्था' अद्याप नष्ट झाली नसल्यानें, साधारण उत्पन्न असणाऱ्या हिंदु कुटुंबांतील वैयक्तिक इसमास पोटाला अजिबात मिळत नाहीं असें होत नाहीं. इकडील कल्पनेप्रमाणें कुटुंबांत आईबाप, भाऊ बहिणी, चुलते व त्यांचीं बायकामुलें इतक्यांचा समावेश होत असे. अगदीं अलिकडे मात्र, कुटुंब या शब्दांत आईबाप मुलगे व मुली इतक्यांचाच समावेश होतो. कुटुंबाचा संभाळ म्हणजे वरील सर्व मंडळींचा संभाळ करणें होय. परंतु पाश्चात्य देशांत फक्त नवरा बायको व त्यांची अज्ञान मुलें इतक्यांचाच कुटुंबांत समावेश होत असल्यानें, मुलें सज्ञान झालीं. म्हणजे त्यांचें त्यांनाच पोटाला मिळवावें लागतें. मुलांचे आईबाप त्यांना पोटाला घालीत नाहींत. अर्थात् कांहीं श्रीमंत कुटुंबें या गोष्टीला अपवाद आहेत हें निराळें; पण सर्वसाधारण नियम म्हणजे, प्रत्येक सज्ञान माणसानें—मग तो पुरुष असो कीं स्त्री असो—आपल्या पोटाला मिळविलेंच पाहिजे. तशी स्थिति, आमच्या एकत्रकुटुंबपद्धतीमुळें आपल्या येथें तूर्त नाहीं; परंतु हळूं हळूं ती स्थिति येणार हें निश्चित. असो. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे एकत्र कुटुंबसंस्था अजिबात नष्ट झालेली नसल्यामुळें, कोणाला अगदींच पोटाला मिळत नाहीं असें नाहीं. इकडील बेकारी म्हणजे, ज्याला ज्या तऱ्हेचें काम व ज्या दर्जाची राहणी पाहिजे ती त्यास मिळत नाहीं असाच बहुधा प्रकार आहे. करितां बेकारीबद्दल विचार करितांना हा फरक लक्षांत ठेविला पाहिजे.

ग्रंथकर्त्यांनीं सुचविल्याप्रमाणें बेकारीला प्रारंभ इकडील व्यापार, उद्योगधंदे व वाहतुकीचीं साधनें, खुष्कीचे मार्ग व जलमार्ग हळूंहळूं युरोपियन लोकांचे हातांत जाऊं लागल्यापासून झालेला आहे. पूर्वींच्या धामधुमीच्या काळांत राज्याचे रक्षणार्थ लष्कर बरेंच ठेवावें लागे. लष्करास लागणारें सामान पुरविणारे कारखाने अनेक असत. डोंगरी किल्ले व भुइकोट किल्ले अनेक असून किल्ल्यांचे संरक्षणार्थ सैन्य व तोफखाना ठेवावा लागे. प्रत्येक लहान मोठ्या राज्यांत सरदार, दरकदार, मानकरी व वतनदार वर्ग असे, आणि यांचे आश्रयावर उपजीविका करणारे व त्यांना लागणारे नित्य उपयोगाचे कलाकुसरीचे व चैनीचे पदार्थ उत्पादन करून पुरविणारा असा फार मोठा समाज असे; परंतु नवीन राजवटींत, शांततेमुळें या लोकांची जरूरी उरली नाहीं व ते घरीं बसले. त्यांचा उद्योगधंदा नाहींसा झाला. पोटार्थी जो वर्ग होता तो नवीन परिस्थितिशीं समरस होण्याच्या प्रयत्नास लागला व जुन्या राजवटींतील वतनदार व वजनदार लोक नशीबास दोष देत घरीं बसले. सर्व साधारण लोकांना नोकरी, वकिली, (डॉक्टरी) वैद्यकी, वगैरे परोपजीवी धंदे, विलायती माल येथें खपविणेचा एजन्सीचा व्यापार करणें व शेती, एवढेंच काय तें उपजीविकेचें साधन उरलें. अर्थात् कारकुनी नोकरी व तत्सदृश अमलदाऱ्या यांत, व वकिली वैद्यकी वगैरेंत, प्रवेश प्रारंभीं शिकलेल्या ब्राह्मण, प्रभु वगैरे लोकांना मिळाला व त्यांचा बोलबाला झाला. देशांतील शांतता व इंग्रजी राज्यांतील न्यायीपणा यामुळें त्यांचेबद्दल संतोष व आदर होता. अशिक्षित लोकांस शिक्षण देऊन त्यांना पुढें येणेस प्रोत्साहन दिलें गेलें व शिकलेल्या लोकांचा एकंदरींत देशांत होत असलेला बोलबाला पाहून लोक आपोआप अधिकाधिक शिकूंही लागले. पण इतक्या सुशिक्षितांना त्यांच्या दर्जाप्रमाणें नोकऱ्या मिळणें कठीण होऊं लागलें. बेकारीची ओरड सुरू होऊन, देशांतील विविक्षित धंद्यांत गर्दी फार झाली व त्यांमध्येंही या सुशिक्षित मंडळींना वाव मिळेना. एकंदरींत देशांत असंतोष वाढूं लागला. येथील पूर्वींचे

उद्योगधंदे बुडाल्यानें, अन्नान्न दशा प्राप्त झालेल्या लोकांमध्यें या सुशिक्षित बेकारांची भर पडली, व या प्रश्नाकडे अलीकडे सर्वांचें लक्ष वेधलें. देशी परदेशी, जहाल मवाळ, ब्राह्मण ब्राह्मणेतर, वगैरे भेद व मतांतरें यांचे मुळाशींही बरेच अंशानें बेकारीच आहे, ही गोष्ट लक्षांत ठेविली पाहिजे. स्त्रियांमध्येंही शिक्षणाची वाढ होत असून, त्यांनींही नोकरीचें ध्येय कमी अधिक प्रमाणांत ठेवल्यामुळें बेकारीचा प्रश्न कठीण होत आहे.

बेकारी नाहींशी होण्याचा मुख्य उपाय म्हणजे सध्यांच्या शिक्षणानें उत्पन्न झालेली परोपजीवी वृत्ति नाहींशी होऊन स्वावलंबनाची वृत्ति उत्पन्न झाली पाहिजे हा होय. यासाठीं आमच्या गृहशिक्षणांत व शाळेच्या शिक्षणांत प्रथमपासूनच बदल होणें जरूर आहे. नोकरी हें ध्येय सुटलें पाहिजे. कष्टाळूपणा, अल्पसंतुष्टता, साधेपणा, समाजहित-बुद्धि, स्वावलंबन वगैरे गुणांची जोपासना करणारें शिक्षण आम्हांला मिळणें आवश्यक आहे. या बाबतींत पुण्याच्या व नाशिकच्या अनाथ विद्यार्थीगृहानें कौतुकास्पद कामगिरी केली आहे. जीवनकलहांत धैर्यानें व खेळाडू वृत्तीनें भाग घेणारे लोक निर्माण व्हावयास पाहिजेत.

बेकारी निवारणार्थ उपाय सुचवितांना एकाच्या तोंडचा घास काढून दुसऱ्याच्या तोंडांत घालावयाचा असा उपाय सुचविल्यानें हा प्रश्न सुटणार नाहीं. एका वर्गांतील बेकारी नाहींशी होऊन दुसऱ्या वर्गांत ती सुरू होईल एवढेंच. हल्लीं अस्तित्वांत असलेल्या उद्योग-धंद्यांतच ब्राह्मणांनीं पडण्याचें ठरविल्यास या उद्योगधंद्यांतील सध्यांच्या लोकांनीं कोणीकडे जावयाचें ? नवीन उद्योग धंदे काढणें हाच एक खात्रीचा उपाय आहे, पण 'तो अमलांत कसा येणार ?' एवढाच मोठा प्रश्न आहे.

परीक्षांचें अवास्तव स्तोम माजविल्यामुळें आपलें फार नुकसान झालें आहे यांत शंका नाहीं. पण परीक्षा पास होणें हेंच ध्येय आमच्या मुलांच्यापुढें, आम्हीं वडील माणसांनीं ठेवल्यामुळें तीं परीक्षांचेच मागें लागतात यांत नवल काय ? आपण मोठीं माणसें पदवी मिळवलेल्या

लोकांचें स्तोम माजवितों. त्यामुळें कॉलेजांत जाऊन पदवी संपादन करणें म्हणजे इतिकर्तव्यता झाली असें मुलांना वाटल्यास त्यांत दोष कोणाचा? सध्यां सुशिक्षित बेकारांची दैन्यावस्था पाहूनही, आपण आपल्या मुलांना, आपली शक्ति नसतांनासुद्धां अजून कॉलेजांत पाठवितों, यावरून आपली गतानुगतिक वृत्ति किती प्रबळ आहे हें दिसून येतें.

ज्या वयांत पुढील आयुष्यांत उपयोगी पडणारी शक्ति, विद्या, व कला संपादन करावयाच्या असतात तोच काल आम्हीं कॉलेजचें निरुपयोगी शिक्षण घेणेंत घालवितों; त्यामुळें जीवनकलहांत उपयोगीं पडणारी विद्या आपणांस मिळत नाहीं. उलट पक्षीं, आपली राहणी, आपल्या मानपमानाच्या कल्पना व आकांक्षा वाढलेल्या असतात; त्यामुळें आपलें दुहेरी नुकसान होतें; कारण, जीवनकलहांत आपला टिकाव लागत नाहीं, वाढलेल्या आकांक्षा पुऱ्या होत नाहींत; व नवीन धंद्यांचें शिक्षण व तदनुकूल राहणी संपादन करितां येत नाहीं; आणि पुढें सर्व आयुष्य निराशामय होतें. तेव्हां सूज्ञ व जाणत्या लोकांनीं याबद्दल विचार करून ठराविक चाकोरींच्या बाहेर पडून नवीन मार्ग शोधावयाला नको काय?

ही सुशिक्षितांची बेकारी थांबविणेची असल्यास मुलाला जरूरीपुरतें शिक्षण मिळाल्यावर त्याला शेतकीचें, खनिज पदार्थांचें, औद्योगिक व कलाविषयक शिक्षण देऊन कांहीं तरी उद्योग करणेस लावणें हा उत्तम उपाय होय!

बेकारी निवारणार्थ नाना उपाय योजावे लागतील. केवळ ज्ञानविशिष्ट उद्योगधंदे सुरू करून भागणार नाहीं. एक तर बेकारीला कारण होणाऱ्या आपल्या चुकीच्या कल्पना सोडून द्यायला पाहिजेत. कोणताही धंदा हलका नाहीं. धंदा उच्च कीं नीच हें काम करणाऱ्या माणसाच्या मनोभूमिकेवर अवलंबून असतें. आपल्या वर्गाला अमुक काम योग्य, अमुक अयोग्य असें म्हणत गप्प बसण्यापेक्षां अमुक एका निकृष्टावस्थेंत असलेल्या धंद्याला आपण उच्च दर्जा प्राप्त करून देऊं अशा ईर्षेनें त्या धंद्यांत पडलें पाहिजे. नवीन पिढींत वडिलोपार्जित

धंद्याबद्दल तिटकारा उत्पन्न होत आहे. पूर्वी त्याबद्दल आदर व अभिमान वाटत असे. पूर्वजांच्या धंद्यांत परिस्थितिप्रमाणें योग्य तो बदल करून ते चालविणेचे म्हटल्यास बेकारीचा प्रश्न सुटणेस थोडी फार मदत होणार आहे.

नोकऱ्यांच्या मागें न लागतां व्यापार व उद्योगधंद्यांत पडणें हा उत्तम पक्ष. परंतु एकदां नोकरी करणेचें ध्येय ठरल्यावर, नोकरीला अवश्य असणारे गुण संपादन करावयाला नकोत कां? ब्राह्मणांची सरकारी नोकरींतून तर हकालपट्टी झालीच आहे; परंतु मुंबई वगैरेसारख्या ठिकाणीं खासगी नोकऱ्यांतूनसुद्धां ब्राह्मणांची उचलबांगडी झालेली दिसते. ब्राह्मणांपेक्षां इतर जातीचे नोकर कष्टाळू, मालकाची मर्जी संभाळणारे व कर्तव्यतत्पर असल्याचें आढळून आलें आहे; व त्यामुळें ब्राह्मण वर्गांत बेकारी वाढत आहे असें कोणी अनुमान केलें तर तें चुकीचें आहे असें कोण म्हणेल! ज्याचें मीठ खावयाचें त्याच्याशीं नेकीनें वागावयाचें, असा जोंपर्यंत बाणा आहे तोंपर्यंतच नोकराला बरकत असते. तेव्हां बेकारी वाढूं नये व 'आहे तें राखलें जावें' याकरितां योग्य तो वर्तनक्रम सध्यां नोकर असलेल्यांनीं ठेवणेची दक्षता ठेवावी. त्यानें समाजाचें नुकसान थोडें तरी थांबेल.

ब्राह्मणांनीं पुढारीपण फारसें आंगावर घेऊं नये हें ग्रंथकाराचें मत कोणालाही सध्यांच्या परिस्थितींत पटेल. जें पुढारीपण मानलें जात नाहीं तें पुढारीपण कसलें? आज ब्राह्मणांचें नेतृत्व कोणालाही नको आहे. ब्रिटिश सरकार व देशी संस्थानें यांचा देखील ब्राह्मणांबद्दल अनादर झाला आहे असें मानण्यास जागा आहे. अशा स्थितींत ब्राह्मण वर्गानें आपल्या ब्राह्मण समाजाची विस्कटलेली घडी पुनः बसविण्याचा प्रयत्न करणें वाजवी होईल. ज्याचे ठिकाणीं लोकोत्तर बुद्धिमत्ता व त्यागवृत्ति आहे त्यानें लोकांना योग्य दिशा दाखविणेचें काम अवश्य करावें. अशा त्यागी नेत्यांची देशास फार गरज आहे. परंतु सामान्य माणसानें या फंदांत न पडतां आपलें घर सुव्यवस्थित करणेचा प्रयत्न करावा, हें बरें.

"Charity begins at home याप्रमाणेंच Improvement begins at home" हें तत्त्व लक्षांत ठेवून ब्राह्मण वर्गानें वागलें पाहिजे. सामान्य घटक सुधारला म्हणजे समाज साहजिकच सुधारतो हें तत्व लक्षांत बाळगिलें पाहिजे.

ज्ञातिविशिष्ट संस्था काढणेची कल्पना आम्हांस तत्त्वतः मान्य नाहीं. त्याप्रमाणेंच मोठ्या प्रमाणांत उद्योगधंदे काढून, लहान उद्योगधंदे बुडवावेत असेंही वाटत नाहीं. परंतु जेव्हां एका ज्ञातींतील लोक ज्ञातिविशिष्ट भावनेनें दुसऱ्या ज्ञातीच्या चरितार्थाचें साधन हिरावूं पाहतात, त्यावेळीं तोडीस तोड म्हणून वरील मार्ग पत्करणें गैरवाजवी होणार नाहीं. तथापि ग्रंथकार सुचवितात तशा गिरण्या ब्राह्मणांचे साहाय्यानें निघाल्या व चांगल्या रीतीनें चालल्या तर एकप्रकारें स्वराज्याचा प्रश्न सुटल्यासारखें होणार आहे. कारण, एका जातींत कां होईना, एवढें परस्पर साहाय्य, सुसंघटना, विश्वास, सचोटी व कर्तृत्व जर दिसून आलें, तर निराळें स्वराज्य मिळविणेचें तें काय राहिलें ? या गुणांचे जोरावर तें सहज हिंदवासीयांचे मालकीचें होईल.

एकंदरींत या गळ्याशीं लागलेल्या पोटापाण्याच्या प्रश्नाकडे लोकांचें लक्ष लागलें आहे, हें सुचिन्ह होय. पण तो यशस्वी रीतीनें सोडविण्याकरितां लवकर सुरवात झाली पाहिजे; व ती होण्याला या अल्पशा प्रयत्नानें मदत झाली तर ग्रंथकाराला फार धन्यता वाटेल; व त्याचे भागीदार होण्याची इच्छा आमचेप्रमाणें इतरांनाही असेलच. ईश्वरकृपेनें त्यांचे इच्छेला यश लाभो अशी प्रार्थना करून हें विस्कळित स्वरूपांत लिहिलेले **प्रस्तावनावजा विचार** संपवितों.

इचलकरंजी<br>ता० २७-११-३४ } **नारायणराव बाबासाहेब**

श्री

# ब्राह्मणांतील बेकारी

## तिचीं कारणें व त्यावर उपाय.

## प्रकरण पहिलें.

### जागतिक बेकारी : कारणें व उपाय.

"I commend particularly to the reader's attention the proposal for a duty on all imports combined with a rebate or bounty on all exports. It is also important to notice how well a Scheme for capital development at home would marry with a Scheme for import duties."

—**J. M. KEYNES.**

आज असा एकही देश पृथ्वीचे पाठीवर नाहीं कीं, ज्याला बेकारी या रोगाची बाधा झालेली नाहीं. प्रत्येक देशाचें सरकार या रोगावर काय उपाययोजना करावी, हा रोग कसा हटवावा, या विवंचनेंत चूर झालें आहे. आज जे कांहीं सामाजिक कूट प्रश्न सर्वांचे पुढें उभे आहेत, त्यांत बेकारीस अग्रस्थान द्यावें लागेल. या विषयाची जितकी चौफेर चर्चा होत आहे, तितकी क्वचितच एकाद्या विषयाची होत असेल. असा हा

जागतिक व जगड्व्याळ प्रश्न होऊन बसला आहे. तेव्हां जागतिक बेकारीचीं कारणें काय व तीवर उपाय काय याबाबत प्रथम थोडीशी चर्चा करणें अप्रस्तुत होणार नाहीं. अमुक एकाच कारणापासून बेकारी उद्भवते असें नाहीं व एकच उपाय तिचा परिहार करूं शकेल असेंही नाहीं. तर ती अनेक कारणांनीं उद्भवत असून, तीवर उपायही नाना तऱ्हेचे आहेत.

बेकारीच्या कारणांचे साधारणपणें तीन गट पडतात. ते असे:- (अ) **जागतिक कारणें**:-(१) फाजील निपज, अपुरी मागणी व उत्पादनाचा बेसुमार खर्च (२) नाण्याची टंचाई (३) जागतिक मंदी (४) मोठ्या धंद्यांचें एकीकरण ( रॅशनलायझेशन् ); (ब) **राष्ट्रीय कारणें**:- (१) खुला व्यापार व परदेशाची स्पर्धा (२) परदेशांत वसाहतीस जाणेंत मंदी (३) बेकारांना सरकारी मदत (डोल) (४) बेसुमार करवाढ (५) परदेशांत वाजवीपेक्षां अधिक ठेव ठेवणें (६) अपुरा द्रव्यसंचय व काटकसरीचा अभाव; (क) **आंतरराष्ट्रीय कारणें**-(१) पतीचा तुटवडा (२) सोन्याची चणचण.

## जागतिक कारणें

(१) **फाजील निपज, अपुरी मागणी व उत्पादनाचा बेसुमार खर्च**—तयार मालाचा उठाव होईनासा झाला म्हणजे फाजील पैदास झाली असें आपण म्हणतों. माल महाग पडूं लागला म्हणजे गिऱ्हाईक तो घेत नाहीं. महाग पडण्याचें कारण मजुरांना द्यावी लागणारी भारी मजूरी, असें भांडवलवाले व कारखानदार प्रतिपादतात. उलट पक्षीं मजूर महागाईचें कारण कारखानदारांच्या व्यवस्थेंतील अक्षमता, अपात्रता असें दाखवितात. पण कारण कांहीं असलें तरी मालाचा उठाव होईनासा झाला म्हणजे कारखानदार खर्चांत बचत करण्याकरितां मजूर कमी करितात व त्यामुळें बेकारी वाढते. खरें पाहूं गेलें तर एक परी गिऱ्हाइकांची माल विकत घेणेंबाबत आर्थिक अपात्रता हेंच मालाच्या फाजील उत्पादनाचें कारण होय. ( २ ) **नाण्याची टंचाई** ( डिफ्लेशन् )—फाजील पैदास न होतां मालाची उठावणी होईनाशी

झाली म्हणजे नाण्याची टंचाई झाली असें समजावें; आणि लोकांजवळ माल घेणेस पैसाच नसला कीं, कारखाने बंद पडतात. पुष्कळ वेळां मालाच्या किंमती उतरूं लागल्या म्हणजे कंजूष लोक आणखी किंमती उतरतील या आशेनें माल विकत घेणेचें तहकूब करतात. त्यानेंही बेकारी वाढणेस मदत होते. (३) **जागतिक मंदी**—राष्ट्राराष्ट्रांमधील व्यापार जोरांत असला म्हणजे देशांतील उद्योगधंदे जोरांत चालतात. पण जगभर मंदी पसरली कीं, राष्ट्रांतील धंदे मोडकळीस येतात, कारण बाहेरील मागणी कमी होते. जग सुखी तर आपण सुखी हें तत्त्व येथेंही लागूं पडतें. (४) **धंद्यांचें एकीकरण**—मोठमोठे कारखाने एकत्र करणें, नवीन नवीन पैदाशीच्या तऱ्हा अमलांत आणणें, या पद्धतीला धंद्यांचें एकीकरण ( रॅशनलायझेशन् ) म्हणतात. यामुळें पुष्कळ वेळां मजूर कामावरून कमी केले जातात; तसेंच मजुरांचें काम करणारीं यंत्रें उपयोगांत आणल्यामुळेंही मजूर कमी केले जातात. अर्थात् मग बेकारी वाढते.

## राष्ट्रीय कारणें

(१) **खुला व्यापार व परदेशाची चढाओढ**—खुल्या व्यापाराची चहा गेलें शतकभर झालेमुळें तो तसाच रहावा असें बरेच लोक म्हणतात; पण सर्वस्वीं खुल्या व्यापारावर राष्ट्रानें अवलंबून राहणें फार धोक्याचें असतें. बाहेरच्या देशांत नवीन धंदे सुरूं झाले अगर बंडाळी झाली कीं, परदेशांत माल खपेनासा होतो; मग देशांतील धंदे डबघाईस येतात. तेव्हां शक्य तितके प्रत्येक राष्ट्रानें आपले घरचे धंदे वाढवून त्यांतच भांडवल गुंतवीत राहिलें पाहिजे. म्हणजे बाहेरील घडामोडींचा फारसा परिणाम घरच्या धंद्यांवर होणार नाहीं. (२) **परदेशांत वसाहती करणेस जाणेंतील मंदी**—परवांचें महायुद्ध होण्यापूर्वी बऱ्याच देशांतील लोक परदेशांत वसाहती करणेस जात. पण महायुद्धामुळें असें जाणें बंद झालें तें झालें. शिवाय महायुद्ध सुरूं असतांना पुष्कळशा धंद्यांत बायकांना शिरावें लागलें. पण महायुद्ध संपल्यावरही बायकांनीं जे धंदे एकदां आक्रमण केले ते सोडले नाहींत. त्यामुळें पुरुषांत बेकारी अधिक वाढली आहे. महायुद्धापूर्वी पुरुष

घरांतील बायकामुलांना पोसत. आतां बायका धंद्यांत शिरल्यामुळें राष्ट्राला बेकार पुरुषांना पोसावें लागतें. म्हणजे पूर्वी बेकारीचा जो कौटुंबिक प्रश्न होता तो आतां राष्ट्रीय होऊन बसला आहे. (३) **बेकारांना आर्थिक मदत**—बेकारी हटविणेची असेल तर तीवर चढाईचे उपाय योजिले पाहिजेत. पुष्कळ वेळां बेकारांना सरकारी मदत दिल्यापासून त्यांच्यांत आळस वाढतो. समजा, एका बेकार मजुराला सरकारांतून दरमहा वीस रुपये मदत मिळत आहे आणि हा मजूर दरमहा तीस रुपये मजुरी मिळविणारा आहे. तर पुष्कळ वेळां तो मनांत असा विचार करतो कीं, काम न करतां हे वीस रुपये मिळालेले बरें; मग उगीच पोटाचा धंदा मिळविण्याची खटपट करा कशाला ! अशानें बेकारी हटत नाहीं. (४) **बेसुमार करवाढ**—कारखानदारावर कराचा बोजा वाढला कीं उत्पादनाचा खर्चही वाढतोच. मग माल महाग विकणें भाग पडतें. किंमत वाढली कीं गिऱ्हाईक तुटतें. सबब गिऱ्हाईक राखण्याकरितां खर्च कमी करावा लागतो; आणि मजूर कमी करूनच कारखानदार हा खर्च कमी करतात. तसेंच व्यक्तीवरही कराचा बोजा वाढला कीं बेकारी वाढते. समजा सालिना दोनशेंहे रुपये प्राप्तीवरील कर देणाऱ्या इसमावर आणखी तोच कर निम्यानें वाढवला, तर आहे त्या उत्पन्नांत खर्चाची तोंडमिळवणी करण्याकरितां, हा इसम आपल्या स्वैपाकिणीस अगर माळयास काढून टाकतो. यामुळें बेकारींत भर पडते. करवसुली करावयाची ती शंक्य तितक्या कमी खर्चानें केली पाहिजे; तसें होत नाहीं. वाढविलेले कर वसूल करण्यांत बरीच रक्कम खर्च पडते. त्यामुळें सरकारचे हातांत अखेर थोडीशीच रक्कम येते. शिवाय कोणत्याही सरकारानें आपलें उत्पन्न वाढवावयाचें झाल्यास आपल्या प्रजेचेंही उत्पन्न वाढविलें पाहिजे. नुसती करवाढ करणें हा शहाणपणाचा मार्ग नव्हे. (५) **परदेशांत फाजील ठेवी ठेवणें**—राष्ट्रांतील धनिक लोक परदेशांत भांडवल गुंतवूं लागले तर त्या देशांतील लोकांस काम मिळून तेथील उद्योग धंदे वाढतील. समजा, उद्यां हिंदी धनिकांनीं स्वदेशी धंद्यांत रक्कम न गुंतवितां ब्राझील अगर आफ्रिका या देशांतील नवीन

रेल्वे रस्ता करणाऱ्या कंपनींत गुंतविली तर तेथील मजुरांना काम लागेल; पण हिंदुस्थानास त्याचा उपयोग कसा होणार? उलट पक्षीं तीच रक्कम जर देशी धंद्यांत ते गुंतवितील तर येथील लोकांना कामधंदा अधिक लागेल.(६) **अपुरा संचय व काटकसरीच्या संवयींचा अभाव**—हल्लींचें युग उधळें आहे. काटकसरीनें खर्च करून हिशेब वगैरे ठेऊन संचय करण्यांत, व शिल्लक टाकण्यांत लोकांना—विशेषतः हिंदु तरुणांना—कमीपणा वाटतो; पण भांडवल त्यामुळें साठत नाहीं. तेव्हां योग्य संचय करणें व शिल्लक टाकणें आणि ती अधिक पैसा मिळवून टाकणें, केव्हांही राष्ट्रहिताचें असतें; कारण भांडवल साठलें तरच नवीन उद्योग धंदे निघतात. मात्र संचय करतांना आहेत त्या गरजा व खर्च कमी करून संचय करणें हिताचें होणार नाहीं. समजा संचय करण्याकरितां एकाद्या इसमानें आपला वाजवी असलेला दुधाचा रतीब चार शेराचा तीन शेरावर आणला तर त्याचा परिणाम गवळ्यांत बेकारी वाढविण्यांत होईल. तेव्हां असें न करतां त्यानें अधिक उद्योग करून आपलें उत्पन्न वाढवून संचय केला पाहिजे.

## आंतरराष्ट्रीय कारणें

(१) **पतीचा तुटवडा**—पुष्कळ वेळां बेकारी बँकांवर अवलंबून असते. नाण्याची, चलनाची वाढ बाजारांत दिसूं लागली कीं, पेढीवाल्याचें व बँकर्सचें धाबें दणाणूं लागतें. मग ते लोकांना व कारखानदारांना कर्ज देतांना अधिक तारण मागूं लागतात. त्यामुळें धंद्याची वाढ खुंटते. तेव्हां देशांतील पेढीवाले व बँकर्स हे छातीचे व धोरणी असावे लागतात. आजकाल बँकर्सवर कित्येक देशांतील प्रधान मंडळाची उलथा पालथ बरेच वेळां अवलंबून असते ती याच कारणाकरितां. नुसत्या बँकांमधील ठेवी वाढल्या, म्हणजे पतीची वाढ होते, असें मानणें चूक आहे. ठेवीच्या वाढीबरोबर बँकांनीं लोकांना व कारखानदारांना अधिक प्रमाणांत व सवलतीनें कर्ज दिलें पाहिजे. (२) **सोन्याचा तुटवडा**—देशांदेशांमधील व्यापाराकरितां सोनें अलीकडे फार लागूं लागलें आहे. कारण पूर्वी कुटुंबाला लागणाऱ्या सर्व

वस्तु कुटुंबांतल्या कुटुंबांतच तयार होत; आतां तसें होत नाहीं. एखादा अगदीं गरीब शेतकरी झाला, तरी तो आपल्याला लागणाऱ्या वस्तु स्वतः उत्पन्न न करितां विकत घेतो. दुसरें असें कीं, सोन्याचा उपयोग करणाऱ्या लोकांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. तिसरें कारण आंतरराष्ट्रीय व्यापारांतील वाढ हें होय. या सगळ्या गोष्टींना सोनें लागतें. सध्यां खाणींतून सोनें अधिक निघतें हें खरें. तथापि एखाद्या देशानें आपलें चलन सोन्याचें ठरविलें आणि त्यांतील बँकांनीं नोटांचे चलनाइतका सोन्याचा साठा बँकेंत ठेवण्याचें ठरविलें, तर जगांतील सर्व सोनें त्या एकाच देशांतील व्यवहाराला पुरणार नाहीं; वस्तुतः सोन्याच्या नांवाखालीं हा सर्व कागदी व्यवहार होत असतो.

देशांतील अंतर्गत व्यापारास सोनें फारसें लागत नाहीं, पण परराष्ट्रांशीं होणाऱ्या व्यापारास लागतें. त्यामुळें पुष्कळ वेळां सोनें परदेशाला रवाना करावें लागतें; अशा वेळीं पेढीवाले आरडा सुरू करितात व सुवर्णनिर्गतीस आळा घालणारे कायदे पास करून घेतात; त्याचा परिणाम नाण्याची टंचाई होऊन, बेकारी वाढते. कारण व्यापार खालावतो; तेव्हां बँकांमध्यें सोन्याचा साठा नुसता वाढविण्यांत हंशील नसतें.

आतांपर्यंत केलेल्या चर्चेवरून वाचकांचे ध्यानांत आलें असेलच कीं, बेकारीचें कारण अमुक एकच असें नाहीं. अर्थातच त्यावर अमुक एकच असा रामबाण उपाय सांपडणार नाहीं. विविध उपाय योजावे लागतील. त्यांतील कांहीं राष्ट्रीय तर कांहीं आंतरराष्ट्रीय असूं शकतील. तेव्हां उपाय काय आहेत ते पाहूं. हे उपाय स्थूल मानानें पुढीलप्रमाणें आहेत—१. संरक्षक जकात पद्धतीचें धोरण. २. सगळ्यांना काम मिळेल अशी योजना. ३. व्यापाराला भांडवल सवलतीनें मिळण्याची सोय. ४. कर कमी करणें. ५. सुवर्ण चलनाबाबत आंतरराष्ट्रीय धोरण.

## उपाय

**(१) संरक्षक जकात पद्धतीचें धोरण**—खुल्या व्यापारामुळें व अन्य कारणांनीं देशांतील मालाच्या घाऊक किंमती फार उतरल्या आहेत.

त्यांत वाढ होणें इष्ट आहे; आणि ही वाढ संरक्षक जकाती बसवून करतां येईल. अशी शेंकडा पंधरा टक्के जकात आयात मालावर बसवावी; त्यामुळें निर्गत व्यापारास जरा धक्का बसेल, नाहीं असें नाहीं. पण देशांतील उद्योगधंदे जोरांत चालूं लागतील; कारण घाऊक किंमती मग वाढतील. शेतीस व देशांतील इतर धंद्यांना उत्तेजनही मिळेल. मालाच्या घाऊक किंमती ज्या मानानें उतरतात, त्या मानानें फुटकळ किंमती उतरत नाहींत, आणि उत्पादनाच्या खर्चांत, कारखानदारांना इतर बाबतींत बचत करतां येत नाहीं; पण खर्च कमी करणें भाग पडतें. मजूर कमी करून कारखानदार हा खर्च कमी करतात, सबब घाऊक किंमती वाढतील असें धोरण ठेवणें इष्ट आहे. तथापि, बाहेरील देशांशीं होणारा व्यापार खालावूं नये म्हणून सात टक्के बोनस या व्यापाराला सरकारांतून देण्यांत यावें. वरील दोन्ही गोष्टींचा अंमल मात्र देशांतील घाऊक किंमतींत वाढ होईपर्यंतच असावा. हा तात्पुरता पण जरुरीचा उपाय आहे. घाऊक किंमती वाढल्या, कीं देशी धंदे सावरतील; अर्थात् बेकारीस आळाही बसेल. आपल्या येथें साखर व काड्याच्या पेट्या यांचे आयातीवर जकात बसविल्यापासून साखरेचे किती तरी कारखाने निघाले आहेत. काड्याच्या पेट्यांच्या कारखान्यांची तीच स्थिति आहे. ही जकात आणखी ५-१० वर्षें राहिल्यास हिंदुस्थानच निदान साखर परदेशाला पाठवूं शकेल. ( २ ) **सगळ्यांना काम मिळेल अशी योजना**—सध्यां कामावर आहेत त्यांपेक्षां जितके अधिक मजूर कारखानदार व मजूरांचे मालक कामावर लावतील, त्या मानानें वाढलेली मजूरी देण्याकरितां त्यांना सरकारांतून मदत देणेंत यावी. हेतु हा कीं जास्ती लाविलेल्या मजुरांचा सर्वस्वीं भार कारखानदारांवरच पडूं नये. या योजनेमुळें अधिक लोक कामावर लागून बेकारांची संख्या घटेल. खुद्द कारखान्यांत अधिक मजूर खपण्यासारखे नसल्यास, कारखान्यांतील मजुरांच्या चाळी सुधारणें मजुरांना खेळण्याकरितां मैदानें, क्रीडांगणें तयार करणें, ड्रेनेज व चावीचें पाणी यांची सोय करणें, अशा कामांवर मजूर लावण्याकरितां कारखानदारांना सरकारानें उत्तेजन द्यावें. आणि मजुरीचा कांहींसा अंश आपण सोसून सरकारानें तें द्यावें. मोठमोठे जमीनदार असतील त्यांना ताली

घालणेस, बागाईत करणेस सरकारांतून वरीलप्रमाणेंच उत्तेजन द्यावें. ही मदतीची योजना मात्र तात्पुरती असावी. बेकारांची संख्या कमी झाल्या-बरोबर ती योजना रद्द करावी. **सरकारी कामें**—ज्याप्रमाणें दुष्काळी कामें सरकार सुरू करतें त्याप्रमाणेंच बेकारी निवारणार्थ कामें सरकारनें सुरू करावींत. उदाहरणार्थ नवीन रस्ते तयार करणें, जुने रस्ते रुंद करणें, मोठमोठीं ड्रेनेजचीं कामें हातीं घेणें, नवीन कालवे काढणें व जुने दुरुस्त करणें, पड जमिनी लागवडीस आणणें, जंगल राखणें, नवीन रेल्वेचे रस्ते बांधणें वगैरे कामावर पुष्कळ लोक सरकारास लावतां येतील; आणि ते इतर धंद्यांशीं चढाओढ न करितां लावतां येतील. या कामावर, लोक अगदीं जरुरीपुरत्या व शक्य तितके कमी वेतनावर मात्र ठेविले पाहिजेत. अधिक वेतनाचें काम मिळाल्यास वरील कामावर लागलेल्या लोकांना तिकडे जाण्याला परवानगी असावी. वरील योजना अमलांत आणित असतांना, त्याबराबेरच बेकारांना काम मिळवून देणाऱ्या संस्था व धंदे—शिक्षणाच्या सोयीही उपलब्ध होतील इकडे लक्ष पुरविलें पाहिजे. बेकारी—विमा पद्धतींतही सुधारणा होणें इष्ट आहे. एक धंदा सोडून दुसरा अधिक फायद्याचा धंदा पाहण्याकरितां जर एखादा मजूर कांहीं दिवस कामाशिवाय राहिला तर त्याला विमा कंपनीनें अशा वेळीं मदत केली पाहिजे. वरील गोष्टी अमलांत आणिल्यास बेकारी बरीच कमी होईल. **( ३ ) भांडवलाची अधिक सोय**—उत्पादनाचीं साधनें आतां इतकीं उपलब्ध झालीं आहेत कीं, पैदास झालेल्या मालाचा उठाव होण्याकरितां अधिक श्रीमंत जगाची जरुरी आहे. गिऱ्हाइकांत जास्ती माल घेणेची पात्रता यावी म्हणून, त्यांना हलक्या व्याजाच्या दरानें कर्ज मिळणेची सोय करण्यांत राष्ट्राचें हित आहे. हप्तेबंदीनें, (हायर पर्चेज पद्धतीनें ) माल खपविण्याची सोय केल्यास तो अधिक खपून कारखान्यांची भरभराट होते. या पद्धतीनें मोटारी गिऱ्हाइकांना मिळूं लागल्यामुळें, त्यांचा खप अलीकडे फार वाढला आहे. घरांबाबतही अशीच पद्धत स्वीकारल्यास गरीब लोकांना स्वतःच्या मालकीचीं घरें कांहीं दिवसांत करतां येतील. हायर पर्चेज पद्धतीनें व्यापार करणाऱ्या

संस्थांना सरकारांतून हलक्या दरानें भांडवल मिळण्याची सोय होणें जरूर आहे. वरील संस्थांप्रमाणें व्यक्तिमात्रांनाहि, हलक्या दरानें रक्कम मिळण्याची सोय होणें जरूर आहे. ज्या वस्तू सत्वर नाश पावत नाहींत अशा वस्तू खरेदी करण्यास उत्तेजन देण्याकरितां, लोकांना सवलतीनें रक्कम मिळू शकेल अशी एखादी योजना अमलांत आणणें जरूर आहे. घरांतील फर्निचर, भांडींकुंडीं, ग्रामोफोन, बाजाची पेटी, सायकल, मोटार वगैरे जिन्नस घेण्याकरितां लोकांना उत्तेजन द्यावें व तें सवलतीनें रक्कम मिळणेची सोय करून व हायर पर्चेज पद्धत अमलांत आणून द्यावें. या योजनेमुळें मालाचा उठाव होण्यास बरीच मदत होईल. अमेरिकेंत ही पद्धत यशस्वी झाली आहे.

देशांत मोठमोठ्या कारखान्यांनाही हलक्या दरानें भांडवल मिळण्याची सोय होणें अवश्यक आहे; आणि सरकारांतून अशा भांडवलाची सोय झाली पाहिजे. सरकारांतून तीन चार टक्के व्याजानें रकमा मिळाल्यास पुष्कळ कारखाने जोरांत चालूं लागतील व बेकारांना काम लागेल. सरकारानें पाहिजे तर फायद्यांत आपली वांटणी ठेवावी. कारखानदार खुषीनें असा फायदा देण्यास तयार होतील. **राष्ट्रीय गहाणांची बँक**—पुष्कळशा कारखान्यांचें भांडवल, यंत्रें व इमारती यांत गुंतलेलें असतें. मंदीच्या दिवसांत या तारणावर कर्ज मिळणें कठीण पडतें. अशा प्रसंगीं यंत्रें इमारती वगैरे तारण लाऊन घेऊन लांब मुदतीचें कर्ज देणारी राष्ट्रीय गहाण बँक देशांत असणें अत्यंत जरूर आहे. अशा बँकेंतून कारखान्यांना व धंदेवाल्यांना कर्ज मिळाल्यास ते मंदींतून पार पडतील; व ते आजिबात बंद पडून बेकारी वाढण्याचें अर्थातच थांबेल. हिंदुस्थानांत अशा बँकांची फार जरूरी आहे.

(४) **करांचें ओझें कमी करणें**–आज प्रत्येक सरकारानें आपलें करांचें ओझें कमी करणें फार अगत्याचें आहे. प्राप्तीवरील कर कमी झाला पाहिजे. तसेंच शेतसाराही कमी केला पाहिजे. पोस्टाचे दर उतरवून पूर्ववत् करणें, साखरेवरील अंतर्गत जकात उठवणें, करमणुकी-

चरील कर कमी करणें, मोटारीवरील कर कमी करणें व टोल नाकीं उठवणें अशा गोष्टी केल्यास लोकांजवळ पैसा खेळता राहून बेकारीला आळा बसेल; आणि विश्वासाचें व आशेचें वातावरणही उत्पन्न होईल.

(५) हल्लीं बऱ्याच देशांतील सरकार कांहीं तरी काल्पनिक मर्यादा ठरवून नोटा पाडतें. जितक्या किंमतीच्या नोटा प्रसृत होतात तितक्या किंमतीचें सोनें सरकारजवळ असतेंच असें नाहीं. तेव्हां हीच मर्यादा वाढवून नोटा अधिक पाडल्यास भांडवल जास्त उभें राहील व तें लोकांना मिळून धंदे वाढतील. अर्थात् पुष्कळ लोकांना काम लागेल.

(६) **आंतरराष्ट्रीय सुवर्ण-चलनाची योजना**–जगांतील सोन्याचा सांठा व दरसाल त्याची खाणींतून होणारी निपज, हीं जगांतील घडामोडीच्या मानानें फारच तुटपुंजीं आहेत; तीं इतकीं कीं, फक्त एकाच राष्ट्रानें सोन्याचा उपयोग चलनाकडे करणेंचें ठरविल्यास त्या एकाच राष्ट्राची गरज या दोहोंनीं भागणार नाहीं. तेव्हां सर्व राष्ट्रांची एक आंतरराष्ट्रीय परिषद् बोलविणेंत यावी. तींत प्रत्येक राष्ट्राला, हल्लींच्या चलनाच्या रूढ कल्पना जमेस धरून, किती सोनें पाहिजे हें ठरविण्यांत यावें; आणि असें ठरल्यावर मग त्या त्या देशाच्या मध्यवर्ती बँकांमार्फत सोन्याची वाटणी करण्यांत यावी. असें केल्यास सोन्याचा तुटवडा भासणार नाहीं. शिवाय प्रत्येक राष्ट्राची आपला सुवर्णसाठा वाढविण्याची हांव कमी होईल. त्यामुळें परस्परांमधील व्यापार अधिक प्रमाणांत चालूं लागेल व बेकारी हटेल.

वर केलेल्या चर्चेवरून वाचकांचे ध्यानांत आलें असेलच कीं, बेकारी हा रोग असाध्य व दुर्धर असा नाहीं. तो महायुद्धाचा परिणाम आहे असेंही नाहीं; तर महायुद्धामुळें जी व्यापाराची घडी विसकटली त्याचा परिणाम आहे. मालाच्या ठोक किंमती, फुटकळ किंमती, मजुरीचे दर व राहणीचा खर्च हीं एकाच प्रमाणांत चढउतार करूं लागलीं तर व्यापाराची घडी विसकटत नाहीं; पण हें प्रमाण सुटलें कीं ती विसकटते व त्याचें पर्यवसान बेकारींत होतें. जगांत सुखसोयीच्या वस्तू म्हणजे भरपूर पुष्टिदायक अन्न व वस्त्र, आरोग्यदायक

घरें, मोटारी वगैरे गोष्टींचा तुटवडा आहे. बेकारांना कामाला लावून वरील तुटवडा नाहींसा करतां येईल. योजक मात्र पाहिजे. वरील तुटवडा नाहींसा करण्यास उपाय म्हणून संतती–नियमनाबरोबर यंत्रांचें नियमन करावें असें कांहीं मंडळी प्रतिपादितात;त्यांचें म्हणणें असें कीं यंत्राचा जितका अधिक उपयोग केला जातो तितके कामगार, मजूर, कामावरून दूर होतात. त्यामुळें बेकारी वाढते. पण जरा जास्त खोल विचार केल्यास ही विचारसरणी सदोष असल्याचें दिसून येईल. एक तर सगळींच यंत्रें कामगार वांचविणारीं असत नाहींत, व मजुरांची जागा तीं घेत नाहींत. पुष्कळ वेळां भांडवलाची बचत यंत्रांच्या साह्यानें होते. उदाहरणार्थ आजचें तार ऑफिस घ्या. पूर्वीं दूरवर संदेश पाठविण्याचा झाल्यास घोडेस्वार अगर सांडणीस्वार याची योजना करावी लागे आणि ही गोष्ट मोठ्या खर्चाची असे. पण तार ऑफिस सुरू झाल्यापासून संदेश अगदीं थोड्या खर्चांत पाठवितां येतात. शिवाय हें ऑफिस उघडल्यापासून बऱ्याच जणांना काम मिळालें आहे. म्हणजे तारायंत्रामुळें बेकारी न वाढतां त्याच्या उलट स्थिति झाली आहे व भांडवलांत बचत झाली आहे. दुसरें असें कीं, यंत्रांच्या साह्यानें माणसांची सांपत्तिक स्थिती सुधारून त्यांची राहणी उच्च दर्जाची झाली आहे. ग्रामोफोन, रेडिओ, मोटारीसारखीं यंत्रें खपूं लागल्यामुळें मजुरांना कामही जास्त मिळत आहे. मनुष्य जातीस यंत्रापासून सगळ्यांत मोठा फायदा हा झाला आहे कीं गुलामासारखें आतां राबावें लागत नाहीं. लाकूड कापणें, गलबतें वल्हवणें हीं रक्त शोषणारीं कामें यांत्रिक सुधारणेमुळें आतां करावीं लागत नाहींत. तेव्हां यंत्रांचें नियमन करणें केव्हांही अदूरदर्शीपणाचें होईल. याबाबत लंडन युनिव्हर्सिटीचे प्रोफेसर टी. ई. ग्रेगरी यांचा सन १९३३ मध्यें प्रसिद्ध झालेला लेख वाचकांनीं अवश्य पाहावा. हिंदुस्थानांतील आपल्यापैकीं कांहीं लोक यंत्र–नियमन करावें असा आत्मघातकी सल्ला देतात. परंतु हिंदुस्थानची आजची यांत्रिक सुधारणेबाबतची मागसलेली स्थिति लक्षांत घेतां, तूर्त तरी याचा विचार

करणें अप्रस्तुत होईल. खुद्द म० गांधी यंत्रांच्या प्रसाराविरुद्ध नाहींत. त्यांचें एवढेंच म्हणणें आहे कीं लोकांनीं स्वतः यंत्रांचे गुलाम न होतां *यंत्रांनाच उलट त्यांनीं गुलाम केलें पाहिजे. हाही गांधीजींचा उपदेश वाचकांनीं ध्यानांत घ्यावा.

---

*यंत्रें हीं केव्हांही मानवी जीवितास उपकारकच झालेलीं आहेत. केव्हां केव्हां तीं अपकारक झालेलीं दिसतात. पण त्याचें कारण हीं निर्जीव यंत्रें नसून त्यांचा दुरुपयोग करणारी मानवी दुष्ट स्वार्थबुद्धीच होय. यंत्रनियमन करावें असें प्रतिपादणाऱ्यांनीं हें विचारांत घ्यावें. अहमदाबाद म्युनिसिपालिटीचे सुप्रसिद्ध इंजीनियर जे. एस. मलिक यांचा पुढील अभिप्रायही मनन करावा व मग काय तें मत बनवावें.

"The present age is a machine age. And the Mechanical Engineer is the father of our present civilization. There are croakers everywhere and many people think that the misery of the world is chiefly due to the machine, but that is really not the case. It is the selfishness of man that has contributed to his misery and machine cannot be blamed for it. The proper function of the machinery, is to make mankind happy, by doing as much as possible of the unpleasant monotonous and uneducative work of society, leaving as much as possible of the skilled, enjoyble and educative work to be done by men. We cannot compete with highly developed mechanised Nations with the help of the Charakha and the bullock-cart. In the real sphere of mechanical engineering, we are still far behind. Our Conservative outlook has been our ruin for generations and unless we take a progressive attitude and change the mentality of the whole Nation, we shall never be out of the wood".

(From the Presidential Address to the 15th Annual Conference of Indian Mechanical Engineers, held at Ahmedabad last October 1934).

---

# प्रकरण दुसरें

## ब्राह्मणांतील बेकारी : कारणें व उपाय

"The present System of education in its very inception was moulded with the special object of preparing boys for external examinations and of training them for 'Clerical' vocations. The *Matriculate* produced by the System is a *derelict*, *a wanderer* on the face of the earth, *unemployed*, because he is *unemployable.*"

—**SIR GEORGE ANDERSON,**

Educational Commissioner with the Government of India.

### प्रास्ताविक

गेल्या प्रकरणांत बेकारीबाबत जी चर्चा केली, ती बऱ्याच अंशीं ज्या देशांत यांत्रिक युग सुरू होऊन बरेच दिवस झाले आहेत, आणि मोठमोठे कारखाने अस्तित्वांत आले आहेत, अशा देशांना लागू आहे. हिंदुस्थान हा देश कृषिप्रधान आहे. येथें अद्याप यांत्रिक युग सुरू होणेचें आहे. पाश्चात्य देशांप्रमाणें येथें मोठमोठे कारखाने अस्तित्वांत आलेले नाहींत. सबब पाश्चात्य देशांतून जशी कारखान्यांतील मजुरांत बेकारी आढळते तशी येथें आढळत नाहीं. हिंदुस्थानांतील शेंकडों ऐंशी लोक शेतकींत गुंतलेले असून दोन टक्के सरकारी कारभाराच्या नोकरींत, दोन टक्के व्यापारांत, दोन टक्के संघटित धंद्यांत, सहा टक्के वाहतुकीच्या कामांत व नऊ टक्के इतर व्यवसायांत गुंतलेले आहेत. येथें बेकारी जी आढळते ती बुध्युपजीवी लोकांत विशेषेंकरून आढळते आणि महाराष्ट्रांत असे लोक ब्राह्मणांतच बहुतेक असल्यानें ती त्यांच्यांत फार बोकाळली आहे.

महाराष्ट्र हा देश पहिल्यापासूनच उद्योगधंद्यांत मागासलेला दिसतो. शिवशाहीपूर्वीचा काल, शिवशाहीचा व पेशवाईचा काल ध्यानांत आणल्यास असें दिसून येतें कीं, महाराष्ट्रीय लोक शेती व बारगिरी या दोनच धंद्यांत गुंतलेले असत. व्यापारधंदे तेव्हांपासूनच मारवाडी, गुजराथी, जैन, लिंगायत, वाणी वगैरे परप्रांतीय लोकांचे हातांत गेलेले दिसून येतात. तेव्हां व्यापारधंद्यांत महाराष्ट्राचें आक्रमण, परप्रांतीयांनीं बऱ्याच वर्षांपासून केलेलें आहे. आजच तें झालें आहे असें नाहीं. आम्ही महाराष्ट्रीय लोक व्यापाराबद्दल पहिल्यापासूनच उदास आहोंत यांत शंका नाहीं. शिवशाहींत व पेशवाईत बरेच लोक शेतींत व बारगिरींत गुंतल्यामुळें व्यापाराकडे लक्ष देण्याची जरुरी तेव्हां इतकी भासली नसावी. मृगाला शेतीला सुरुवात करून दसऱ्याला शिलंगणाला मुलुखगिरीवर महाराष्ट्रीय लोक बाहेर पडत ते पुन्हां मृगाचे संधीस परत येत. त्यामुळें वर्षभर काम बहुतेकांना मिळत असे. ही परंपरा पेशवाईच्या अंतापर्यंत चालत आली.

शिवशाहींत व पेशवाईंत राज्यकर्त्यांनीं मोठमोठे धंदे काढण्याला प्रोत्साहन देणें व व्यापारवृद्धीकडे लक्ष पुरविणें या गोष्टींची उपेक्षा केलेली दिसते. बऱ्याच इतिहासकारांनीं जमीन महसुलाकडे—फॉयनॅन्सकडे-दुर्लक्ष केलेबद्दल मराठ्यांना दोष दिला आहे. पहिला बाजीराव कर्जापायीं मेटाकुटीस आल्याची गोष्ट इतिहासप्रसिध्दच आहे. व्यापार-उदिमाकडे खुद्द राजकर्त्यांचेंच दुर्लक्ष झाल्यामुळें त्याचा परिणाम इतर जनतेवरही अर्थात् झाला. त्यावेळचे ब्राह्मण व मराठे तरुण, व्यापार-उदिमांत न पडतां शेती तरी करीत व त्यांच्यांतील अधिक कर्तबगार जे असत ते सैन्यांत भरती करून घेऊन मुलुखगिरींत नशीब काढीत. अपवादात्मक बारामतीकर नाईक, तासगांवकर जोग व हुपरीकर, पुण्याचे साठे, गद्रे व परांजपे, बडोदे नागपूरकडे तांबे, किबे व बुटी असे कांहीं ब्राह्मण पेढीच्या धंद्यांत गुंतलेले दिसत. तथापि पेशवाईचा अंत होईपर्यंत तरुणांना सैन्यांतील बारगिरी मिळत गेल्यामुळें विशेष बेकारी आढळून येत नव्हती. पेशवाईचा अंत होऊन आंग्लाई सुरू झाल्यावर

अर्थातच महाराष्ट्रीय ब्राह्मण व मराठे तरुणांना बारगिरीचा धंदा नाहींसा झाला. कांहीं कालपर्यंत दिङ्मूढ होऊन ही मंडळी उरलेल्या शेतीच्या धंद्यावर जेमतेम गुजारा करूं लागली. पुढें एल्फिन्स्टन साहेबांनीं राज्यकारभारांत तद्देशीय लोकांना जागा देण्याचा उपक्रम सुरू केला; आणि ब्राह्मणवर्ग हा थोडासा बुध्दिमान् असलेमुळें त्याचा नोकरींत लवकर शिरकाव झाला. सरकारास त्यावेळीं दुभाष्ये, कारकून वगैरे खालचे प्रतीचे नोकर बरेच लागत. हे कार्यक्षम असे उपलब्ध व्हावेत म्हणून सरकारांतून एक प्रकारें त्या दृष्टीनें शिक्षणक्रमाची व्यवस्था करण्यांत आली. याचा फायदा पहिल्या प्रथम ब्राह्मणांनीं घेतला. त्यावेळीं साधारण तीनचार इयत्ता इंग्रजी झालेल्या ब्राह्मणास शिरस्तेदार वगैरे हुद्याची जागा मिळत असे. त्यामुळें इंग्रजी शिक्षण घेणें ही एक मोठी फायद्याची गोष्ट होऊन बसली होती. भटभिक्षुकांचीं मुलें वैदिक अध्ययन सोडून देऊन इंग्रजी शिक्षण घेऊं लागलीं. मोठमोठे श्रीमंत ब्राह्मण आपल्या मुली एखाद्या पदवीधर मधुकऱ्यास देऊं लागले. कारण त्यावेळीं बी. ए., एलएल. बी., झालेल्या इसमास मामलेदारी, मुन्सिफी तेव्हांच मिळत असे. वकिली, डॉक्टरी वगैरे धंद्यांतही त्यावेळीं फार तेजी होती. अर्थात् ब्राह्मणांनीं त्यांतही आपला शिरकाव करून घेतला. नोकऱ्या पुष्कळ व शिकलेली मंडळी थोडी असा काल साधारणपणें चाळीस पन्नास वर्षांपूर्वीं होता. तेव्हांपासून ही स्थिति हळुं हळुं पालटत चालली असून गेल्या दहावीस वर्षांत नोकऱ्या मिळणें फार कठीण झालें आहे. आजकाल बी. ए. वीस पंचवीस रुपयांवर राहण्यास तयार असूनही त्यांस नोकरी मिळत नाहीं. वकिली वगैरे धंद्यांची स्थिति याहूनही शोचनीय झाली आहे. तेव्हां ही हलाखीची स्थिती कां प्राप्त झाली, सुशिक्षितांत व ब्राह्मणांत बेकारी इतकी कां माजली याच्या कारणांचा विचार करणें जरूर आहे. हीं कारणें साधारणपणें स्थूल मानानें पुढीलप्रमाणें दिसतातः—

## कारणें

१. **मागणीपेक्षां मोठ्याच प्रमाणांत अधिक पुरवठा**—ब्राह्मणांना व सुशिक्षतांना उपलब्ध असणाऱ्या नोकऱ्यांची संख्या आहे तीच आहे.

त्यांत विशेष वाढ अशी झालेली नाहीं; पण अलिकडे शाळा व कॉलेजें पुष्कळ निघाल्यामुळें नोकरीकरितां लायक असे तरुण दर वर्षी बरेच तयार होऊं लागले आहेत; आणि ते मागणीपेक्षां किती तरी पट अधिक तयार होत आहेत. सध्यां मुंबई इलाख्यांत मुंबई युनिव्हर्सिटीस जोडलेलीं आर्ट्स कॉलेजें ( बी. ए. चा कोर्स शिकविणारीं ) वीस असून, कायदा, इंजिनीयरिंग व डॉक्टरी शिकविणारीं कॉलेजें अकरा आहेत. आर्ट्स कॉलेजांत १५५०० व इतर कॉलेजांतून १४५०० इतके विद्यार्थी, अंदाजीं दरसाल शिकत असतात. १९३२–१९३३ सालीं एम्. ए. १०९, बी. ए. ऑनर्स ४५५, बी. ए. पास ४६०; एम्. एससी. २३; बी. एससी. ३५६ व मॅट्रिक ७६३९ इतके विद्यार्थी त्या त्या परीक्षांतून पास झाले; म्हणजे सरासरीनें दरसाल एक हजार पदवी-धर व साडेसात हजार मॅट्रीक बाहेर पडतात, असें मानण्यास कांहीं हरकत नाहीं. यांतील बहुतेकांचें ध्येय नोकरी करणें हेंच असतें. खासगी व सरकारी नोकरींतील पदवीधर नेमण्याजोग्या जागा, दरसाल सहा टक्के रिकाम्या होतात; म्हणजे हजार पदवीधरांपैकीं फार झालें तर ६० ते १०० लोक या नोकऱ्यांतून मुरूं शकतील. पण बाकीच्या ऊशें पदवीधरांची वाट काय? याचें उत्तर बेकारीच होय.

अलीकडे सरकारी धोरण ब्राह्मणेतर लोकांना नोकरी प्रथम द्याव-याची असें ठरलें आहे. तेव्हां ब्राह्मण पदवीधरांना सरकारी नोकरी मिळण्याची आशा जवळ जवळ नाहींच. खासगी संस्थांतून फार झालें तर दोन टक्के ते मुरतील; म्हणजे ब्राह्मण पदवीधरांपैकीं शेंकडा शहाण्णव बेकार दरसाल राहतात, यांत शंका नाहीं. मग मॅट्रिक झालेल्यांमध्यें कितीतरी पट बेकार रहात असतील. दरसाल पदवी घेणाऱ्या हजार विद्यार्थ्यांपैकीं स्थूल मानानें तिसरा हिस्सा (३००, ३५०) ब्राह्मण पदवीधर असतात. यांपैकीं पंचवीस तीस लोकांनाच दरसाल नोकरी लागते. म्हणजे अडीचशेंहे पदवीधर बेकार राहातात. तीच मॅट्रीकची स्थिति; प्रमाण मात्र पदवीधरांपेक्षां कितीतरी जास्त.

वरील आंकडे-मोडीवरून मागणीपेक्षां कितीतरीपट पुरवठा अधिक होतो हें वाचकांच्या ध्यानांत आलें असेलच. उद्यां सरकारानें

मोठ्या मेहेरनजरेनें सर्वच्या सर्वच नोकऱ्या ब्राह्मणांना देण्याचें ठरविलें तरी आज इतके सुशिक्षित नोकरीस पात्र असे ब्राह्मण आहेत कीं, इतक्या नोकऱ्यांवर ते लागूनसुद्धां पुन्हां असंख्य ब्राह्मण बेकार राहतील. तेव्हां आईबापांनीं व पालकांनीं आपल्या मुलांची ही नोकरीमागें धांवण्याची शर्यत आतां बंद करावी; आणि मानसिक धैर्य, दूरदृष्टि व धोरण दाखवून ठरलेल्या चाकोरींतून जाण्याचें याउपर बंद करावें.

**२. शेती व इतर पिढीजाद धंद्यांतून निघून नोकरीच्या मागें लागण्याकडे सर्वांचा रोख**—ज्यांची घरची शेती आहे, इतर पिढीजाद धंदे आहेत, अशांचीं मुलें हल्लींच्या शिक्षणचक्रांत एकदां सांपडलीं कीं तीं आपल्या बापाच्या जुन्या धंद्यांत पडण्यास अगदीं नाखूष असतात. जुन्या पिढीजाद धंद्यांबद्दल व शेतीबद्दल त्यांच्यांत आवडीऐवजीं तिटकाराच उत्पन्न होतो. कोकणांतील बरेच ब्राह्मण आजवर शेती करून उदरनिर्वाह करीत. त्यांचीं मुलें शिक्षणक्रमांतून बाहेर पडलीं कीं शेतीकडे ढुंकूनसुद्धां पाहात नाहींत. शेतकी पदवीधर (बी. एजी.) झाला तरीसुद्धां त्याची स्थिती हीच असते. वरीलप्रमाणेंच भटभिक्षुकीवर, उपाध्येपणावर व कथापुराणांवर चरितार्थ चालविणाऱ्या ब्राह्मणांच्या मुलांची स्थिती असते. हरिदास, कथेकरी याचा मुलगा बापाचा धंदा चालविण्यास नाखूष असतो. भिक्षुकाचा मुलगा पळीपंचपात्री व दर्भ घेऊन उपाध्येपण करण्यास लाजतो. तशांत हल्लींच्या शिक्षणानें विद्यार्थ्यांतील उन्हांतान्हांतून अंगमेहेनतीचीं कामें करण्याची धमक व रग पार नाहींशी झालेली असते. त्यामुळेंही पिढीजाद शेतीचा धंदा करण्यास, शिकलेला ब्राह्मण तरुण, असमर्थ म्हणून नाखूष असतो.

**३. शारीरिक कष्टांबद्दल तिटकारा व नावड**—आपल्याकडे चातुर्वर्ण्यव्यवस्था जेव्हां जारीनें अमलांत होती त्यावेळीं परिचर्या म्हणजे अंगमेहनतीचीं कामें शूद्र करीत असत. तदनंतर बऱ्याच कालपर्यंत हलकीं व काबाडकष्टाचीं कामें शूद्र, अतिशूद्र करीत आले आहेत. परंतु ज्याला दोन अक्षरांची ओळख झाली आहे त्याला हीं कामें करण्याची लाज वाटूं लागते. इंग्रजी शिक्षण मिळाल्यापासून सुशिक्षित तरुणांत

याबद्दल तुच्छताच उत्पन्न झालेली दिसते. पदवीधर, बेकार असला तरी, स्टेशनावर उतरल्याबरोबर लहानशी हँडबॅग नेण्याससुद्धां त्याला हमाल लागतो. घरीं स्वतःचें धोतर धुणें, बाजारांतून भाजी हमाल न करितां आणणें, हीं कामें त्यास कमीपणाचीं वाटतात. सुशिक्षित ब्राह्मणांपैकीं शेंकडा पंचाणव लोक वरील गोष्टीस अपवादात्मक सांपडणार नाहींत. मारवाडी कितीही श्रीमंत असला, त्याच्या बायकोच्या अंगावर सोन्याचे लंगर असले, तरी प्रवासांत असो अगर रोजच्या व्यवहारधंद्यांत असो, आपला बोजा उचलणें वगैरे कामें तो हमालाशिवाय स्वतः करतो; परंतु आम्हां ब्राह्मणांस व इतर जातीच्या शिकलेल्या लोकांस असें करणें कमीपणाचें वाटतें. सोनारकी, सुतारकी, लोहारकी वगैरे धंद्यांत बरकत अधिक असली तरी, वरील धंदे कमीपणाचे मानून आधुनिक सुशिक्षित ब्राह्मण पंधरा रुपयांची कारकुनी अधिक पसंत करितात. ज्यांत कौशल्य लागतें व बुद्धी चालविणेस वाव आहे, असा धंदा सुद्धां, त्यांत काबाडकष्ट असले कीं ब्राह्मण लोक टाळतात. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे शर्ट व कोट घालून मुलें शाळांतून जाऊं लागलीं कीं अंगमेहनतीस त्यांनीं रामराम ठोकलाच असें समजावें. हल्लीं याबाबत तरुणांचा दृष्टिकोण बदलत चालला आहे ही त्यांतल्या त्यांत समाधानाची गोष्ट आहे.

४. **प्रचलित शिक्षण पद्धति**--मोठमोठ्या विद्वानांचें म्हणणें असें आहे कीं हल्लींची शिक्षणपद्धति बऱ्याच अंशीं ब्राह्मणांतील व सुशिक्षितांतील बेकारीस कारणीभूत आहे. लॉर्ड मेकॉलेसाहेबांनीं दुभाष्ये व कारकून निर्माण करण्याकरितां प्रचलित शिक्षणपद्धति आंखली असें बऱ्याच तज्ज्ञांचें मत आहे. व्हाइसरायसाहेबांचे हल्लींचे शिक्षणखात्याचे कमिशनर व पंजाब इलाख्याचे शिक्षणखात्याचे माजी डायरेक्टर सर जार्ज अँडरसनसाहेब वरील आक्षेपांत बरेंच तथ्य असल्याचें कबूल करतात. त्यांनीं प्रकरणाचें आरंभीं दिलेल्या उताऱ्यांत मॅट्रिकचें हृदयद्रावक परंतु अचूक वर्णन पुढीलप्रमाणें केलें आहे:--'मॅट्रीक हा पृथ्वीचे पाठीवर भटक्या मारणारा बेकार प्राणी आहे. बेकार कां ? तर कोणताही उद्योग करण्यास अपात्र म्हणून". सर डॅनीयल हॅमिल्टन

या दुसऱ्या इंग्रज गृहस्थांनीं आर्ट्स् ग्रॅजुएटचें (बी. ए. चें) असेंच समर्पक वर्णन केलें आहे. ते म्हणतात कीं ग्रॅज्युएट ऑफ आर्ट्स (बी. ए.) हा कलाहीन पदवीधर असतो. कारण त्याला स्वतःचें व आपल्या कुटुंबाचें पोट भरण्याची आर्ट (कला) अवगत नसते. हल्लींचें शिक्षण फक्त कारकून तयार करतें. ज्ञानाकरितां, संस्कृति-करितां शिक्षण कोणी घेत नाहीं. तर सरकारी नोकरींत प्रवेश मिळण्या-करितांच तें घेतलें जातें. शाळाकालेजांतून शिकणाऱ्या प्रत्येक मुलांत शेंकडा शंभर टक्के सरकारी नोकरींत शिरण्याची स्वयंभू इच्छा दिसून येते.

आतां हल्लींच्या शिक्षणपद्धतींतील दोष काय आहेत ते पाहूं. सध्यां जी पद्धत हिंदुस्थानांत अमलांत आहे ती सगळ्या जगांत त्याज्य व टाकाऊ अशी ठरलेली आहे. लोकांच्या आर्थिक उन्नतीस तिचा काडी-इतकाही उपयोग होत नाहीं. सॅडलर कमिशनचे व सायमन कमिशनचे सन्माननीय सभासद व डाक्का युनिव्हर्सिटीचे माजी व्हाईस चॅन्सेलर सर फिलिप हारटॉगसाहेब म्हणतात कीं "हल्लींच्या शिक्षणापासून विद्या-र्थ्यांच्या मानसिक शक्तींत वाढ न होतां उलट ती घटतच जाते; व बुद्धींत वांझटपणा उत्पन्न होतो. हल्लींचें जें शिक्षण मिळतें त्यापासून तें घेणाऱ्यास उपकाराऐवजीं अपकारच होत आहे; आणि त्यामुळें विद्या-र्थ्यांचीं किंमत, आज बाजारांत कवडीमोल झाली आहे. शिक्षण ते घेते ना, तर ती अधिक होती." या तज्ज्ञ व अधिकारी पुरुषाच्या शेऱ्यांत अतिशयोक्ति बिलकूल नाहीं. आजचा विद्यार्थी नोकरीशिवाय पोट भर-ण्यास असमर्थ आहे. त्याच्यांत धमक नाहीं. सतत दीर्घोद्योग त्याचे हातून होत नाहीं. शक्य तितकें उत्तम काम करावें अशी त्याच्यामध्यें इच्छा नसते. त्याच्या डोक्यांत स्वतःचे मोठेपणाबद्दल भ्रामक व खुळ्या कल्पना असतात. अगदीं खालपासून–शेवटच्या पायरीपासून–काम कर-ण्याची त्याला लाज वाटते. अंगमेहनत, व काबाडकष्ट करण्यास तो लाजतो. सुरक्षित ठराविक वेतन हें त्याचें ध्येयवाक्य असतें. महत्वाकांक्षा, धोका पतकरण्याची तयारी, त्याच्यांत बिलकूल असत नाहीं. तो कॉलेजच्या शेवटच्या वर्षांत असला तरी आपण पुढें काय करणार व आपल्याला

कोणता धंदा आवडतो, याचा विचारसुद्धां त्याला शिवत नाहीं. त्याच्यामध्यें आत्मसंयमन व शिस्त बिलकूल नसते. संकट समयीं फार झालें तर एखाद्या जाणत्या मुलाप्रमाणें तो वागतो. इतका संकटानें तो भांबावून जातो. आपल्या आर्थिक उत्कर्षाच्या आड येणारी गतानुगतिकत्वाची व मानसिक गुलामगिरीची शृंखला तोडण्याचें सामर्थ्य त्याच्यांत नसतें. वरील सर्व वर्णन आजचे ब्राह्मण विद्यार्थ्याला व तरुणांला लागू पडत नाहीं असें कोण म्हणेल ? हे सर्व दोष विद्यार्थ्यांत उत्पन्न होण्यास हल्लींची शिक्षणपद्धति कारणीभूत असून, कोणीही शिक्षणप्रेमी लोक अगर संस्था सदर दोष घालविण्याकडे लक्ष देत नाहींत ही मोठ्या दुःखाची गोष्ट आहे.

साक्षरता वाढली पाहिजे; निरक्षरापेक्षां साक्षर मजूर काम अधिक चांगलें करतो ही गोष्ट खरी आहे. तथापि हल्लींच्या शिक्षणानें आमची आर्थिक उन्नति काय केली आहे ? प्रचलित शिक्षणानें कारखाने व उद्योगधंदे वाढविण्यास बिलकूल हातभार लावलेला नाहीं; काडीइतकीही मदत केलेली नाहीं. प्राथमिक शिक्षणाची वाढ होणें जरूर आहे. पण तसें न होतां दुय्यम शिक्षण देणाऱ्या शाळा, हायस्कुलें भराभर वाढत आहेत; आणि कसे तरी व कांहीं तरी चार मास्तर गोळा करून अशा शाळा सुरू केल्या जातात. कॉलेजांबद्दलही असेंच विधान केल्यास तें धाष्ट्र्याचें होणार नाहीं. चार बेकार अगर रिकामटेकडे एम्. ए. जमतात आणि आर्ट्स् कॉलेज तेव्हांच सुरू करतात. त्यामुळें त्यांची बेकारी जरी जाते तरी पण न कळत व त्यांची इच्छा नसतांनाही, असंख्य बेकार बी. ए. तयार करण्याची टांकसाळ मात्र सुरू होते. याबाबत गेल्या जूनांत ' टाइम्स ऑफ इंडिया 'मध्यें मि. एस्. जी. बर्वी, एम्. ए. यांनीं लिहिलेली ' आधुनिक बी. ए. ' ही लेखमाला अवश्य पाहावी. असा शिक्षणक्रम सुरू करण्याचे, टिळक चिपळूणकर यांच्या वेळचे, दिवस आतां गेले.

जंगल, खनिज वगैरे संपत्तीचा उपयोग राष्ट्राचे हिताकरितां केला जाईल, राष्ट्राच्या, समाजाच्या, आर्थिक गरजा भागवल्या जातील, असें शिक्षणाचें धोरणच आंखलेलें नाहीं. लोकांच्या आर्थिक गरजा भागवि-

णारें त्या त्या परिस्थित्यनुरूप शिक्षण आजकाल मिळत नाहीं. शिक्षण हें आयुष्यक्रम कसा आंखावा म्हणजे चारित्र्य कसें ठेवावें आणि पोट कसें भरावें या दोन्ही गोष्टी शिकविणारें असलें पाहिजे. तसा समन्वय आमच्याकडे नाहीं. हल्लींचें शिक्षण एकांगी, कुचकामाचें कसें आहे याबाबत अधिक सविस्तर माहितीकरितां कै० प्रिन्सिपॉल गोळे यांचें 'ब्राह्मण आणि त्यांची विद्या' हें पुस्तक वाचावें अशी वाचकांस आग्रहाची विनंती आहे.

हल्लींच्या परीक्षा-पद्धतीबद्दलही चार शब्द लिहिणें अप्रस्तुत होणार नाहीं; किंबहुना तें क्रमप्राप्तच आहे. परीक्षा अजिबात बंद कराव्यात असें आज कोणी म्हणत नाहीं. पण त्या घेण्याच्या पद्धतींत, आमूलाग्र बदल होणें फार जरूर आहे. सध्यां परीक्षा ह्या चरकासारख्या आहेत. यांतून विद्यार्थी अगदीं पिळून निघतात, व त्यांच्या शरीराचीं चिपाडें बनतात. त्या जळवाप्रमाणें विद्यार्थ्यांचें रक्तशोषणही केल्याशिवाय रहात नाहींत. 'घोका आणि ओका' हें हल्लींच्या परीक्षांचें धोरण असतें. परीक्षांची कुरघोडी व जुलूम विद्यार्थ्यांवर व शिक्षकांवर सारखाच झालेला दिसतो. शिक्षकाला आपल्या मर्जीनुरूप अभ्यासक्रम आंखतां येत नाहीं. परीक्षेंत काय विचारलें जाईल याकडे लक्ष ठेऊन त्याला शिकवावें लागतें. त्यामुळें विद्यार्थ्यांच्या ज्ञानांत त्याला खरी भर टाकतां येत नाहीं; विद्यार्थ्यांचीही प्रवृत्ति घोकंपट्टीकडे होते. खरें ज्ञान मिळवावें, मिळविलेलें ज्ञान पचवून त्याचा व्यवहारांत उपयोग करावा, या दोन्ही गोष्टी परीक्षांच्या कांचामुळें विद्यार्थ्यांस करतां येत नाहींत. नेमलेल्या बुकाबाहेरचें ज्ञान त्याला असत नाहीं. याचें कारण हल्लींची परीक्षापद्धति होय. विद्यार्थ्यांचा समाजांतील दर्जा बरेच वेळां परीक्षेंतील यशावर अवलंबून असतो. त्याचें लग्नही बहुतांशीं त्यावरच अवलंबून असतें; म्हणूनच कांहीं वेळां नापास झालेले विद्यार्थी जीव देण्यास प्रवृत्त होतात.

परीक्षा घेण्याचा हेतु विद्यार्थ्यांचें ज्ञान अजमावावें व एखाद्या जागेकरितां उत्तम उमेदवाराची निवड व्हावी हा असतो. पण हल्लींच्या परीक्षांतून ज्ञानाऐवजीं स्मरणशक्तीचीच परीक्षा केली जाते. लायकहि

उमेदवार निवडला जातोच असें नाहीं. कारण परीक्षेंतील यश गुणांपेक्षां नशिबावरच अधिक अवलंबून असतें. त्रावणकोरचे शिक्षण तज्ज्ञ श्री० कुप्पुस्वामी परीक्षेंतील यश लॉटरींतील यशाप्रमाणेंच जवळ जवळ समजतात. कारण कोणत्या परीक्षकाकडे विद्यार्थ्यांचा पेपर जाईल यावर त्याचें यश बरेच वेळां अवलंबून असतें. एखादा परीक्षक कडक तपासणारा असतो, तर दुसरा मार्क देण्यांत जास्त सढळ असतो. एकाच परीक्षकानें तोच पेपर निरनिराळ्या वेळीं तपासला तर त्यानें दिलेल्या मार्कांत अंतर पडतें. परीक्षक हे पुष्कळ वेळां मोठे लहरीही असतात. त्याबाबत पुढील एकदोन गोष्टी मजेदार आहेत. एक तत्वज्ञान विषयाचा परीक्षक जे विद्यार्थी ' बेकन हा पढतमूर्ख होता ' असें लिहितील त्यांनाच पास करीत असे. एवढें वाक्य न लिहितां इतर पेपर कितीही चांगला लिहिला तरी तो त्या विद्यार्थ्यांना नापास करी. दुसरा एक परीक्षक परीक्षेला बसलेल्या विद्यार्थ्यांच्या यादींतील एक पानाआड ज्यांचीं नांवें येतील तेवढ्याच विद्यार्थ्यांना पास करीत असे. एकदां एका सदसद्विवेक बुद्धीस स्मरून काम करणाऱ्या परीक्षकानें, विचारलेल्या प्रश्नांचीं उत्तरें, नमुनेदार म्हणून स्वत: लिहून काढलीं; आणि आपले जे इतर सहा जोडीदार परीक्षक होते, त्यांना पेपर तपासण्यास मदत व्हावी म्हणून, तीं त्यांचेकडे दिलीं. दैवदुर्विलासानें हीं त्याचीं नमुनेदार उत्तरें विद्यार्थ्यांच्या पेपरमध्यें मिसळून गेलीं आणि त्याच्या जोडीदारांनीं त्या परीक्षकाला शंभरापैकीं चाळीसपासून ऐशींपर्यंत मार्क चुकून दिले. या एकाच गोष्टीवरून परीक्षेंत यश व मार्क मिळविणें हें बरेच वेळां नशिबावर कसें अवलंबून असतें हें दिसून येईल. असो.

सध्यां जी परीक्षापद्धति हिंदुस्थानांत प्रचलित आहे ती इंग्रजी पद्धतीचें अंधानुकरण आहे. खुद्द आज इंग्लंडमध्यें परीक्षापद्धति बदलून घेण्याबद्दल जोराची खटपट सुरू आहे. इंग्रजी पद्धतिशिवाय, जर्मन, फ्रेंच व इटालियन अशा परीक्षांच्या निरनिराळ्या पद्धति त्या त्या देशांत सुरू आहेत. या सगळ्यांत जर्मन पद्धति ही उत्तम होय.

ती बऱ्याच अंशीं आपल्या जुन्या हिंदु पद्धतिप्रमाणें आहे. घोकंपट्टी, योगायोग व नशीब यांना तींत बिलकूल थारा नाहीं. तेथें शिक्षणक्रमांत परीक्षा फक्त दोनच असून परीक्षेंत विद्यार्थी नापास झाल्यास त्याचें दूषण त्याच्या शिक्षकाकडे जातें.

नुसता पदवीधर अगर मॅट्रीक इसम आहे, इतक्यावर सरकारनें त्याला नोकरींत घेऊं नये. तर आणखी स्वतंत्र प्रवेशपरीक्षा ठेवावी. असें केल्यानें परीक्षांचें स्तोम बरेंच कमी होईल. याबाबत डॉक्टर झियाउद्दीन अहंमद, सी. आय्. ई. एम. ए. ( केंब्रिज ), पी. एच. डी. ( गोटिंजेन ), माजी व्हाइस चॅन्सेलर अलीगड युनिव्हर्सिटी व एम्. एल्. ए. यांनीं लिहिलेलें ' सिस्टिम्स् ऑफ एक्झॅमिनेशन्स ' हें सुंदर पुस्तक अवश्य वाचावें, अशी जोराची शिफारस आहे.

प्रचलित शिक्षण हें बऱ्याच अंशीं बेकारीचें कारण आहे असें वर नमूद केलें आहे. तथापि सर्वस्वीं त्याच्याच माथीं दोषाचें खापर फोडणें वाजवी होणार नाहीं. आर्थिक बाबतींत, उद्योगधंदे व कारखाने या बाबतींत, हिंदुस्थानची आजची जी सर्वस्वीं मागासलेली स्थिति आहे, ती बऱ्याच अंशीं मध्यम वर्गांतील व ब्राह्मणांतील बेकारीस जबाबदार आहे. ज्या देशांत यांत्रिक युग सुरू होऊन देश आर्थिक उन्नतीप्रत पोचला आहे, त्यांत निरनिराळे उद्योगधंदे आपोआपच उपलब्ध होतात. इंग्लंडच्या " उद्योगधंदे व मजूर " या खात्याच्या प्रधानानें १९२७ सालीं एक उद्योगधंद्याचा कोश प्रसिद्ध केला आहे; त्यांत आरमार, सैन्य, सिव्हिल सर्व्हिस आणि डॉक्टरी, वकिलीसारखे तत्सम धंदे वगळून इतर सोळा हजार धंद्यांची गणती दिली आहे. आपल्या येथील खानेसुमारीचा रिपोर्ट पाहिल्यास त्यांत चाळीसावर धंद्यांची मोजदाद सांपडणार नाहीं. या एकाच गोष्टीवरून सर्वस्वीं बोध होण्यासारखा आहे.

**५. सामाजिक कारणें**--(१) आर्थिक उन्नतीच्या मार्गांत जातिसंस्था व रूढी यामुळें बरेच वेळां अडचण उत्पन्न होते. ब्राह्मणांचें कर्तव्य यजनयाजन, वेदाध्ययन व अध्यापन हें आहे. मग त्यानें इतर धंदे कसे

करावेत, असा विचार मनांत आल्याशिवाय राहात नाहीं. आतां याबाबत बरीच शिथिलता उत्पन्न झाली आहे हें खरें. तथापि यामुळेंच सुतारकी, लोहारकी व गवंडीकाम करण्यास ब्राह्मणांचें मन घेत नाहीं. (२) **निवृत्तिपर विचार**—जग हें क्षणभंगुर आहे, 'एक दिन जाना रे भाई,' मग उगीच यातायात कां? या विचारानेंसुद्धां आर्थिक उन्नतीस पायबंद बसतो. तथापि हल्लींच्या धर्मलंड (गॉडलेस) शिक्षणानें ही स्थिति पालटली आहे यांत शंका नाहीं. (३) **अविभक्त कुटुंब पद्धति**—या पद्धतींत गुणाबरोबर दोषही आहेत. ऐदीपणा, ऐतखाऊपणा, यामुळें वाढतो. वैयक्तिक जबाबदारी, धडाडी वगैरे गुणांचा लोपही यामुळें होतो. अलीकडे ही पद्धत नाहींशी होत चालली आहे ही एक प्रकारें समाधानाची गोष्ट आहे.

६. **वाढती लोकसंख्या**—हिंदुस्थानांतील लोकसंख्या एकसारखी वाढत आहे. पण धान्याची निपज त्या प्रमाणांत मात्र होत नाहीं; शिवाय वाढत्या लोकसंख्येस पुरण्याला इतर धंदे उपलब्ध नाहींत. शेती हाच काय तो मायपोट धंदा लोकांना उरला आहे. त्यांत बेसुमार गर्दी झाली असून, या सर्वांचा परिणाम म्हणजे लोकांची राहणी कमालीची हीन दर्जाची होत चालली आहे. खाणारीं तोंडें किती व दरसाल धान्य उत्पन्न होतें किती याचें प्रमाण नेहमीं बसवावें लागतें. गेल्या शतकांत युरोपमध्यें लोकसंख्येंत बरीच वाढ झाली होती. तेव्हां उद्योगधंदे, कारखाने व वसाहती यांत ती मुरून गेली. येथें तशी स्थिति नाहीं. हिंदुस्थानांतील वाढत्या लोकसंख्येचे परिणाम काय होतील याचें भीषण चित्र वैद्यकखात्याचे मुख्य डॉ. मॅगो यांनीं काढलें आहे. कांहींच्या मतें 'संततिनियमन' हा उपाय आहे. पण हा फार वादग्रस्त प्रश्न आहे. संततिनियमनाचे दुष्परिणाम आज युरोपमध्यें दिसून येतात. संतति-नियमनामुळें आपला देश म्हाताऱ्यांचें राष्ट्र होतें कीं काय अशी भीति फ्रेंच सरकारला पडली आहे. कारण दरवर्षी मृत्युसंख्येपेक्षां फारच थोडीं मुलें जन्मतात. इटाली व जर्मनीमध्यें लोकसंख्या वाढावी म्हणून चारापेक्षां अधिक मुलें असणाऱ्या कुटुंबास सरकार बक्षिसें व भत्ता देतें. आणखी तीस वर्षांनीं इंग्लंडच्या लोकसंख्येस ओहोटी लागणार असा इषारा

नगर वाचनालय, सातारा.

नुकताच 'लॅन्सेट' वर्तमानपत्रानें दिला आहे. तेव्हां आम्ही संततिनियमन अवलंबणें कितपत श्रेयःस्कर आहे हा प्रश्नच आहे. वाढती लोकसंख्या सुरविणेस उद्योगधंदे व कारखाने वाढविणें हाच उत्तम उपाय होय.

भा ७३५

## उपाय.

१ शेतकी-वसाहती—बेकार मॅट्रीक व बी. ए. तरुणांपैकीं ज्यांना शेतीची खरी आवड आहे, निदान आवड आहे असें वाटतें, त्यांच्याकरितां शेतकी वसाहती वसविणेंत याव्यात. लागवडीस येणारी अशी पड जमीन अद्यार आपल्या येथें बरीच आहे. ती घेऊन अदमासें माणशीं १० एकर जमीन प्रत्येक तरुणास लागवडीस द्यावी. सुरवातीस बीं, बियाणें व शेतकीचीं हत्यारें याकरितां भांडवलही अशा तरुणांस पुरविण्यांत यावें; मात्र शेतकी कशी करावी याचें शिक्षण अशा तरुणांना दिलें गेलें पाहिजे. सबब या शिक्षणाची योजना या वसाहतींत होणें अगदीं जरूर आहे. सर डॅनियल हॅमिल्टनसाहेबांचें असें मत आहे कीं, १० बिघे जमीन त्यांतच एक घर व विणण्याची कला, इतकीं साधनें माणसास प्राप्त झालीं कीं, तो आपलें व कुटुंबाचें पोट अगदीं सुखानें भरूं शकतो. 'एफ्. सी. एच्.' (फुड, क्लोदिंग, हौसिंग) 'अन्न वस्त्र आणि घर,' अशी नवीन पदवी निर्माण करून शेती व विणकाम यांचें शिक्षण विद्यार्थ्यांना द्यावें व त्यांत पास होतील त्यांना वरील पदवी देणेंत यावी. बंगाल्यांत गोसाबा येथें अशी योजना त्यांनीं स्वतः केली असून कांहीं विद्यार्थी असें शिक्षण घेत आहेत. संयुक्त प्रांताचे शिक्षण व शेती या खात्यांचे दिवाण नामदार सर जे. पी. श्रीवास्तव यांनीं सुशिक्षित बेकारांना काम देण्याकारितां शेतकी वसाहतीची योजना तयार केली असून ती फैजाबाद फार्मवर लवकरच सुरूं होणार आहे. बिहार व ओरिसा प्रांतांत लपारा येथें ७०००० रुपये खर्च करून अँग्लो इंडियन व युरेशियन लोकांनीं अशीच मोठी वसाहत केली आहे. तेव्हां शेतकी वसाहतीचा उपाय ब्राह्मणांतील बेकारी घालविण्याकरितां अवश्य करून पाहाण्यासारखा आहे. शेतकी खात्यांत पुष्कळ ब्राह्मण बी. एजी. अम्मलदार आहेत. त्यांनीं एखादी अशी योजना तयार

ब्राह्मणांतील बेकारी

१०३६३ भा ७३५

करून दिल्यास ब्राह्मण समाजावर फार उपकार होतील. ब्राह्मणांनीं व सुशिक्षितांनीं शेतकी हा कायमचा व्यवसाय करण्याचें झाल्यास, त्यांत बराच फायदा होतो असें दिसून आलें पाहिजे ही गोष्ट खरी आहे. त्याशिवाय ब्राह्मणांचें मन तिकडे वळणार नाहीं. तूर्त शेतींत कांहीं फायदा उरत नाहीं असा अनुभव आहे. तथापि वसाहतमंत्री कर्नल एमेरी यांचें मत असें आहे कीं, हिंदुस्थानांतील शेतीस उत्तम बुद्धिवान् माणसांची जरूरी आहे आणि बुद्धिवान् माणसें शेतींत पडल्यास पुष्कळ फायदा होईल. मि० कलव्हर्ट यांनीं आपल्या " पंजाबची संपत्ती व सुस्थिति " या पुस्तकांत एमेरीच्या विचारांना पुष्टीच दिली आहे. तरी शेतकीप्रेमी व बी. एजी. ब्राह्मणांनीं एकवार ह्या दिशेनें प्रयत्न करून पहावा.

**२. हायकोर्ट प्लीडरचा ( वकीलाचा ) क्लास बंद करणें--** ब्राह्मणांतील तरुण, मॅट्रीक व बी. ए. झाल्यावर, प्रथम नोकरी शोधूं लागतात. ती जर मिळाली नाहीं तर, उगीच बसण्यापेक्षां तोंवर कायदा तरी शिकूंया, अशी आत्मवंचना करून, पुष्कळ तरुण लॉ कॉलेजांत व हायकोर्ट प्लीडरचे क्लासांत नांवें दाखल करितात. अशीं कॉलेजें व क्लासिस कोल्हापूर, पुणें, मुंबई, अहमदाबाद व कराची येथें आहेत. त्यांतून बरेच विद्यार्थी दरसाल शिकून बाहेर पडतात; आणि ते इतके कीं, आडवळणी तालुक्याचे गांवांत पुष्कळ एल्एल्. बी. वकील जाऊन राहूं लागले आहेत. यांपैकीं बऱ्याच एल्एल्. बीं.ची प्राप्ती दरमहा २५ रु० पेक्षां जास्त नसते. अशा परिस्थितींत हायकोर्ट प्लीडरची परीक्षा ठेविल्यानें त्यांत अधिकच भर पडून धंद्याची दुर्दशा होत आहे. इतके एल्एल्. बी. दरसाल तयार होत असल्यानें, हायकोर्ट प्लीडरच्या परीक्षेची उपयुक्तता व जरुरी आतां बिलकूल राहिलेली नाहीं. सबब पूर्वी डिस्ट्रिक्ट प्लीडरची परीक्षा बंद केली तशी ही परीक्षा ताबडतोब बंद करण्यांत यावी. असें केल्यास वकिलांतील बेकारीस आळा बसेल. आपल्याकडे दस्तऐवज कसे लिहावेत याचें शिक्षण देणारी संस्था नाहीं. त्यामुळें बऱ्याच लोकांना ते कसे कायदेशीर

लिहावेत हें कळत नाहीं. त्यामुळें विनाकारण कोर्टांत कज्जेदलाली वाढते. तेव्हां असें शिक्षण देण्याची सोय करून त्यांतील विद्यार्थ्यांची परीक्षा घेण्यांत यावी आणि त्यांतून जे पास होतील तेवढ्याच लोकांना दस्तऐवज लिहिण्याची परवानगी असावी. इतरांना कायद्यानें बंदी करण्यांत यावी. वकिलांच्या कारकुनाबाबतही वरीलप्रमाणेंच योजना होणें जरूर आहे. प्रत्येक जिल्हा कोर्टानें परीक्षा घेऊन पास झालेल्या उमेदवारांनाच वकिलाकडे कारकून राहाण्याची परवानगी द्यावी. हायकोर्टची परीक्षा बंद झाल्यास मृगजळामागें धांवून स्वतःची फसवणूक करून घेणारे बरेच ब्राह्मण नाशापासून बचावतील. सातार्‍याचे प्रसिद्ध वकील र. पां. ऊर्फ दादासाहेब करंदीकर यांचे दिवस आतां या धंद्यांत उरलेले नाहींत. दस्तऐवज लिहिणेंबाबत व वकिलांचे कारकुनाबाबत वरील दोन योजना अमलांत आल्यास बर्‍याच सुशिक्षितांना व ब्राह्मणांना धंदा मिळेल.

३. **फार्मसी**—डॉक्टर लोकांतही बरीच बेकारी आढळून येते. पदवीधर डॉक्टर शहरांतूनच गर्दी करून राहतात हें बर्‍याच अंशीं त्याचें कारण आहे. खेड्यांतून राहण्याकडे प्रवृत्ति त्यांच्यामध्यें दिसून येत नाहीं. याकरितां पदवीधर डॉक्टरांना खेड्यांत राहण्यास आमिष म्हणून सरकार व लोकल बोर्डें यांचेकडून कांहीं आर्थिक मदत होणें इष्ट आहे. तसेंच कोणतीही डॉक्टरीची परीक्षा ज्यांनीं दिली नाहीं अशा लोकांना हा धंदा करण्याची कायद्यानें बंदी करण्यांत यावी. मग टाण्याटोण्या वैद्यकीस आळा आपोआपच बसेल. सध्यां डॉक्टर लोकांचे कंपौंडर हे-देखील फार अशिक्षित असतात. त्यांचीही परीक्षा ठेवणें जरूर आहे; व पास झालेल्या लोकांनाच कंपौंडरचा धंदा करणेस परवानगी असावी. त्यांना फार्मसी काढणेस उत्तेजन देण्यांत यावें. सरकारी दवाखान्यांतून अगदीं गरीब लोकांशिवाय इतरांना फुकट औषध देण्याचें बंद करण्यांत यावें. म्हणजे केमिस्ट, कंपौंडर व खासगी डॉक्टर यांचें चांगलें चालेल. कंपौंडर शिकवून तयार करण्याची शाळा निघणें अगदीं जरूर आहे. सुशिक्षितांस हा एक नवीन धंदा उपलब्ध होईल.

४. **आर्किटेक्चरल् इंजिनियर**— ओव्हरसियर व इंजीनियर आपल्याकडे पुष्कळ आहेत. पण उत्तम व सुंदर घरांचे नमुने तयार करणारे व त्याप्रमाणें घरें बांधवून घेणारे आर्किटेक्चरल इंजिनियर व ड्रॉफ्ट्स्मन नाहींत. आजकाल आरोग्यवर्धक व सुंदर सुंदर अशा घरांची हिंदुस्थानांत–शहरांतून व खेड्यापाड्यांतून–फार जरूरी आहे. ती निर्माण करणारे विश्वकर्मे आपल्याकडे नाहींत. तेव्हां आर्किटेक्चरल् शाळा निघणें जरूर आहे. त्या निघाल्यास सुशिक्षितांस नवीन उद्योगधंद्याचें दालन उघडलें जाईल.

५. **दुधाचा व पशुसंवर्धनाचा व्यवसाय-डेअरी फार्मिंग**—आज हिंदुस्थानांत मोठमोठ्या शहरांतून लोकवस्ती झपाट्यानें वाढत आहे. त्यामुळें उत्तम, निर्भेळ व शुद्ध दुधाची जरूरी अशा शहरांतून फार भासूं लागली आहे. हल्लीं दुधाचा धंदा अशिक्षितांच्या हातीं असल्यानें दुधांत भेसळ फार होते; शिवाय त्यांना स्वच्छतेची व आरोग्याची कल्पना कांहींच नसते. त्यामुळें अशुद्ध व अमंगळ दूध गिऱ्हाइकांच्या पदरीं पडतें. त्याचा परिणाम प्रकृतीवर झाल्यावांचून राहत नाहीं. मोठ्या शहरांतून विषमज्वर व क्षय हे भयंकर रोग त्यामुळेंच फैलावतात. या रोगांचे जंतु दुधांतूनच पुष्कळ वेळां माणसाचे शरीरांत प्रवेश करितात. तेव्हां आरोग्याचें ज्ञान ज्यांना आहे व स्वच्छतेची आवड ज्यांना आहे अशा सुशिक्षित मंडळींनीं हा धंदा उचलणें फार अगत्याचें आहे. मुंबई, पुणें, सोलापूर, अशा मोठ्या शहरांजवळ डेअरीचा धंदा सुरू होणें फार जरूरीचें आहे. त्या शहरांतील लोकांना चांगलें दूध मिळत नाहीं. तेव्हां या शहराजवळ ब्राह्मण लोकांनीं डेअरीचा धंदा सुरू केल्यास लोकांना निर्भेळ दूध मिळेल; व ब्राह्मणांची बेकारी कमी होईल. डेअरीबरोबरच पशुसंवर्धनाचा धंदा करतां येण्यासारखा आहे. दुभतीं जनावरें आटल्यावर त्यांचा संहार होतो. अशीं भाकड जनावरें बाळगून चांगल्या खिल्लाराची पैदास केली, तर ती नक्की किफायतशीर होईल. तरी ब्राह्मण तरुणांनीं या धंद्यांत लक्ष घालावें आणि दुभतीं जनांवरें आटल्यावर त्यांचा संहार होतो, तो थांबवून पुण्य संपादन करावें. श्रीयुत रघुवीरसिंग या दिशेनें उद्योग करीत आहेत. तो खरो-खरच फार स्तुत्य आहे.

६. **सुशिक्षित उपाध्ये व बडवे**--आपल्याकडे देवस्थानें पुष्कळ आहेत. त्यांना सरकारांतून उत्पन्नेंही बरींच चालतात. त्यांत सेवेकरी, कथापुराणें सांगणारे लोक, कामावर असतात. धर्माची आवड ज्यांच्यांत आहे व ज्यांची मनःप्रवृत्ति धार्मिक आहे, अशा सुशिक्षितांनाच अशा कामावर नेमावें. म्हणजे नुसती कथा-पुराणेंच ते चांगलीं सांगतील असें नाहीं तर हे सुशिक्षित लोक धर्माची व तत्त्वज्ञानाची चर्चा व शिक्षण, देवळांतून अखंड चालू ठेवतील, व्याख्यानें, प्रवचनें करतील. त्यामुळें देशकालानुरूप धार्मिक जागृतीचें कामही त्यांचेकडून आपोआप उत्तम प्रकारें होत जाईल. यामुळें समाजास फायदा तर होईलच; शिवाय सुशिक्षित ब्राह्मण तरुणांना नवीन धंदाही मिळेल. अशी एकादी नवीन योजना अमलांत यावी अशी सुप्रसिद्ध तत्त्वज्ञानी प्रो० राधाकृष्ण यांची फार इच्छा आहे. यामुळें कीर्तन व पुराण या संस्थांचें पुनरुज्जीवनही होईल. ग्वाल्हेर संस्थानांत अशी कांहींशी संस्था आहे.

७. **सरकारी नोकरींत चढाओढीची परीक्षा घेऊन प्रवेश**--सरकारी नोकरी लहान असो अगर मोठी असो, त्यांत भरती करतांना चढाओढीची स्वतंत्र परीक्षा घेऊनच भरती करावी. असें केल्यानें रद्दी गाळ तरुणांना लवकरच चाळणी लागेल आणि आपली खरी योग्यता त्यांना कळून येईल. जोंपर्यंत मॅट्रिक व बी. ए. झालें म्हणजे सरकारी नोकरी मिळते अशी भावना व कल्पना विद्यार्थ्यांमध्यें रूढ असते तोंपर्यंत विद्यार्थी कितीही धड्ड असला व हायस्कूल व कॉलेजचें शिक्षण घेण्यास अपात्र असला तरी तो हायस्कूल कॉलेजांतून शिक्षण घेत राहतो; आणि रडत कडत कसा तरी बी. ए. होतो. पुष्कळ वेळां आईबाप व पालक आपल्या मुलाची बुद्धिमत्ता लक्षांत न आणतां बेळेनुसार पोटाला चिमटा घेऊन कर्ज काढून मुलाला बी. ए.पर्यंत शिकवितात. उभयतांही या आशेवर ढाळत राहातात कीं, आज ना उद्यां बाब्यास नोकरी लागेल; पण " नोकरी एक व हजार उमेदवार " ही गोष्ट फार उशीरां त्यांना कळून येते व अखेर निराशेशिवाय त्यांच्या

हातास कांहींच लागत नाहीं; पण इतक्या उशीरां डोळे उघडून उपयोग काय? सरकारी नोकरीची प्रवेशपरीक्षा अमलांत आल्यास शिक्षण संस्थांनाही फायदा होईल. जे जडबुद्धी व मंद विद्यार्थी नोकरीचे आशेनें शिकत असतात, ते शिकण्याचें आपोआप बंद करतील. चलाख व हुशार विद्यार्थीच शाळाकॉलेजांतून शिकत राहतील. मग शिक्षक व प्रोफेसर यांना त्यांच्याकडे भरपूर लक्ष देण्यास वाव मिळेल. हा कांहीं लहानसान फायदा नाहीं. दिवाण बहादूर मेनन् माजी व्हाइस चॅन्सेलर मद्रास युनिव्हर्सिटी यांनीं आपल्या पदवीदान समारंभाच्या भाषणांत अशी सूचना केली कीं, मॅट्रिक व स्कूलफायनल विद्यार्थ्यांतून नोकरीकरितां चढाओढीची प्रवेशपरीक्षा सरकारानें घेऊन उमेदवार निवडावे आणि त्यांना आय. सी. एस्. प्रोबेशनरप्रमाणें दोन तीन वर्षे कॉलेज कोर्स घेण्यास लावावें. ही सूचना विचार करण्यासारखी नाहीं असें कोण म्हणेल? प्रत्येक प्रांतांतून सर्व्हिस कमिशनें स्थापण्यांत यावींत. त्यांच्याकडे प्रवेशपरीक्षा घेऊन उमेदवार निवडण्याचें काम सोंपविल्यास हें काम बिनबोभाट चालेल.

**८. नोकरी मिळवून देणाऱ्या संस्था( एंप्लॉयमेंट ब्यूरो )**-- आपल्याकडे नोकरी मिळवून देणाऱ्या संस्थांचा पूर्ण अभाव आहे. मुंबई, मद्रास, कलकत्तासारख्या शहरीं अशा कांहीं संस्था आहेत. पण त्या युरोपियन, अँग्लोइंडियन व ख्रिश्चन लोकांच्या आहेत. पारशी लोकांनीं याबाबत थोडीबहुत व्यवस्था केली आहे. पण इतरांपेक्षां अशा संस्थांची ब्राह्मणांना फार जरूरी असूनही, त्यांची एकसुद्धां संस्था असूं नये हें मोठें आश्चर्य नाहीं काय? परवांच आपले नेक नामदार गव्हर्नरसाहेब लॉर्ड ब्रॅबोर्न व न्यायमूर्ती बार्ली यांनीं अँग्लोइंडियन व डोमिसाइल्ड युरोपियन यांच्यामधील बेकारी पाहून, तिनें कळवळून जाऊन त्यांना मदत करावी म्हणून विनंतीपत्रक काढलें होतें. त्यांनीं त्याबाबत एक कमेटीही स्थापिली. तिचे अध्यक्ष न्यायमूर्ती बार्ली, हायकोर्ट जज्ज मुंबई, हे आहेत. ही कमेटी अँग्लोइंडियनांना नोकरी मिळवून देणार आहे. ज्या कारखानदारांना व संस्थांना नोकरांची

जरूरी आहे त्यांनीं, वरील बेकार लोकांतून माणसें नोकरीवर घ्यावीं अशी विनंती सदर कमेटीनें केली आहे. टाईम्स ऑफ इंडिया पत्रांत रोज याबद्दल त्यांची जाहिरात असते. कोण ही त्यांची आपुलकीची भावना आणि कोणीकडे आमची उदासीनता!

९. **शिक्षण-क्रमांत आमूलाग्र सुधारणा**—(१) हल्लीं शिक्षण-क्रम एक प्रकारें फार सवघड, स्वस्त व सोपा आहे. खालच्या वर्गातून वरच्या वर्गात योग्यायोग्य न पाहतां मुलें चढविलीं जातात. त्यामुळें बौद्धिक शिक्षणास अपात्र व मंद अशीं मुलें उगाच मॅट्रिकपर्यंत जाऊन थडकतात. हें बंद झालें पाहिजे. दोन्हींपेक्षां जास्त वेळां नापास होणाऱ्या विद्यार्थ्यांस वर चढवूं नये व कोणत्याही परीक्षेस पुन्हां बसूं देऊं नये. हल्लींचा शिक्षणक्रम फार थोड्या खर्चात होतो. तो थोडा महाग झाल्यास बरें होईल. मात्र गरीब पण होतकरू हुशार विद्यार्थ्यांना भरपूर शिष्यवृत्त्या असाव्यात. नुसत्या गरीबीमुळें त्यांचें शिक्षण बंद पडणें वाजवी होणार नाहीं. वरील सुधारणा अमलांत आणण्यांत हेतु हा कीं, जे तैलबुद्धीचे व अव्वल दर्जाचे पण गरीब विद्यार्थी आहेत त्यांनाच, व जे श्रीमंत आहेत त्यांनाच हायस्कूल कॉलेजचा शिक्षणक्रम घेतां यावा व टाकाऊ धड्डु विद्यार्थी योग्य वेळींच इतर धंद्याच्या मार्गाला लागावेत. संपन्न अशा इंग्लंडमध्यें अशीच व्यवस्था आहे. तशी इकडे होण्यास काय हरकत आहे? शिक्षणक्रम जरा अवघड व खर्चाचा करतांना त्याबरोबर ट्रेंड व लायख शिक्षक यांची योजना झाली पाहिजे. मनापासून काम करण्यास त्यांना उमेद वाटण्याकरितां भरपूर वेतनही दिलें पाहिजे. (२) **परिस्थित्यनुरूप शिक्षण दिलें गेलें पाहिजे**– निदान खेड्या-पाड्यांतून ज्या शिक्षणानें स्थानिक गरजा भागल्या जातील असें शिक्षण देण्याची सोय व्हावी. मेक्सिकोमध्यें "लोकांचें घर; (हाउस ऑफ दि पीपल)" असें खेड्यांतील शाळांना नांव दिलें असून त्यावर शिक्षक, स्थानिक गरजा भागविणारा, मार्गदर्शक व खेड-वळांचा पुढारी असा नेमला जातो. तो खेड्यांतील लोकांना स्वच्छता, आरोग्य, शेती व इतर धंदे याबाबत ज्ञान करून देऊन त्यांच्या हरएक

अडचणी दूर करतो. खेड्यांतील जीवन हें एक प्रकारें नीरस असतें. त्यांत उत्साह व आनंद निर्माण करण्याकरितां हा शिक्षक वेळीं प्रसंगीं मधून मधून शाळेंत भजन, जलसे, व्याख्यानें करविती. शक्य तितकें खेडयांतलाच इसम शिक्षक नेमावयाचा असें शिक्षण खात्याचें धोरण असतें. हेतु हा कीं, शिक्षकाला लोकांत मिळून मिसळून त्यांच्या सुखदुःखांत समरस होतां यावें. ब्राह्मणांनीं असे शिक्षक होण्याची महत्त्वाकांक्षा बाळगल्यास त्यांना नवीन उद्योग लागून लोकांचा दुवा व अज्ञ बांधवांचा आशीर्वाद मिळवितां येणार नाहीं काय? (३) आपल्या विद्यार्थ्यांमध्यें अंगमेहनतीची, श्रमाची आवड दिसून येत नाहीं; तर ज्या शिक्षणानें याबद्दल त्यांच्यामध्यें आवड उत्पन्न होईल व फुरसतीचा योग्य उपयोग करण्याची पात्रता आंगीं बाणेल व सामाजिक सेवा करण्याची योग्य आकांक्षा उत्पन्न होईल, अशा शिक्षणाची फार जरूरी आहे. तसेंच धंदेशिक्षणाची, हस्तव्यवसायाची व शेतकीची आवड बाळपणींच उत्पन्न होईल, असा इष्ट फरक शिक्षणक्रमांत केला जावा. हेतु हा कीं, जरी विद्यार्थी शिकला सवरला तरी त्याला अंगमेहनतीचें काम करण्याची लाज वाटूं नये. पंजाबमध्यें शेतीकडे कल वळविणाऱ्या (ॲग्रिकल्चरल बायस) शाळा या दृष्टीनें सुरू केल्या आहेत. तशा येथें स्थापन झाल्यास फार उपयोग होईल. बंगाल्यांतील हायस्कूल व कॉलेज यांच्या शिक्षणक्रमांतील दोष दाखवून ज्या सुधारणा सॅडलरकमिशननें सुचविल्या आहेत, त्यांचा अंमल योग्य त्या फेरफारांसह आमच्या येथील शिक्षणक्रमांत होणें जरूर आहे. लहान लहान उद्योगधंदे सुतारकी, लोहारकी शिकविणाऱ्या शाळा ठिकठिकाणीं निघाल्या पाहिजेत. तथापि नुसते धंद्यांतील तज्ज्ञ तयार करून उपयोगी नाहीं. त्यांचा उपयोग होईल असे धंदेही त्याबरोबरच निघाले पाहिजेत. (४) **शैक्षणिक वसाहती**--शैक्षणिक वसाहतींची योजना कॅप्टन पेटावेल यांची आहे. तिचा पुरस्कार कलकत्ता युनिव्हर्सिटीचे व्हाइस चॅन्सलर कै० सर अशुतोष मुकर्जी यांनीं फार जोरानें केला होता. पण त्यांच्या आकस्मिक निधनामुळें ही योजना अमलांत आली नाहीं. हल्लीं पेटावेल हे

लोणावळयाजवळ कामेशट येथें या योजनेचा पुन्हां उपक्रम करीत असल्याचें समजतें. ही योजना यशस्वी झाल्यास शिक्षणक्रमांत क्रांतीच होणार आहे. तिची रूपरेषा पुढीलप्रमाणें आहे.

प्रत्येक खेड्याजवळ कांहींशी पडजमीन असतेच. ती विद्यार्थ्यांच्या वसाहतीस घ्यावी. दिवसांतून कांहीं तास विद्यार्थ्यांनीं कसबी शेतकऱ्या-बरोबर व त्याच्या देखरेखीखालीं या पडजमीनींत पीक करण्याचा उद्योग आरंभावा. पीक हातीं आल्यावर, विद्यार्थ्यांनीं जितके तास काम केलें असेल त्या मानानें त्यांना धान्यरूपानें मजूरी देणेंत यावी. तसेंच वसाहतींतील कांहीं विद्यार्थ्यांनीं सुतारकी, लोहारकी, विणकाम करावें. अर्थात् त्यांना अगोदर यांचें शिक्षण देण्याची योजना केलेली असावी. विद्यार्थ्यांनीं तयार केलेले जिन्नस खेड्यांतील लोकांना अगर वसाहतींतील इतर विद्यार्थ्यांना विकावेत. मात्र जिन्नसाकरितां पैशा-ऐवजीं मोबदला धान्य देण्यांत यावें. इतर वेळांत विद्यार्थ्यांनीं बौद्धिक शिक्षण घेण्याचें आहे. पेटावेल म्हणतात कीं, असें केल्यानें विद्यार्थ्यांना शिकत असतांनाच कांहीं मिळवून आपल्या पोटाचा खर्च बाहेर पाडतां येईल. स्वित्झर्लंडमध्यें बर्न शहराजवळ वीट्स्वील या खेडयांत व अमेरिकेंत ल्यानो या गांवीं अशा नमुन्याच्या वसाहती असून त्या फार फायदेशीर झाल्याचें पेटावेल सांगतात. इंग्लंडमध्यें सध्यां होमक्रॉफ्टिंग म्हणजे घरची बाग ही योजना बेकार लोकांकरितां जारीनें अमलांत आहे. प्रत्येक बेकारास जमीनीचा तुकडा देऊन पोटापुरतें धान्य उत्पन्न करावयास लावतात. तेव्हां ब्राह्मणांनीं कांहीं पडजमीन संपादन करून ही शैक्षणिक वसाहतीची योजना अमलांत आणून पहावी. (५) मोठीं माणसें निरक्षर राहणें चांगलें नाहीं. त्यांनाही शिक्षण देण्याची कांहीं सोय होणें जरूर आहे. मुंबईस ॲडल्ट एज्युकेशन सोसायटीतर्फे व्याख्यानरूपानें बरेंच ज्ञान अडाणी पण वयांत आलेल्या लोकांना दिलें जातें. तसेंच रात्रींच्या शाळा चालवून निरक्षर मजूरांतून साक्षरतेचा प्रसार बराच केला जातो. वरीलप्रमाणें योजना इतर गांवांतूनही होणें

फार जरूर आहे. ब्राह्मण तरुणांनीं रात्रींच्या शाळा काढून साक्षरता वाढविल्यास त्यांना उद्योग लागून देशकार्य केल्याचें श्रेयही मिळेल. (६) **हल्लींच्या शिक्षणक्रमांतील बेसुमार उधळपट्टी**– हल्लींच्या शिक्षण-पद्धतींत शारीरिक, मानसिक व आर्थिक अपव्यय व उधळपट्टी दर टप्प्यास बरीच होत असते. ती इतकी होऊनही, शिकून तयार झालेल्या विद्यार्थ्यांच्या नशीबीं बेकारीच ठेविलेली असते. हल्लींचें सर्व शिक्षण कुचकामाचें व उधळपट्टीचें आहे असा शेरा म्हैसूरचे शिक्षणखात्याचे विद्वान् डायरेक्टर एन्. एस्. राव यांनीं मारला आहे. तो अगदीं बरोबर नाहीं असें कोण म्हणेल ? बंगलोर येथें परवां शिक्षण–आठवडा नुकताच साजरा करण्यांत आला. हा आठवडा सुरू करतांना म्हैसूरचे दिवाण सर मिर्झा इस्माइल यांनीं शिक्षणांतील उधळपट्टीची व बेकारीची गोष्ट शिक्षणतज्ज्ञांपुढें विचाराकरितां मांडिली. दर टप्प्याला मानसिक, शारीरिक, आर्थिक अपव्यय व उधळपट्टी विद्यार्थ्यांच्या शिक्षणांत होत आहे, ती थांबवावी असें अत्यंत कळकळीनें व आग्रहानें त्यावेळीं त्यांनीं सांगितलें. हल्लींच्या युनिव्हर्सिटीच्या शिक्षणापासून विद्यार्थ्यांत दूरदृष्टी, धडाडी व कल्पकता हे गुण उत्पन्न होत नाहींत. हें शिक्षण, पुढारी कसें व्हावें, हेंही त्यांना शिकवत नाहीं; त्यांना नेते बनवत नाहीं. इतकें कुचकामाचें शिक्षण हें आहे. तें घेतल्यापासून शरीराची खराबीही बरीच होते. इसवी सन १८९४ च्या सुमारास ' आधुनिक पदवीधर अकालीं कां मरतात ' याबद्दल न्यायमूर्ती रावसाहेब महादेव गोविंद रानडे आणि सर रामकृष्णपंत भांडारकर यांच्यामध्यें जोराचा वाद सुरू होता. त्यावेळीं रावसाहेब माधवरावजींनीं असा सिद्धांत स्थापित केला कीं हल्लींच्या शिक्षणाचा बोजा व परीक्षेचा कांच या दोन गोष्टी प्रामुख्यानें आधुनिक पदवीधरांच्या अकालीं मृत्यूस कारणीभूत आहेत. तेव्हांपासून आजतागायत शरीराची खराबी, विशेषत: दक्षिणी लोकांच्या शरीराची खराबी सारखी सुरूच आहे. नुकताच याबाबत मुंबई युनिव्हर्सिटीचा रिपोर्ट प्रसिद्ध झाला आहे. त्यांत शेकडा ४० ते ५० विद्यार्थी वैद्यकीय तपासणींत दुबळ्या छातीचे व अधु दृष्टीचे दिसून आल्याचें नमूद आहे. तेव्हां

ही दुरवस्था घालविण्यास उपाय एकच. तो म्हणजे शिक्षणांतसुद्धां ठराविक मोजकीं माणसें घेण्याची पद्धत–रेशनपद्धत–अमलांत आणणें हा होय. युनिव्हर्सिटीचा शिक्षणक्रम सर्वांनाच खुला न ठेवतां जितक्या लोकांची गरज आहे तितकेच विद्यार्थी घेण्याचें धोरण ठेविल्यास वरील दोष टाळतां येतील. जर्मनी हा देश सर्व गोष्टींत, निदान शिक्षणांत तरी अग्रस्थानीं आहे. त्यानेंही असें रेशनिंग सुरू केलें आहे. तेव्हां हिंदुस्थानानेंही जर्मनीचें जरूर अनुकरण करावें.

**१०. आर्थिक व औद्योगिक साधनांची वाढ (डेव्हलपमेंट)**–– सरकार, श्रीमंत लोक व सुशिक्षित लोक यांनीं आर्थिक, औद्योगिक व व्यापारी साधनांची वाढ करण्याचा कसून प्रयत्न केला पाहिजे. इंग्लंड, अमेरिका या देशांतील उत्तम बुद्धिमान् लोक व्यापारांत व धंद्यांत पडलेले दिसतात. आमच्यासारखे नोकरीच्या मागें लागलेले दिसत नाहींत. माजी व्हाइसरॉय लॉर्ड रीडिंग, माजी फडणवीस सर बेसिल ब्लॅकेट व्यापारांत पडल्याचें वर्तमानपत्रांतून वाचकांनीं वाचलें असेलच. अशीं बुद्धिमान् माणसें व्यापारधंद्यांत लक्ष घालूं लागल्यास आर्थिक साधनांची वाढ पुरेपुर होते.

**११. खेड्यांची पुनर्घटना व ग्रामसुधारणा**–खेड्यांची पुनर्घटना व ग्रामसुधारणा झाल्यास बेकारीस पुष्कळ आळा बसेल यांत शंका नाहीं. या कामीं माजी गव्हर्नरसाहेब सर फ्रेडरिक साइक्स यांचा उद्योग स्तुत्य होता. पुण्याचे प्रो. भागवत व श्रीयुत बाळुकाका कानिटकर यांची ग्रामोद्धाराची कामगिरीही बहुमोलाची आहे. खेडीं सुधारलीं तर मध्यम वर्ग व ब्राह्मण यांची खात्रीनें सुधारणा होईल. रयत सुखी तर इतर सर्व वर्ग सुखी हें त्रिकालाबाधित सत्य आहे.

**१२. शेतकी–सुधारणा**—नुकतेंच कांहीं वर्षांपूर्वी बादशाही (रॉयल) कमिशन शेतकी विषयावर बसलें होतें. त्यानें शेतकींत बऱ्याच सुधारणा सुचविल्या आहेत. लँडमॉर्गेज बँका स्थापणें, बीं-बियाणें उत्तम जातीचें पुरविणें, तगाई देणें; अशा त्यांनीं सुचविलेल्या

व इतर सुधारणा अमलांत आणल्यास शेतकऱ्यांना निःसंशय फायदा होईल. अर्थात् इतर वर्गांचीही स्थिति सुधारेल.

१३. **औद्योगिक पाहणी**–शेतींत सुधारणा व वाढ करतांना त्याबरोबरच देशाची आर्थिक व औद्योगिक पाहणी होणें फार जरूर आहे. प्रत्येक प्रांतानें व देशी संस्थानांनीं तज्ज्ञ लोकांकडून अशी पाहणी आपआपल्या प्रांतांतून करवून घ्यावी; आणि तज्ज्ञ लोक जे धंदे काढणें फायदेशीर होईल असा सल्ला देतील, ते धंदे त्या त्या प्रांतांतून अगर संस्थानांतून काढण्यांत यावेत. असें करण्यास यांत्रिक कौशल्यानें युक्त असणारीं माणसें पाहिजेत असें नाहीं. तर भरपूर भांडवल व त्याचा उपयोग करून घेणारी बुद्धिमत्ता आणि मजूरांना राबवून घेणारी शक्ति इतक्या गोष्टी असल्या म्हणजे पुरे. वरील गुणांनीं युक्त असलेल्या माणसांची जरूरी आहे. १८९४ सालींच लो. टिळकांनीं अशी औद्योगिक पाहणी व्हावी असें जोरानें प्रतिपादलें होतें. पण १९३४ साल उजाडलें तरीही ती होऊं नये, ही फार खेदाची गोष्ट आहे.

१४. **सामाजिक सुधारणा**— सृष्टिनियमाप्रमाणें जग हें रोज बदलत आहे. तेव्हां जुन्या कल्पना व रूढी या सर्वच सर्व उराशीं बाळगून आतां भागणार नाहीं. इजिप्त, तुर्कस्थान, इराण व जपान या देशांतून देशकालानुरूप सामाजिक पुनर्घटना झाली आहे; तशी आपल्या येथें होणें इष्ट आहे. जातिसंस्था एका वेळीं उपयुक्त होती. आज ती आहे कीं नाहीं हा प्रश्नच आहे. पुष्कळ समाजशास्त्रवेत्त्यांचें व बंगालचे प्रसिद्ध रसायनशास्त्रज्ञ सर पी. सी. रे यांचें असें मत आहे कीं, हिंदुस्थानच्या नाशास जातिसंस्था हीच कारणीभूत झाली आहे. तथापि हा वादग्रस्त प्रश्न आहे. एवढी गोष्ट निदान खरी कीं, आज पोटजातींचें एकीकरण होणें जरूर आहे. ब्राह्मणांतील देशस्थ, कोंकणस्थ व कऱ्हाडे वगैरे भेद पार नाहींसे झाले पाहिजेत. असें झाल्यास संघटन होऊन आर्थिक उन्नति त्वरित होईल.

१५. **आरमार, सैन्य यांत सुशिक्षितांचा व ब्राह्मणांचा प्रवेश**– आजकाल हिंदु तरुणांना-विशेषतः ब्राह्मणांना–आरमार, सैन्य व विमानदल

यांतील नोकरीचा दरवाजा जवळ जवळ बंदच आहे. या नोकऱ्या जर तरुणांना मिळूं लागतील तर बेकारीस खात्रीनें आळा बसेल. त्याबरोबर धैर्यशौर्यादि गुणांचें संवर्धन होईल; व परचक्रापासून हिंदुस्थानचें संरक्षण करण्याची पात्रता हिंदु तरुणांत उत्पन्न होईल. तेव्हां ब्राह्मण तरुणांना वरील त्रयींत प्रवेश मिळणेबद्दल ब्राह्मण समाजाच्या पुढाऱ्यांनीं, पारशी लोकांप्रमाणें, संघटित प्रयत्न करणें जरूर आहे. या दिशेनें कॅप्टन् मोडक यांचे प्रयत्न खरोखरींच स्तुत्य आहेत.

**१६. युनिव्हर्सिटी पदवीधरांकरितां आश्रम**–जुनागडच्या कृष्णस्वामी आयंगार यांनीं पदवीधर मंडळींत उद्योगाची आवड उत्पन्न व्हावी म्हणून, नुकताच एक आश्रम स्थापिला आहे. जुनागड व इतर लगतच्या सात संस्थानांनीं सदर आश्रमास आर्थिक मदत देण्याचें कबूल केलें आहे. आश्रमवासीयांना शेतकी हा विषय आवश्यक असून सुतारकी, लोहारकी वगैरे जोड धंदे आवडीप्रमाणें घ्यावे लागतात. आयंगार यांनीं सुरवातीस दोन हजार रुपये भांडवल व वीस एकर जमीन आश्रमाकरितां संपादन केली आहे. या आश्रमाच्या जोरावर पदवीधरांतील बेकारी घालवूं असा दांडगा आत्मविश्वास आयंगारांना वाटतो. आमच्याकडील श्रीमंत जमीनदार व संस्थानिक ब्राह्मण मंडळींनीं असा आश्रम काढून पहावा अशी आमची नम्र शिफारस आहे.

**१७. औद्योगिक केंद्रें (ऑक्युपेशनल सेंटर्स)**—रेव्हरंड एच. सी. एमूलींग यांची उद्योगाच्या केंद्रांची योजनाही चिंत्य आहे. इंग्लंडमध्यें ठिकठिकाणीं अशीं केंद्रें उघडलीं असून बेकार कुटुंबांना या केंद्रांतून हस्तव्यवसाय दिला जातो. सदर कुटुंबांना मात्र मेहनताना रोखींत न देतां त्यांना लागणाऱ्या वस्तूंचे रूपानें दिला जातो. इंग्लंडमध्यें ही योजना यशस्वी झाली आहे. तेव्हां आपल्या येथेंही अशीं उद्योगकेंद्रें काढून पाहण्यासारखीं आहेत.

**१८. बंगाल प्रांतांतील बेकारी निवारण्याची योजना**––क्रांतिकारक चळवळीस आळा घालण्याकरितां एक उपाय म्हणून ही योजना आंखण्यांत आली आहे. मध्यम वर्गातील बेकार तरुणांना

कांहीं धंदा उपलब्ध व्हावा म्हणून संसारांतील नित्योपयोगी वस्तू तयार करण्याचें शिक्षण देण्याची सोय निरनिराळ्या केंद्रांतून करण्यांत आली आहे. अशा केंद्रांतून तरुणांना तज्ज्ञांच्या देखरेखीखालीं तागाचें कापड विणणें, सतरंज्या, आसनें तयार करणें, छत्र्या तयार करणें, सुधारलेल्या तऱ्हेनें धातूंचें मिश्रण करून पितळ वगैरे धातूंचीं भांडीं तयार करणें, चाकू, कातऱ्या, खुरपीं तयार करणें व त्यांना टिकाऊ पाणी देणें, नकशीदार मातीचीं भांडीं घडविणें, कमाविलेल्या कातड्यापासून बूट तयार करणें आणि धुण्याचा साबण तयार करणें, असे धंदे शिकवले जातात. शिकून तयार झालेल्या तरुणांना नवीन धंदा काढण्याकरितां भांडवल पुरवणेची सोयही सरकारनें केली आहे. बंगाल सरकार या कामीं दरसाल एक लाख रुपये खर्च करणार आहे. दिवाण निजामउद्दीन यांच्या प्रेरणेनें ही योजना आंखली असलेनें ती यशस्वी होईल असें वाटतें. असाच उपक्रम आम्हीं इकडे केल्यास पुष्कळ बेकार ब्राह्मण तरुणांना नवीन व्यवसाय उपलब्ध होईल.

१९. **ब्राह्मणांनीं श्रमजीवी होण्याची अवश्यकता**— ब्राह्मण व मध्यम वर्गांतील लोक हा एक प्रकारें परोपजीवी वर्ग आहे यांत शंका नाहीं; कारण हा बुद्धिजीवी आहे. संपत्तीचें उत्पादन या वर्गांतील लोक जवळ जवळ कांहींच करत नाहींत. तथापि उत्पादन केलेल्या संपत्तींतील बराच मोठा हिस्सा या वर्गावरच खर्च होतो. या वर्गांतील लोक राष्ट्राच्या संपत्तींत फारच थोडी भर टाकतात; पण त्यांतील बराच मोठा वांटा उचलतात. तेव्हां ब्राह्मणांनीं व मध्यम वर्गांतील लोकांनीं आतां खूप ध्यानांत ठेवावें कीं याउपर परोपजीवी आयुष्यक्रमाचा मार्ग, त्यांच्या नाशाला कारणीभूत झाल्यावांचून राहणार नाहीं. श्रमाचें लेणें त्यांनीं ल्यालेंच पाहिजे. अंगमेहनतीचा अलंकार ( डिग्निटी आफ् लेबर ) आतां धारण केलाच पाहिजे. नाहीं तर ज्याप्रमाणें रोमन साम्राज्याचा नाश गुलामगिरीवर जगल्यामुळें झाला; तसाच आम्हीं इतर जातींवर जगूं लागलों तर आमचाही नाश झाल्यावांचून राहणार नाहीं. हीच गोष्ट लक्षांत घेऊन निग्रो लोकांचा सुप्रसिद्ध पुढारी

बुकर टी. वॉशिंग्टन यानें आपल्या तरुण पदवीधरांना पुढील तीन गोष्टी शिकविल्याः—( १ ) येईल त्या परिस्थितीस तोंड देण्याची धमक बाळगा. (२) बुद्धिवैभव व चारित्र्य यांच्या संपादनाबरोबर पोट भरण्याची एखादी कला अवगत करून घ्या आणि (३) अंगमेहनत ही एक सुंदर उपयुक्त गोष्ट मानून तिचा धिक्कार न करितां उलट स्वागतच करणेस शिका. वरील तीन्ही गोष्टींबद्दल नुसता शाब्दिक उपदेश करून बुकर टी. वॉशिंग्टन थांबला नाहीं. तर त्यानें या तीन्ही गोष्टी आपल्या विद्यार्थ्यांच्या अंगांत पूर्णपणें बाणविल्या.

वरील तीन्ही गोष्टी ध्यानांत बाळगून फार उशीर झाला नाहीं, तोंवरच आमचे ब्राह्मण तरुण आपला परोपजीवी आयुष्यक्रम बदलतील अशी उमेद आहे. श्रमजीवी होऊन आपला व पुढील पिढीचा नाश आमचे तरुण टाळणार नाहींत काय ?

---

नामदार श्रीवास्तव यांची फैझाबाद फार्मची योजना व शिक्षण-विषयक आमूलाग्र सुधारणा सुचविणारा ठराव; तसेच नामदार निजाम-उद्दीन यांची भद्रलोकांची बेकारी निवारण्याची योजना; हीं परिशिष्ट प्रकरणांत सविस्तर दिलीं आहेत. तीं वाचकांनीं अवश्य पाहावींत. तसेंच थोर व विद्वान् लोकांचे ‘प्रचलित शिक्षण व बेकारी’ या बाबतचे अभिप्रायही परिशिष्ट प्रकरणांत दिले आहेत. तेही वाचावेत अशी शिफारस आहे.

नगर वाचनालय सातारा
संगणकीकृत

# प्रकरण तिसरें

## ब्राह्मणांच्या बेकारीवर रामबाण उपाय

" विणकामाचा धंदा चालण्यास जर कोणता एखादा देश, दुसऱ्या देशापेक्षां अधिक योग्य असेल तर तो हिंदुस्थान हा होय. धोतरांचा पुरवठा करण्याचे कामीं किंवा मांजरपाट अगर जगन्नाथी कापड जरूर तितकें हिंदुस्थानांतल्या हिंदुस्थानांत उत्पन्न करण्याचे कामीं **वाफेच्या मागांचा** उपयोग केल्याखेरीज गत्यंतर नाहीं. "

—लो० टिळक.

" Our next Industry after Agriculture is the Textile Industry—the Cotton Industry. The hand-loom is doing good work and has some future before it. But do not let us be under delusion. The main part of the work will have to be done *by machinery*. It is only in this way, that we shall be able to stand the Competition of producers of other countries. "

—The Hon. Mr. G. K. Gokhale.

## प्रास्ताविक

**बेकारीचे दुष्परिणाम**—बेकारीचे दुष्परिणाम काय होतात हें स्वतः तिच्या तडाख्यांत सांपडल्याशिवाय पूर्णपणें कळणें शक्य नाहीं. कारण " जावें त्याच्या वंशा तेव्हां कळे." प्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ प्रो. पिगू म्हणतात कीं " एखादा इसम जर बराच काल बेकार राहिला तर त्याचे धंद्यांतील गुणावर, कसबावर, शरीरावर व मनावर वाईट परिणाम झाल्याशिवाय राहात नाहींत. रोजचा सराव नसल्यामुळें त्याचें धंद्यांतील कौशल्य दररोज कमी होत जातें. एवढेंच नव्हे तर त्याचे स्वाभिमान

वाचनालय, सातारा.

व आत्मविश्वास हेही गुण लोप पावतात. शिवाय कामाचा सराव नाहींसा झाल्यामुळें त्याचा परिणाम असा होतो कीं, पुन्हां जर सदर बेकारास नोकरीची संधी प्राप्त झाली; तर हा नोकरी करण्यास नालायख झालेला आढळतो. दरम्यान त्याच्या कुटुंबाची खडकावर आपटून फुटलेल्या नावेसारखी, वाताहत झालेली असते. त्याचीं मुलें दूषित वातावरणांत वाढतात. थोडक्याच पण विशेष दुर्दैवी लोकांत दीर्घकाल बेकारी टिकली कीं, वरील सर्व दुष्परिणाम त्यांच्यामध्यें आढळल्याशिवाय राहत नाहींत." प्रो. पिगू यांनीं वर्णन केल्याप्रमाणें आपल्यांतही आज अशी स्थिती दिसून येत नाहीं काय? शरीरधर्मास जरूर असणाऱ्या सुखसोईचा पूर्ण अभाव झाल्यामुळें बेकारांचे भयंकर हाल तर होत असतातच; तथापि या शारीरिक हालांपेक्षां नैतिक व आध्यात्मिक बाबतींत, तीव्र असंतोष आणि दारुण निराशा, यांचा परिणाम बेकारांवर शतपट भयंकर होतो. नुसत्या एकाच पिढीचे हाल होऊन राहात नाहींत; तर पुढील दोन तीन पिढ्यांवर बेकारीचे दुष्परिणाम चक्रवाढीनें झालेले दिसतात. बेकार लोक शीलभ्रष्ट होऊन त्यांची दानत व नीतिमत्ता हीं हीन प्रकारचीं बनत जातात. आजकाल बंगाल्यांत व इतर प्रांतांत बेकार लोक जीव देत आहेत, ते वरील आपत्तिमुळेंच होय. नुसत्या उपासमारीनें झिजून कुजण्यापेक्षां एकदम मरण आलें तर बरें, असें पुष्कळ बेकारांना वाटतें. म्हणूनच ते मरणाचा जप करीत बसतात. या स्थितीचा बेकारांना जाच, इतका होतो कीं, " गेलें महायुद्ध व त्यांतील होणारी प्राणहानी, भयंकर यातना व वेदना पुरवल्या; पण या बेकारीच्या भस्मासुराचा जुलूम आतां सहन होत नाहीं, " असे उद्गार त्यांच्यानें काढल्यावांचून राहवत नाहीं. पुन्हां एखादें महायुद्ध सुरू झाल्यास सैन्यांत भरती करून घेऊन रणांगणांत मेलेलें बरें; पण हा बेकारीचा सासुरवास नको, असेहि विचार त्यांच्या मनांत घोळत असतात. आर्मी रिझर्वमधील बरेच डॉक्टर ऑफिसर (ए.आय.आर.ओ.) जर्मन युद्धासारखी लढाई पुनः सुरू झाल्यास बरें असें म्हणतांना आढळून येतें. कारण लढाई सुरू झाल्यावरच त्यांना पांचसहाशें रुपये दरमहा तनखा मिळावयाचा असतो. या दुष्ट विचाराचे बुडाशीं बेकारीच नाहीं काय? प्रसिद्ध मुत्सद्दी सर अर्नेस्ट बेन, यांचें

म्हणणें असें आहे कीं, 'प्रजेची बेकारी हें सरकारास दूषण आहे आणि सरकारनें बेकारी नाहींशी केल्याशिवाय प्रजेनें करच देऊं नयेत.' आज बंगाल्यांत सर्वच तरुण क्रांतिकारक मताचे आहेत असें नाहीं. पण भद्र लोकांपैकीं म्हणजे मध्यम वर्गापैकीं बरेच तरुण क्रांतिकारकांच्या जाळ्यांत बेकारीमुळें सांपडतात; आणि त्यायोगें क्रांतिकारकांची संख्या वाढत जाते. यावर उत्तम उपाय नुसता क्रिमिनल अमेंडमेंट लॉ असेंब्लींत पास करणें हा नसून, बेकारी प्रसवणारें हल्लींचें हायस्कूल-मधील दुय्यम शिक्षण बदलणें हाच होय, असें नुकतेंच शिक्षणतज्ज्ञ डॉ० झियाउद्दीन अहमद यांनीं गृहमंत्र्यांस बजावलें, हें ध्यानांत ठेवण्या-सारखें आहे. सॅडलरकमिशनमधील पुढील उतारा लागू असून मार्मिक आहे. " सयुक्तिक तक्रारी ज्यांच्या आहेत, अशा सुशिक्षित बाजारबुणग्यांचें अस्तित्व कोणत्याही सरकारास धोकाच उत्पन्न करतें. यावत्काल वाढत्या संख्येनें बुद्धिवान् वर्गापैकीं बरेच लोक, नुसत्या आकांक्षा उत्पन्न करून त्या परिपूर्ण करण्याची पात्रता ज्यांत नाहीं असें शिक्षण घेऊन बाहेर पडतात; व त्यामुळें राष्ट्रहिताचा उद्योग करण्याची पात्रता त्यांच्यांत उत्पन्न झालेली नसते; तावत्काल सरकाराला, मग तें प्रजासत्ताक असो अगर नोकरशाहीचें असो, आपला राज्यकारभार हांकण्यास मोठी अडचण उत्पन्न झाल्याचें दिसून येईल. वरीलप्रमाणें शिक्षण घेतलेले लोकच बेसुमार टीका करून अशी अडचण उत्पन्न करितात, हें लक्षांत बाळगलें पाहिजे." अलीकडे शाळांतील व कॉलेजांतील विद्यार्थ्यांमध्यें शिस्ती-बद्दल तिटकारा आढळतो व सोशालिझमचीं तत्त्वें प्रसार पावलेलीं दिसतात. त्याचेंही कारण वरीलच होय. आपल्याकडे बेकारी आहे तशीच इंग्लंडमध्येंही आहे. पण आपलें वार्षिक उत्पन्न दर माणशीं ४२ रुपये आहे तर इंग्रजांचें दर माणशीं १५०० रुपये आहे. असें असूनही बेकारीचे पुढील दुष्परिणाम दृष्टोत्पत्तीस आल्याचें इंग्लंडमधील शिक्षक-युनियनच्या अध्यक्षांच्या रिपोर्टावरून दिसून येतें. ते त्यांत म्हणतात कीं, ' बेकारीच्या परिणामाचें बरोबर आकलन करून घ्यावयाचें असेल,

तिची नीट कल्पना आपल्यास व्हावयाची असेल, तर शाळा जाऊन पाहाव्यात. आजकाल शाळांतून अपुरें अन्न व वस्त्राचा तुटवडा यांचे मुलांवर झालेले परिणाम फार हृदयद्रावक दिसतात. या आवश्यक वस्तूंच्या तुटवड्यामुळें शाळेंतील मुलें इतकीं दुःखी व कष्टी दिसतात कीं पाहणारांचें अंतःकरण पिळवटतें आणि मन उदास होतें.' श्रीमंत इंग्लंडांतील मुलांची ही स्थिति तर मग गरीब बिचाऱ्या हिंदुस्थानांतील मुलांचे हाल पाहावयासच नकोत! आमच्याकडील मोठ्या पगाराच्या अंमलदारापेक्षां इंग्लंडमधील बेकाराला बऱ्याच सुखसोई उपलब्ध असतात, असें विलायतेहून नुकतेच परत आलेले वाडिया कॉलेजचे प्रो. शिनॉय सांगतात हेंही वाचकांनीं लक्षांत ठेवण्यासारखें आहे.

**ब्राह्मण–बेकारीची व्याख्या व व्याप्ति**––ब्राह्मण व सुशिक्षित तरुण कसलाच धंदा न मिळाल्यामुळें बेकार आहेत असें नाहीं. नुसत्या मजूरीचीं कामें आजही त्यांना मिळतील. बेकारीचा हा अर्थ नव्हे; तर ज्या प्रकारचें व दर्जाचें शिक्षण ते घेतात, ज्या मानानें श्रम व पैसा शिक्षणावर खर्च ते करतात व ज्या राहणीची संवय त्यांना झालेली असते, त्या मानानें, त्या प्रमाणांत अर्थप्राप्ति करून देणारे व मूळची राहणी कायम राखण्यास मदत करणारे, उद्योगधंदे आज तरुणांना मिळत नाहींत. अशी बेकारी आजकाल ब्राह्मणांत व मध्यम वर्गांत माजली आहे.

मराठी सातवी इयत्ता पास झालेल्या तरुणांत बेकारीचा कडेलोट झाला आहे. ब्राह्मणांना सर्वांत शेवटीं नोकरी देण्याचें धोरण सरकाराप्रमाणेंच, लोकलबोर्डें व म्युनिसिपालिट्यांमधून जारीनें अमलांत आहे. त्यामुळें ब्राह्मण तरुणांना शिक्षकाची एकच नोकरी आजवर उपलब्ध होती; तीही पूर्णपणें बंद झाली आहे. शिवाय व्हर्न्यॉक्युलर फायनलच्या जागेवर मॅट्रिक त्याच पगारावर राहूं लागल्यामुळें या वर्गाचे हाल कुत्रा खाईनासा झाला आहे. पट्टेवाल्याची नोकरी धरण्यास आतां या वर्गांतील लोक पुढें येत आहेत. मॅट्रिक लोकांची स्थिती जवळ जवळ तशीच आहे. दरसाल नऊ दहा हजार मॅट्रिक पास होतात. पैकीं तिसरा हिस्सा कॉलेजमध्यें जातात. बाकीचे नोकरीचे मागें लागतात. पण बी. ए.

लोक मॅट्रिकच्या जागेवर राहण्यास खूष असल्यामुळें मॅट्रिकांची फार कुचंबणा झाली आहे. दहाबारा रुपयांची नोकरी हे लोक धरण्यास तयार असतात. पण तीही बिचारी मिळत नाहीं. ब्राह्मण बी. ए.ची स्थिति जवळ जवळ अशीच आहे. २० ते २५ रुपयांवर हे राहण्याला तयार आहेत. कॉलेजमध्यें मात्र यांनीं दरमहा खर्च ५० ते १०० रुपये केलेला असतो. बी. एससी. लोकांची इतकी दुर्दशा झालेली नाहीं. अजून त्यांना ३०।४० रुपयांची, मास्तरकी कां होईना, मिळते. एलएल. बीं. ची दुर्दशा मात्र पुसूं नका. पुष्कळशा एलएल. बीं.ची प्राप्ती दरमहा २०।२५ रुपयांचे पुढें जात नाहीं. कांहींना बराच काल इतकीही प्राप्ती होत नाहीं. एम्. बी. बी. एस्. डॉक्टरांमध्येंही जवळ जवळ हीच स्थिति उत्पन्न झालेली आहे. ४०।५० रुपयांवर एम. बी. बी. एस्. झालेला ब्राह्मण डॉक्टर मिळूं शकतो. बी. ई. इंजीनियर इतक्याच वेतनावर मिळूं लागले आहेत. त्यामुळें एल. सी. पी. एस. डॉक्टर व सबओव्हरसियर यांची स्थिती जवळ जवळ उपासमारीची झाली आहे. एम्. बी. बी. एस्.च्या कोर्सला दरमहा १०० रुपये असा निदान सहा वर्षे तरी खर्च येतो. म्हणजे आठ हजार रुपये खर्च होतात. पण एम्. बी. बी. एस्. ची पदवी घेतल्यावर ४० रुपयांवर राहण्यास तयार व्हावें लागतें ही अत्यंत शोचनीय स्थिति नाहीं काय ? बेकारांची खानेसुमारी झाली नसल्यानें ठाम आंकडे देतां येत नाहींत. तथापि तिच्या व्याप्तीची अटकळ व अंदाज पुढील उदाहरणांवरून वाचकांना बांधतां येईल.

(१) इ. स. १९३२ सालीं वऱ्हाड व मध्यप्रांतांत इन्‌कमटॅक्स खात्यांत १३ जागा भरावयाच्या होत्या. त्याकरितां अर्ज ४००० उमेदवारांचे आले. पदवीधरांना वेळींच जागें करावें म्हणून, प्रो. राधाकृष्ण यांनीं नागपूर युनिव्हर्सिटीच्या पदवीदान समारंभाच्या वेळीं, ही गोष्ट प्रामुख्यानें सांगितली. (२) परवां आग्र्यास पोलिसांतील कॉन्स्टेबलच्या म्हणजे शिपायाच्या १६ रुपयाच्या जागेकरितां असंख्य अर्ज आले. त्यांत एक बी. ए. व दोन इंटर पास झालेले उमेदवार होते. अर्थात्

वरील तिघांनाच ह्या हलक्या जागा मिळाल्या. मॉडर्न रिव्ह्यूचे विद्वान् संपादक रामानंद चतर्जी यांनीं ही बातमी आपल्या मासिकांत देऊन, दुःखांत सुख अगर वाईटांतून चांगलें निघतें, असें म्हणून पोलीस खात्याची आतां सुधारणा होईल अशी टीका केली. हें बऱ्याच वाचकांनीं वाचलें असेल. ( ३ ) गेल्या ऑगस्टमध्यें मद्रास इलाख्यांतील एलोरच्या पोलीस सुपरिंटेंडेंटनीं कांहीं पोलीस शिपायांच्या जागांची भरती केली. त्या वेळीं या जागाकरितां एक बी.ए., सहा इंटर व पंचवीस मॅट्रिक उमेदवारांचे अर्ज होते. बी.ए. व इतर सुशिक्षितांची भरती झाली. ( ४ ) गेल्या सालीं जुलई महिन्यांत अहमदनगर येथें पंधरा पोलीस कॉन्स्टेबलच्या जागा भरणेच्या होत्या. या जागेकरतां एकंदर नऊशेंहे अर्ज आले. त्यांत नापास बी.ए. (अंडर ग्रॅज्युएट) व मॅट्रिक लोकांचे बरेच अर्ज होते. ( ५ ) अहमदनगर येथेंच गेल्या जूनमध्यें मिलिटरी इंजीनियरिंग खात्यांत पन्नास रुपये पगाराची, सहा महिने मुदतीची हंगामी कारकुनाची जागा रिकामी होती. त्याकरितां सहाशें पदवीधरांनीं अर्ज केले. त्यांत कायद्याचे व इंजीनियरिंगचे पदवीधर ( एल्एल्. बी. व बी. ई. ) होतेच. शिवाय पेन्शन घेतल्यावर ऑनररी मॅजिस्ट्रेटचें काम करणाऱ्या एका जज्जाचाही अर्ज होता; आणि आय्. सी. एस्. परीक्षा पास झालेल्या पण जागा खालीं नसल्यामुळें नोकरी न मिळालेल्या गृहस्थाचाही अर्ज होता.

वरील उदाहरणांवरून शितावरून भाताची परीक्षा या न्यायानें बेकारीच्या व्याप्तीची वाचकांना कल्पना येईल. " सकाळ " वर्तमानपत्रांतील ' नोकरी पाहिजे ' हें सदर वाचक वाचत असतीलच. यावरूनही बोध होईल. वरील उदाहरणें बेकारांची संख्या दाखविणारीं झालीं. आतां बेकारीला कंटाळून जीव दिलेल्यांचीं उदाहरणें थोडीं देतों. ( १ ) अलाहाबाद येथें १९३३ च्या ऑगस्टमध्यें एम्. एस्सी. पदवी घेतलेल्या एका बंगाल्यानें अफू खाऊन जीव देण्याचा प्रयत्न केला. मॅजिस्ट्रेटपुढील जबाबांत तो म्हणाला कीं, '१९३२ सालीं लखनौ युनिव्हर्सिटीची एम्. एस्सी. ची

पदवी मी घेतली. पुढें नोकरी कांहीं केल्या मिळेना. त्यामुळें घरची मंडळी मजवर रुष्ट झाली. वैतागून मी अफू खाल्ली आहे. जामिनावर आपण मला सोडाल तर मी पुन्हां निःसंशय जीव देईन. याची खात्री बाळगा, इतका मी बेकारीस व त्यामुळें जिवास कंटाळलों आहे, (२) इ. स. १९३३ च्या आगष्टमध्यें दोन सुशिक्षित हिंदु तरुणांनीं लाहोरपासून चार मैलांवर फ्रँटियर मेलखालीं रुळावर निजून जीव दिला. जीव कां दिला याच्या चौकशींत दीर्घकाल बेकारी हें कारण असल्याचें आढळून आलें. (३) इ. स. १९३४ च्या जूनमध्यें दिनेशचंद्र रॉय नांवाच्या कानपूरच्या पदवीधरानें हरिद्वार येथें, आगगाडीच्या डब्यांत पोट्याशियम सायनाइड हें विष खाऊन जीव दिला. पोलिसास लिहून ठेवलेल्या पत्रांत त्यानें असें नमूद करून ठेवलें होतें कीं, ' मी बी. ए. ची पदवी घेऊन सहा वर्षें झालीं. आज या सहा वर्षांत नोकरीच्या शोधाकरितां एका जागेहून दुसरीकडे सारखा भटकत आहे. पण नोकरी मिळत नाहीं. अशा परिस्थितींत जगण्यांत हंशील नसल्यानें जीव देत आहे.' (४) १९३४ च्या जानेवारीमध्यें डेप्युटी कलेक्टर एस्. आर्. दाते यांच्या शंकर नांवाच्या मुलानें अंगावर राकेल ओतून घेऊन आग लावून कल्याण येथें जीव दिला. मृत्यूच्या चौकशींत बापानें सांगितलें कीं, मुलगा एम्. एस्सी. दोन तीनदां नापास झाला. या अपयशाचा फार वाईट परिणाम त्याचे मनावर होऊन त्यानें जीव दिला. (५) याच महिन्यांत मुंबई येथें शास्त्री हॉलमध्यें गंगाधर लक्ष्मण जोशी नांवाच्या एम्. बी. बी. एस्.च्या विद्यार्थ्यानें पुरंदरे नांवाच्या मित्राचे घरीं आत्महत्या केली. चौकशींत सदर जोशी एम्. बी. बी. एस्. परीक्षा तीनदां नापास झाला असून पैशाच्या भयंकर अडचणींत असल्याचें आढळून आलें. वरील उदाहरणांवरून सुशिक्षित व ब्राह्मण लोकांत बेकारी किती फैलावली आहे, आणि जीव देण्यापर्यंत मजल कशी जात आहे याची कल्पना वाचकांना आली असेलच. इंग्लंड, अमेरिका, जर्मनी, फ्रान्स वगैरे देशांतून सुशिक्षित व अशिक्षित अशा सर्व प्रकारच्या बेकारांची गणती करून ठेवलेली असते. वेळोवेळीं ही संख्या वाढली अगर कमी झाली याची माहिती प्रसिद्ध

केली जाते. त्यामुळें वरील देशांतून बेकारांची संख्या अमूक वेळेला किती आहे हें कळण्यास मार्ग असतो. हिंदुस्थानांत तशी व्यवस्था नाहीं. तथापि सर्व प्रकारचे मिळून पांच कोट बेकार हिंदुस्थानांत आहेत, असें बऱ्याच तज्ज्ञांचें मत आहे.

**ब्राह्मण तरुणांनो, डिग्रीचा, पदवीचा मोह सोडा--** प्रत्येक ब्राह्मण तरुणास आपल्या नांवापुढें पदवीचीं दोन अक्षरें असावींत असें वाटतें. ही त्याची मोठी महत्त्वाकांक्षा व अगदीं आवडती इच्छा असते. डिग्रीची इतकी मोहिनी त्यांवर पडलेली आहे. डिग्री मिळविणें ' हीच आयुष्याची इतिकर्तव्यता ' असें ब्राह्मण तरुणांना वाटतें. विद्यार्थी पदवीधर झाला कीं तो विद्वान्, सुसंस्कृत सर्व कांहीं बनतो, अशी भोळी व खोटी कल्पना तरुणांची असते. त्यांनीं डिग्रीचें विनाकारण स्तोम माजविल्यानें, आजचा डिग्रीचा मार्ग म्हणजे उपासमारीचा मार्ग होय, ही गोष्ट त्यांच्या लक्षांत येत नाहीं. मृगजळासारखें तिच्यामागें धांवून ब्राह्मण तरुण आपला माध्यान्ह काळ कठीण करून घेत आहेत. खरें पाहूं गेलें तर, डिग्री म्हणजे कांहीं मोक्ष नाहीं आणि पदवीधर विद्वान् सुसंस्कृत असतो, असेंही नाहीं. डिग्री न घेतलेल्या लोकांमध्यें थोर थोर पुरुष आजही आहेत. ते इतके थोर आहेत कीं, त्यांचींच नांवें इतिहासांत चिरकाल राहतील; पण बऱ्याच पदवीधरांचा मागमूस व पत्ताही पुढील पिढीस राहणार नाहीं. याबाबत ब्राह्मण तरुणांत जोराची चळवळ होणें जरूर आहे. त्याशिवाय ही मोहिनी दूर होणार नाहीं. बंगालचे जगप्रसिद्ध रसायनशास्त्रज्ञ सर पी. सी. रे यांनीं त्रावणकोर येथील कॉलेजच्या विद्यार्थ्यांना १९३२ सालीं जो उपदेश केला तो ब्राह्मणांनीं सतत मनांत वागवणें फार अगत्याचें आहे. ते म्हणाले कीं, ' कीर्ति मिळवण्याची हांव धरल्यास एखादे वेळेस मनुष्य प्राणास मुकतो. पण आधुनिक शिक्षणाचा हव्यास बाळगणाऱ्यास उपाशीच तडफडावें लागतें. शिवाय युनिव्हर्सिटीकडून मिळणाऱ्या पदव्या म्हणजे पोष्टाचीं तिकीटेंच होत. या पदव्यांमुळेंच हिंदुस्थान निकृष्टावस्थेप्रत पोंचला आहे. इंग्लंडचे मुख्य प्रधान रॅम्से मॅकडोनाल्ड, इटालीचे

डिक्टेटर-हुकूमशहा-मुसोलिनी, अमेरिकेचे माजी प्रेसिडेंट हूव्हर, बेंजामिन फ्रँकलीन, अँड्र्यू कॉर्नेजी ही मंडळी युनिव्हर्सिटी शिक्षण न घेतां व कोणतीही पदवी न मिळवितां मोठ्या थोर पदवीस चढली आहेत. तरी विद्यार्थ्यांनो "उद्योगी बना."

वरील उपदेश ब्राह्मण तरुणांनीं आज आपल्या हृदयावर खोदून ठेवण्यासारखा नाहीं काय? आपले माजी व्हाइसरॉय लॉर्ड आयर्विन यांनीं एकही परीक्षा दिली नव्हती व पदवी संपादन केली नव्हती. पण त्यामुळें हिंदुस्थानचा व्हाइसरॉय होण्यास बाध कांहीं आला नाहीं. एका बक्षिस-समारंभाचे वेळीं त्यांनीं आपण एकही परीक्षा पास नसल्याचें सांगितलें आणि परीक्षा ही एक माणसाची योग्यता ठरविणेचें ओबड धोबड व अंदाजी साधन आहे, त्यावर भर देऊं नका, असेंही विद्यार्थ्यांस बजाविलें. आपल्याकडील संस्थानिकांत कै. श्रीमंत माधवराव शिंदे, श्रीमंत सयाजीराव गायकवाड, श्रीमंत नारायणराव घोरपडे, श्रीमंत चिंतामणराव पटवर्धन व नामदार आगाखान ही मंडळी पदवीधर नसूनही कर्तबगार असल्याचें सर्वांना माहित आहेच. तसेंच सरदारांपैकीं श्रीमंत मुजूमदार, श्रीमंत जगन्नाथमहाराज यांची कौन्सीलांतील कामगिरी विश्रुतच आहे; पण हे पदवीधर नाहींत. जगद्‌विख्यात वंग कविसम्राट् रवींद्रनाथ टागोर यांनीं एकही परीक्षा दिली नाहीं. पण त्यामुळें विश्वभारती विद्यापीठाचे कुलगुरु होण्यास त्यांना कांहीं बाध आलेला नाहीं. आपले प्रसिद्ध कादंबरीकार कै. हरीभाऊ आपटे, नारायण हरी आपटे, भा. वि. उर्फ मामा वरेरकर, वि. स. खांडेकर यांना एकही पदवी नाहीं. पण त्यांचे ग्रंथ विद्वन्मान्य आहेत. हरीभाऊ आपटे तर एम्. ए. चे परीक्षक असत. एकदां एका कज्यांत एका वात्रट वकिलानें आपण कोणची युनिव्हर्सिटीची पदवी घेतली आहे असा त्यांना प्रश्न केला. तेव्हां हरीभाऊंनीं आपण मेकर ऑफ एम. ए.–एम. ए. बनविणारे–आहोंत असें ताडकन् उत्तर दिलें. लोखंडी मालाचे कारखानदार रा. लक्ष्मणराव किर्लोस्कर व ऑनरेबल कूपर, गजानन वीव्हिंग मिलचे रा. विष्णुपंत वेलणकर, व्यंकटेश रंगतंतु मिलचे

फडणीस व मराठेटेक्स्टाइल मिलचे मराठे, शेंगा फोडण्याच्या यंत्राचे उत्पादक रा. रामभाऊ भिडे व दांडेकर, डोंगरेबालामृताचे कै. डोंगरे वगैरे आपल्याकडील प्रसिद्ध कारखानदार आहेत. पण त्यांतला एकही पदवी-विभूषित नाहीं हें तरुणांनीं लक्षांत घ्यावें. तसेंच कै. सर विठ्ठलदास ठाकरसी, सर इब्राहिम रहिमतुल्ला व सर लल्लूभाई सामळदास हे पदवी-विभूषित नसले तरी, लक्षाधीश कर्तबगार व्यापारी असल्याचें तरुणांनीं ध्यानांत धरावें. तेव्हां पदवी म्हणजेच मोठेपणा, सुसंस्कृतपणा, वगैरे खुळ्या कल्पना त्यांनीं आतां सोडाव्यात. लो. टिळक एका लेखांत म्हणतात कीं " पदवीदान झाल्याबरोबर आपण विद्येच्या शिखरावर जाऊन पोंचलों असें आमचे तरुण समजतात. आतां आपण विद्याव्यासंग करावयास नको म्हणून तो तेथेंच खुंटतो. पण झालेला विद्येचा संस्कार अगदीं अपुरा असून, वाचन, मनन व अभ्यास जर पुढें ठेविला नाहीं तर पदवीधर लोकांसही सुशिक्षित म्हणणेची सोय नाहीं. " टिळकांचा हा इषारा तरुणांनीं मनांत वागवावा. पदवीदान समारंभ आटपल्यावर किती पदवीधर व्यासंग पुढें, चालू ठेवतात असा प्रश्न केल्यास शेंकडा ९९ ठेवीत नाहींत, असेंच उत्तर येईल. मग पदवीचा इतका मोह कां? " ब्राह्मण आणि त्यांची विद्या " या पुस्तकास लिहिलेल्या सुंदर व विद्वत्ताप्रचुर प्रस्तावनेंत रावसाहेब चाफेकर म्हणतात कीं, ' परीक्षेंत पहिला नंबर मिळविल्यानें मेहनत अगर बुद्धिमत्ता फार तर व्यक्त होते. पण तेवढ्यानें मनुष्य विद्वान् ठरत नाहीं. परंतु पुढें व्यासंग न करितां बी. ए. ऑनर्स, रँगलर वगैरे मिळविलेल्या कुवारपणांतील प्रतिष्ठेवर आम्हीं मरेपर्यंत डामडौल मिरवितों. ' प्रि. गोळे यांनीं यापेक्षांही कडक भाषेंत याचा खल केला आहे. तेव्हां ब्राह्मण तरुणांना विनंती इतकीच कीं, " आतां पदवीचा मोह सोडा. " इंग्लंडमध्यें या पदव्यांबद्दल आतां असाच ग्रह होत चालला आहे. हल्ल युनिव्हर्सिटी कॉलेजचे प्रिन्सिपाल ए. ई. मॉर्गन आपल्या केंब्रिज विद्यार्थ्यांच्या नॅशनल युनियनपुढें केलेल्या भाषणांत म्हणतात कीं " युनिव्हर्सिटींतून पदवी घेऊन बाहेर पडलेल्या बऱ्याच विद्यार्थ्यांना सुशिक्षित म्हणतां येत नाहीं, ही मोठ्या दुःखाची गोष्ट आहे. हे परीक्षा पास होतात;

परंतु परीक्षांबद्दल मला फार शंका आहे. खरेंखुरें शिक्षण न मिळवितां लोक पास होतात; आणि याचा अनिष्ट परिणाम होतो. " ज्या बी. ए. च्या पदवीचें आपण इतकें स्तोम माजवितों ती अगदीं अलीकडची आहे आणि आज तारखेससुद्धां जर्मनींतील युनिव्हर्सिट्यांमधून व स्काटलंडमधील बऱ्याच युनिव्हर्सिट्यांमधून ही पदवी अद्यापही ठेविलेली नाहीं. तात्पर्य इतकेंच कीं 'बी.ए. 'स फाजील महत्त्व देऊं नका. शिवाय आज बी. ए. झालेल्या इसमास आपलें पोट भरतां येत नाहीं. अशा परिस्थितींत ही पदवी घेऊन काय उपयोग? सुभाषितकारांनीं म्हटल्याप्रमाणें हें पदवीचें शेपूट कुत्र्याच्या शेपटीसारखें " न गुह्यगोपने शक्त, नच दंशनिवारणे।" असें निरुपयोगी आहे. लाहोरच्या हेले कॉलेजचे फायनॅन्सचे प्रोफेसर आय. एम्. कपूर, बी.एस्सी. (लंडन) आपल्या " मी युनिव्हर्सिटीचा डिक्टेटर असतों तर, काय केलें असतें " या पुस्तकांत म्हणतात कीं, " नुसतें वाङ्मयीन बी. ए. चें शिक्षण हें फक्त ज्यांना माध्यान्हकाळची काळजी नाहीं अशा श्रीमंत लोकांकरितांच असावें. पण ज्यांना दुपारची भाजीभाकर मिळण्याची भ्रांत आहे असे पंजाबमधील व्यवहारचतुर लोक बी. ए. ची डिग्री मिळविणेच्या खटपटींत अहमहमिकेनें पडतात हें पाहून फार आश्चर्य वाटतें. बी. ए. ची पदवी ही फक्त श्रीमंतांच्या चैनीची एक गोष्ट आहे, तिकडे गरीबानें पाहूं नये."

आज आमच्यामध्यें असे किती लक्ष्मीपुत्र वरील चैन करण्यास समर्थ असे आहेत? खरें पाहूं गेलें तर लक्ष्मीच्या थोरल्या बहिणीची–आक्काबाईचीच–प्रजा आम्हां ब्राह्मणांत प्राधान्येंकरून असते. असो. आमची तरुण मंडळी रूढी व जुन्या कल्पना यांना आपण मुळींच बिलगून राहाणार नाहीं अशी बढाई मारतात. घरीं म्हातारी आई असली आणि तिनें भाबडेपणानें आपल्या मुलास जर सांगितलें कीं, " बाळ, जानवें अगदीं काढून टाकूं नकोस; डोकें राखलेंस तर निदान हिंदुत्वाची खूण म्हणून शिखासूत्र तरी ठेव." तर नैतिक धैर्य–मॉरल करेज–दाखवणारे हे बाळासाहेब कडाडतात कीं, काय खुळ्या कल्पना या! किती हें गतानुगतिकत्व! पण बी. ए. चा मार्ग आतां फलदायी

नगर वाचनालय, सातारा.

नाहीं, त्यानें पोट भरत नाहीं; हें कळूनसुद्धां एकामागें एक मेंढयासारखें आमचे तरुण पदवीकडे धांव घेतात आणि बेकारीच्या खड्डयांत पडतात. घरच्या म्हातारीचे काळ असलेले हे तरुण ' गतानुगतिको लोको न लोकः पारमार्थिकः। ' या सुभाषिताप्रमाणें कापुरुष होऊन, ' बी. ए. ' या क्षारजलाच्या ज्ञानवापीचें पाणी पीत राहतात. त्यावेळीं त्यांचें नैतिक धैर्य कोठें जातें कोणास ठाऊक !

तरुणांइतकेंच, ब्राह्मण आईबाप व पालक पदवीनें मोहित झालेले असतात. बी. ए. होऊन नोकरी मिळत नाहीं असें कळूनसुद्धां, आपला बाळ्या एकदां बी. ए. होऊं दे म्हणून पोटाला चिमटा घेऊन, प्रसंगवशात् बायकोच्या अंगावरील दागिने विकून, आईबाप बाळ्याला बी. ए. करितात. त्यांना अजूनही वाटतें कीं बाळ्या बी. ए. झाल्यावर आपले पांग फेडील; पण तुकोबा विचारतात कीं " पेरी कडू जिरें, मागे अमृत फळें। अर्कावृक्षा केळें कैशीं येतीं ? " याप्रमाणें बी. ए.चें कडू जिरें पेरल्यावर संपत्तीचीं फळें कशीं यावींत ? हें या आईबापांना कळत नाहीं. येथें मिळत असलेलें पाश्चिमात्य शिक्षण मदिरा आहे, अमृत नाहीं; हेंही आईबाप व पालक विसरतात. एखादे वेळेस बी. ए. झालेल्या मुलास मोठ्याची मुलगी सांगून येते; पण या मुलीचे बापास पुढें जन्मभर आपल्या मुलीचें काय होईल या चिंतेंत चूर व्हावें लागतें. पुढें या पदवीधर मुलास पंचवीसावें वर्ष लागलें, तो दोन मुलांचा बाप झाला, तरी पोटास मिळविण्याची अक्कल त्याला नसल्यामुळें, त्याच्या वृद्ध बापास सर्वांनाच पोसत बसावें लागतें. कोण ही शोचनीय स्थिति ! आणि ही स्थिति ब्राह्मणांच्या घरोघरीं आज दिसून येत आहे. तथापि बी. ए.कडे मुलांस पाठवूं नये, ही सुबुद्धि मात्र सुचत नाहीं. एखाद्या बापाला कोणी सांगितलें कीं, बाबा रे आतां बी. ए. होण्यांत हशील नाहीं; तर त्याला हा उपदेश कडूच लागतो, व हें सांगणें तो मानत नाहीं. केवढी पहा ही पदवीची मोहिनी ! लेखकानें एका तीस रुपये मिळविणाऱ्या कारकुनास सांगितलें कीं मेहेरबानी करून आपल्या मॅट्रिक झालेल्या मुलास कॉलेजमध्यें घालूं नका; कारण बी. ए. आतां पोलिसांत १५ रुपयांवर कॉन्स्टेबलच्या जागीं राहूं लागले आहेत इतकी हलाखी आहे. पण या

८३०२
आ४।३९

सल्ला सदर गृहस्थास रुचला नाहीं. चार वर्षांत रडत खडत बी. ए. झाल्यावर यांचा मुलगा काय ध्वज लावणार कोणास ठाऊक! तथापि यांत पालकाचा विशेष दोष आहे असें नाहीं. पदवीधराला १५ रुपयांची नोकरी देऊं लागले आहेत हें कळलें तरी उघड्या डोळ्यांनीं प्राण जात नाहीं; अशी त्यांची स्थिती होते आणि पोराला मग इंग्रजी शाळेंत घालतात.

तरी सभांतून, वर्तमानपत्रांतून, तरुणांच्या मनावरील ही पदवीची मोहिनी घालविणेबद्दल, सारखी प्रचंड चळवळ झाली पाहिजे. ' पदवी म्हणजेच सर्व कांहीं ' ही भावना सोडा असें वरचेवर कानींकपाळीं ओरडून सांगितलें पाहिजे. तरच कांहीं तरणोपाय आहे. नाहीं तर नाश हा ठेवलेलाच! सरते शेवटीं बी. ए. चें ज्ञान किती अकटश्च विकटो असतें, हें सांगून हा लांबलेला विषय संपवितों. मद्रास हायकोर्टाचे माजी जज्ज सुप्रसिद्ध सर शिवस्वामी अय्यर एकदां दिल्ली येथें आय्. सी. एस्. ची तोंडी परीक्षा घेत होते. एका पदवीधराच्या सर्वसाधारण ज्ञानाची चांचणी करावी म्हणून त्यांनीं त्याला विचारलें कीं, दिल्लीहून ऑस्ट्रेलियास जाण्याचा सगळयांत जवळचा मार्ग कुठला? त्यानें उत्तर दिलें कीं "प्रथम दिल्लीहून लंडनला जाईन. तेथून सेंट पिटर्सबर्ग, तेथून मग ऑस्ट्रेलियाला जाईन." शिवस्वामी पुढें सांगतात कीं, ' पुष्कळ विद्यार्थ्यांना हिंदुस्थानांतील प्रांत व त्यांच्या राजधान्या सांगतां आल्या नाहींत आणि पुष्कळांना कोशाचा—डिक्शनरीचा—उपयोग कसा करावा हें कळत नव्हतें!' पदवीधरांचें केवढें हें अगाध ज्ञान! किती ही गाढ विद्वत्ता! आणखी एक गोष्ट लक्षांत घेण्यासारखी अशी कीं, हल्लींची मुंबई युनिव्हर्सिटी ही खरी युनिव्हर्सिटीच नाहीं. ती फक्त परीक्षा घेऊन पदवी देणारी टांकसाळ आहे. कारण कार्डिनल न्यूमन आपल्या सुप्रसिद्ध "आयडिया ऑफ ए युनिव्हर्सिटी" या पुस्तकामध्यें म्हणतात कीं "ज्या युनिव्हर्सिटीमध्यें विद्यार्थ्यांना एकत्र राहण्याची, परस्परांत मिसळून ज्ञान संपादन करण्याची सोय नाहीं, ती 'सो–कॉल्ड' म्हणजे नांवाचीच युनिव्हर्सिटी होय. नुसती परीक्षा घेऊन पदव्या देणाऱ्या युनिव्हर्सिटीपेक्षां

जेथें प्रोफेसर नाहींत, किंवा परीक्षाही नाहींत; पण विद्यार्थ्यांना एकत्र राहून परस्परांत मिसळण्याची सोय आहे, अशी रेसिडेन्सियल युनिव्हर्सिटी मी अधिक पसंत करीन." सबब शेवटीं ब्राह्मण तरुणांना विनंती इतकीच कीं, आतां पदवीचा मोह सोडा, कॉलेजांना राम राम ठोका, आणि आपलें नैतिक धैर्य दाखवा. आईबाप व पालक यांनाही विनवणी कीं, मुलांना बी. ए.कडे पाठवावयाचें नाहीं असा निश्चय करून, हा नियमच करा. या नियमाला अर्थात् अपवाद पुढील दोन असणार. श्रीमंत असतील त्यांनीं बी. ए., एम्. ए. खुशाल व्हावें. तसेंच तैल बुद्धीचे, अव्वल दर्जाचे जे विद्यार्थी असतील त्यांनीं आय्. सी. एस्.सारख्या परीक्षेकरितां कॉलेजचें शिक्षण पाहिजे तर घ्यावें; पण दुय्यम बुद्धिमत्तेच्या तरुणांनीं बी. ए. चा नाद अजीबात सोडावा.

**नोकरीचा पाश तोडा**—आजकाल नोकरी ही पुष्कळ जणांस प्यारी आहे. यांत कांहीं शंका नाहीं. तरुणांच्या व पालकांच्या मनांला भुरळ घालणारी डिग्रीइतकीच दुसरी गोष्ट म्हणजे नोकरी होय. निदान महाराष्ट्रांत सरकारी नोकरी इतकी प्यारी आहे कीं, विलिंग्डन कॉलेजचे प्रिन्सिपाल लिमये यांच्या मतें, ब्राह्मण–ब्राह्मणेतर वादाचें मूळ या मोहिनींतच आहे. तेव्हां नोकरी 'इतकी कां प्यारी' याची थोडीशी मीमांसा करूं. बऱ्याच जणांना मानसन्मानाची आवड असते. आपल्याला रावसाहेब म्हणावें, आपल्यापुढें पट्टेवाला चालावा व लोकांचे मुजरे दोन्ही बाजूंनीं झडावेत, अशी आवड बऱ्याच लोकांना असते. शिवाय नोकरींत ठराविक वेळेस बढती, आजारी पडल्यास रजा, व मोजकें काम हेही फायदे असतात. त्यामुळें नोकरीबद्दल इतकी मोहिनी वाटते व म्हणून ती आवडती होते. पण खरें पाहूं गेलें असतां नोकरी म्हणजे श्ववृत्ति–कुत्र्याची वृत्ति–होय. वरिष्ठांना संतुष्ट ठेवल्याशिवाय नोकराचें पाऊल पुढें पडतच नाहीं—

कष्टं जीवति गणिका, गणकोऽपिच, राजसेवको, वैद्यः ।
दिवसे दिवसे मरणं, परस्य यच्चित्तरंजनं वृत्तिः ॥

या सुभाषिताप्रमाणें सेवकाचें रोज मरण असतें. मालक नाखुष होतो काय? आणि नोकरी जाते काय? अशी भीति रोज त्याला मनांत बाळगावी लागते. हुजूर हुकूम ( हु. हु. ) पाहून नोकराचे छातींत धडधडतें व तो हाः हाः करूं लागतो. म्हणूनच भर्तृहरीनें* सेवाधर्म फार गहन असून योग्यांनाही तो अगम्य आहे असें म्हटलें आहे. एकदां मनुष्य सेवावृत्तींत गुंतला कीं, स्वाभिमान, ओज वगैरे त्याचे सर्व गुण नष्ट होतात. सेवाधर्मच असा अगम्य आहे. म्हणूनच आपल्या इकडे उत्तम शेती, मध्यम व्यापार आणि कनिष्ठ नोकरी अशी म्हण आहे. पंचतंत्रांत—

सेवया धनमिच्छद्भिः सेवकैः पश्य यत्कृतम् ।
स्वातंत्र्यं यच्छरीरस्य मूढैस्तदपि हारितम् ॥

अशी सेवकांची निर्भर्त्सना केली आहे. ती यथायोग्यच आहे. व्यासांनीं जिवंत असून मेलेले पांच प्रकारचे जे लोक सांगितले आहेत त्यांत नित्यसेवकांची गणना केली आहे. तेव्हां नोकरीचें स्तोम माजविण्यांत हशील काय?

सेवा धर्मामध्यें पडलेले लोक नैतिक दृष्ट्याही फार हीन दर्जाचे होतात. ‘ वरच्यास हात व खालच्यास लाथ ’ (लिक अप किक बिलो) हें नोकरांचें ब्रीदवाक्य होऊन राहतें. नोकरी मिळवितांना जात गोत लपविणेंची प्रवृत्ति होते. इतका स्वजातीय अभिमानाचा लोप होतो. श्रीयुत न. चिं. केळकर आपल्या ‘ तरुण हिंदु नागरिकांत ’ लिहितात कीं “ हल्लीं ब्राह्मणांना नोकरींत जागा देऊं नये, असें धोरण आहे हें जाणून कांहीं ब्राह्मण अर्जदार आपली जात कोंकणस्थ, देशस्थ ब्राह्मण वगैरे अशी न सांगतां नुसतें कोंकणस्थ, देशस्थ अशी सांगतात. हेतु हा

---

*मौनें मूक दिसे वदे तरि महावाचाल पार्श्वीं फिरे
तेव्हां धीट तसा विवेकच नसे जैं चालतां अंतरे ॥
क्षांतीनें तरि भ्याड शांति न धरी तैं गांवडा यापरी ।
सेवाधर्म असा अगाध कथिला हा जाण योगीश्वरीं ॥
—वामन पण्डित.

…र वाचनालय, सातारा.

कीं आपल्यास ब्राह्मण न समजतां नोकरी मिळेल." तात्पर्य नोकरीकरितां ब्राह्मण म्हणवून घेण्याची लाज आम्हांस वाटूं लागली आहे. तसेंच कांहीं ब्राह्मण आपल्या आडनांवावरून जातीचा बोध होऊं नये म्हणून, आडनांवाचे ठिकाणीं आपले गांवचें नांव लावतात. कुलकर्णी, जोशी असें अर्जांत आडनांव न लिहितां, त्या ठिकाणीं बेडक्याळे, आजरेकर, अशीं आडनांवें लावतात. कोण ही अधोगति! ही सेवावृत्ति आमच्यांतून पार नाहींशी झाली पाहिजे. नोकरीचें स्तोम विनाकारण माजणार नाहीं अशी चळवळही जोरांत होणें जरूर आहे. "शरीरपोषणास अन्न सेवन करावें लागतें व त्याच्यामागें कांहीं विधीही–बहिर्दिशेस, शौचास जाण्याचा–करावा लागतो. तद्वत् नोकरी हें स्वसंरक्षणाचें साधन आहे. यापलीकडे तिची थोरवी मानावी, इतकेंच नव्हे तर तीस जन्माचें एकंदर सार समजावें ही फार मोठी चूक आहे." असे उद्गार लो. टिळकांनीं काढले आहेत ते मार्मिक नाहींत काय? '**अगांतुक अधिकाराची नोकरी तितपतच**' आणि '**परवशता व अंमलदाराचें मानसिक दौर्बल्य**' हे त्यांचे दोन ओजस्वी लेख तरुणांनीं वाचावेत अशी जोराची शिफारस आहे. तात्पर्य काय, तर ब्राह्मण तरुणांनीं व पालकांनीं नोकरी हें ध्येय सोडलें पाहिजे. कारण, एकतर तें किळसवाणें व स्वाभिमानादि गुणांचा लोप करणारें आहे. सेवावृत्ति–सर्व्हिस मेंटॅलिटी–आम्हां ब्राह्मणांची पार गेली पाहिजे. सेवाधर्म हा शूद्र धर्म आहे असें आमचें जुनें शास्त्र सांगतें. वर्णाश्रम धर्माभिमान्यांनीं तरी निदान हा सेवाधर्म टाकून देऊन वैश्य धर्म स्वीकारणें-बद्दल, म्हणजे एक पायरी वर येणेंबद्दल, खटपट करणें जरूर आहे. आतांपर्यंत ब्राह्मणांनीं सबॉर्डिनेट नोकऱ्या बऱ्याच व्यापल्या होत्या. इतर जातींना त्या आतां व्यापण्याची संधी देणें एक प्रकारें न्याय्य आहे. सबब वोहरी लोकांप्रमाणें नोकरी करावयाची नाहीं, असें ध्येय आंखणें व हा धर्म पाळण्याची खबरदारी घेणें आजच्या मितीस जरूर व इष्ट आहे. "नोकरीशिवाय तरणोपाय नाहीं असा शिकलेल्या व शिकणाऱ्या लोकांचा ग्रह होत चालला आहे. नोकऱ्या तर मिळत नाहींत; शेतकीचा धंदा विद्वानांच्या दर्जाखालचा; व्यापारास भांडवल लागतें;

तेव्हां येऊन जाऊन पुन्हां नोकरी–एक नोकरी–आणि तिचा अभाव हे शब्द सर्वत्र कानीं पडत आहेत. विद्वत्ता व सेवकत्व यांची गट्टी इतकी घट्ट आपल्या लोकांच्या मनांत बसली आहे. ही स्थिती शोचनीय आहे हें जितकें लवकर आपल्या लोकांस उमजेल तितकें चांगलें." वरील लो॰ टिळकांचा उपदेश याबरोबरच तरुणांनीं ध्यानांत घ्यावा. दाउदी बोहरी ज्याप्रमाणें धर्मसंरक्षण व शीलवृद्धी याकरितां कोणाचेंही अंकित न राहणें हें फार जरूरीचें समजतात तसें आम्हीही समजलें पाहिजे. समाजांतील सुख व नीतिमत्ता कायम राखणेस व्यापाराचीच कास आम्हीं धरली पाहिजे. तेव्हां सांगण्याचें तात्पर्य इतकेंच कीं, डिग्री व नोकरी यांचा मोह ब्राह्मण तरुणांनीं व पालकांनीं आपल्या मनावरून शक्य तितक्या लवकर दूर करावा. गेलीं हजारों वर्षें मारवाडी व बोहरी जातींनीं नोकरी न करितां आपला संसार उत्तम तऱ्हेनें चालविला आहे. तेव्हां नोकरी करावयाची नाहीं असा निश्चय ब्राह्मणांनीं केल्यास ते उपाशी खास मरणार नाहींत.

**ब्राह्मण समाजाची आजची स्थिति**–ब्राह्मण समाजाची स्थिति अतिशय वाईट झालेली, खालावलेली आहे. ब्राह्मणांना व्यापार कधींच येत नव्हता. येऊन जाऊन नोकरीच काय तें त्यांचें मायपोट आजवर होतें. पण इतर जातींनीं आतां नोकऱ्या पूर्णपणें आक्रमिल्या आहेत आणि सरकारी धोरणही नोकरी मिळविणेबाबत ब्राह्मणांना विशेष अनुकूल नाहीं. वकिली, डॉक्टरी वगैरे धंद्यांतूनही, इतर जातींचा प्रवेश झाल्यामुळें, तेथूनही ब्राह्मणांची हकालपट्टी झालेली आहे. 'शिव शिव न हिन्दुर्न यवनः ।' सारखी, त्यांची स्थिति झाली आहे. नोकरीशिवाय दुसरा धंदा येत नाहीं. नोकरी तर मिळत नाहीं. **त्यामुळें उपाशीं तडफडून मरण्याची पाळी आज ब्राह्मण समाजावर आली आहे.** दिवसेंदिवस हा समाज अगदीं गरीब कंगाल, व भुकेबंगाल होत चालला आहे. तरुण पिढी शिकून सवरून तयार होत आहे पण पुढील मार्ग कांहीं सुचत नसल्यानें किंकर्तव्यमूढ झाली आहे. तरुण बेकार झाल्यामुळें, घरोघरीं वीस पंचवीस वर्षांच्या मुली लग्नावांचून राहून आईबापांच्या हृदयाचा ठाव

काळजीनें घेत आहेत. कारण आपलेंच पोट भरण्यास असमर्थ असलेले तरुण, लग्न करून, भावी प्रजेच्या पोटाची जबाबदारी आपल्या शिरावर घेण्यास तयार नाहींत. योग्य वेळीं लग्न न झाल्यानें निसर्गाचा अंमल होऊन मुलींचें पाऊल वांकडें पडण्याचा बराच संभव आहे. आणि "स्त्रीषु दुष्टासु वार्ष्णेय जायते वर्णसंकरः।" ही आपत्ती ब्राह्मण समाजावर ओढवल्याशिवाय राहाणार नाहीं. आंग्लाईच्या ऐन सुरवातीस नोकऱ्या, वकिली, डॉक्टरी वगैरे धंदे करून मिळविलेलें द्रव्य या समाजाचें आतां संपुष्टांत आलें आहे. समाजाचें धारण पोषण करण्यास समर्थ असे लक्ष्मीपुत्र, पारशी गुजराथी समाजासारखे, आमच्यांत नाहींत. ब्राह्मणांतील चार पुढारी विद्वान् मंडळी समाजसेवाप्रिय व परोपकारवृत्तीची राजकारणांत गुंतून पडली आहेत. ब्राह्मण–ब्राह्मणेतर वाद आतां शमला असला तरी त्यानें व इतर कारणांनीं ब्राह्मण समाज अगदीं जर्जर व खिळखिळा झाला आहे. आज त्याला वाली कोणी नाहीं. ना आई ना बाप, अशी त्याची स्थिति आज झाली आहे. एकीकडे एका पददलित ( डिप्रेस्ड ) वर्गाची–अस्पृश्यांची–उन्नति करण्याची प्राणांतिक खटपट महात्मा गांधी करीत आहेत तर दुसरीकडे अद्भुत विधिघटनेनें ब्राह्मणांचा दुसरा एक पददलित ( सिप्रेस्ड ) वर्ग तयार होत आहे. पण या वर्गास आपल्या उद्धारास महात्मा मिळणें कठीण आहे. कारण शहाणपणाचा छाप याच्या डोक्यावर मारलेला आहे.

ब्राह्मण समाज नाशाच्या गर्तेच्या कड्यावर उभा आहे. पण अत्यंत दुःखाची गोष्ट ही कीं, समाजांतील शहाणी सुर्ती मंडळी इकडे डोळेझांक करीत आहेत. 'एकच प्याला' नाटक पाहतांना डोळ्यांतून पाणी टाकणारे, अश्रू गाळणारे, बरेच ब्राह्मण दिसतात. पण ब्राह्मणांच्या नाशाचें नाटक पाहून अद्यापही त्यांचें मन द्रवत नाहीं. यापेक्षां अधिक दुर्दैव कोणतें ? आपला समाज घसरगुंडीस लागला आहे. शारीरिक, बौद्धिक, मानसिक व आर्थिक वगैरे सर्व बाबतींत स्थिति क्षणोक्षणीं वाईट होत चालली आहे. असा इषारा चाळीस वर्षांपूर्वीच महाभाग प्रि० गोळ्यांनीं आपल्या 'ब्राह्मण आणि त्यांची विद्या' या पुस्तकांतून अत्यंत हृदयस्पर्शी व मर्मभेदी वाणीनें ब्राह्मण समाजास दिला असूनही

तिकडे आजवर कोणीही लक्ष दिलेलें नाहीं. त्यांचा आक्रोश अरण्यरूदनवत् झाला आहे व सदुपदेश ' पालथ्या घागरीवर पाणी व मूर्खाला कहाणी, ' असा फुकट गेला आहे. अजागळ व अजगरवृत्तीचा पण स्वतःला शाहणा समजणारा आमचा हा कुंभकर्णी समाज, त्यांच्या नगाऱ्यानें यत्किंचितही जागा झाला नाहीं. ही एकच गोष्ट आमचा नादानपणा व्यक्त करण्यास पुरेशी आहे. प्रि. गोळे लिहितातः " ब्राह्मण जातीच्या कुटुंबाच्या सरासरी मिळकतीचा, साल अखेर आढावा काढल्यास, प्रत्येक कुटुंब गरीब होत आहे असें दिसेल. कुलीन व संपत्तिमान कुटुंबें दिवसेंदिवस नाहींशीं होत आहेत. त्यांच्या जागीं, तशींच तितक्या योग्यतेचीं दुसरीं कुटुंबें उत्पन्न झालेलीं फार थोडीं दिसतात. दर पांच वर्षांनीं ठिकठिकाणचीं एकंदर घराणीं मोजून पाहिल्यास ही स्थिति तेव्हांच लक्षांत येईल. प्राप्ती थोडी, मुलें पंचवीस वर्षांचीं होईपर्यंत कुटुंबभार उचलणेस नालायख व नाराज, त्यांचा अभ्यास संपत नाहीं व नोकरी त्यांस मिळत नाहीं; बुद्धीच्या व शरीराच्या ऱ्हासाबरोबर आर्थिक सुस्थितीचाही ऱ्हास होत आहे. ब्राह्मणाचे स्नायु महिना पांच रुपयेहि मोलाचे नाहींत. ब्राह्मणांच्या बुद्धीस असें पीक आलें आहे कीं, उत्तम माल दुर्मिळ खरा पण भिकार माल कुजून जाण्याइतका तयार आहे. " नोकरीमध्यें इतर ज्ञातीनीं वाटणी घेण्याचें काम सुरूं केलें आहे. मामलेदार मुन्सफाच्या जागा ब्राह्मणांना आतां दुर्मिळ आहेत. जे हल्लीं या जागेवर आहेत, त्यांच्या मुलांना पुढें या जागा मिळण्याचा कितीसा संभव आहे ! जेथें बाप दोन चारशें रुपये मिळवत आहे तेथें त्याचीं मुलें वीस पंचवीस रुपये मिळवून स्वस्थ आहेत. **जर ब्राह्मण लोक वेळेवर सावध होऊन स्वतःचें खरें सामर्थ्य वाढविण्याच्या खटपटीस लागणार नाहींत तर मिशांस लावण्यापुरताही तुपाचा अंश घरांत नाहीं, अशी स्थिति खात्रीनें येईल व आंतल्या आंत हाल सोसावे लागतील. पुढें जी स्थिती होईल ती शब्दांनीं कशास लिहावी ? "** इ. स. १८९४ सालीं ही हृदय पिळवटणारीं वाक्यें प्रि. गोळयांच्या तळमळणाऱ्या अंतःकरणांतून

बाहेर पडलीं. आज त्याला चाळीस वर्षें होत आलीं; आणि ब्राह्मण जातीनें सामर्थ्य व कर्तृत्व वाढविण्यास तेव्हांपासून आज तारखे-पर्यंत, प्रि० गोळयांच्या इषाऱ्याप्रमाणें काय खटपट केली असा सवाल कोणी केल्यास त्याचें उत्तर आम्ही काय देणार? अर्थातच नकार होय. चाळीस वर्षांपूर्वीं जर आमची इतकी शोचनीय स्थिती होती तर तीं, सुधारणेच्या खटपटीचे पूर्ण अभावीं, भूमिती श्रेढीनें निकृष्ट, खालावलेली असणार हें सांगण्यास एखादा भविष्यवादी अगर गणिती याची जरूरी आहे असें नाहीं. आज घरोघरीं स्थिती—

पोरें सदैव रडतीं क्षुधितें कृशांगें।
स्त्री वस्त्र जर्जरित नेसुनि दीन वागे ॥
पाहोनि दुःख घरिचें जठरार्थ कैसें।
देहीति गद्गदरवें वदिजे प्रयासें ॥

या भर्तृहरीकृत वर्णनाप्रमाणें झाली आहे.

प्रि० गोळयांच्या भविष्याप्रमाणें खरोखरच पुष्कळ ब्राह्मणांच्या घरांत तूप मिशांना लावण्यापुरतेंसुद्धां मिळणार नाहीं. इंग्रजींत 'बेटर लेट दॅन नेव्हर' अशी म्हण आहे. त्यांतील उपदेशाप्रमाणें उशीरा कां होईना अगदीं स्वस्थ बसण्याऐवजीं कांहींतरी खटपटीस लागणें हें आपलें कर्तव्य नाहीं काय? असें जर आम्हीं आतांही न करूं तर, आमच्यांत माणु-सकी बिलकूल उरलेली नाहीं असें म्हणावें लागेल. ही खटपट मात्र आपली आपणच केली पाहिजे. सरकार ज्या कांहीं गोष्टी आर्थिक स्थिती सुधारणेच्या बाबतींत करील त्याचा फायदा आपल्यासही इतरांबरोबर मिळेलच. पण बाहेरच्या मदतीवर अवलंबून राहणें आत्मघातकीपणाचें होईल. कारण 'जो दुसऱ्यावरी विश्वासला, त्याचा कार्यभाग बुडाला। जो स्वयेंचि कष्टत गेला, तोचि भला ॥' हा रामदासांचा उपदेश नितांत सत्य आहे. 'लावी पक्षीण आणि तिचीं पिलें' या गोष्टींतील रहस्य आपण ध्यानांत घेऊन वागलें पाहिजे. आपला आपणच उद्धार करण्यास सरसावलें पाहिजे. 'उद्धरेदात्मनात्मानम्।'

हा गीतेचा उपदेश हृदयांत सांठवून कामास हात घातला पाहिजे. इतर जाती अगर सरकार आमच्या उद्धाराकरितां धांवून येतील ही इच्छा व्यर्थ होय. अथवा अशी इच्छा आम्हीं करणें मूर्खपणाचें होईल. कारण तुकोबा जसें 'देव मोक्षाचें गांठोडें घेऊन बसला नाहीं,' असें म्हणतात. तसेंच आमच्या आर्थिक मोक्षाचें गांठोडें कोणीही घेऊन बसलेलें नाहीं. हा आर्थिक मोक्ष आम्ही आमच्या मनगटाच्या जोरावर संपादन केला पाहिजे. तो कसा करावा याबाबत मागील दोन प्रकरणांत दिग्दर्शन केलें आहे. तथापि आजच्या ब्राह्मणांच्या विशिष्ट परिस्थितींत आमच्या अल्पमतीस पुढील एक रामबाण उपाय सुचतो. त्याचा विचार करावा अशी सर्व ब्राह्मण समाजास नम्र विनंती आहे.

**ब्राह्मणांनीं राजकारणाचा तूर्त संन्यास घ्यावा**—इंग्रजी अंमलाच्या झगझगाटानें कांहीं काल आम्हां सर्व हिंदवासियांची दृष्टि दिपून गेली होती; पण डोळ्यास जरा त्याची संवय होतांच, गुणांबरोबर या अमलाचे दोषही आम्हांस दिसूं लागले. या दोषांचें आविष्करण आजपर्यंत मोठ्या धैर्यानें हालअपेष्टा भोगून प्रसंगविशेषीं सरकारच्या रोषास बळी पडून, ब्राह्मण करीत आले आहेत; ही गोष्ट कोणासही नाकबूल करतां यावयाची नाहीं. स्वराज्याचा अरुण जो कांहीं आज आम्हांस दिसत आहे त्याचें बरेंचसें श्रेय निदान महाराष्ट्रापुरता विचार केल्यास, न्यायमूर्ती रानडे, सार्वजनिक काका जोशी, विष्णुशास्त्री चिपळूणकर, अण्णासाहेब पटवर्धन, आंकडेपंडित रा. ब. जोशी, प्रि. आगरकर लोकमान्य टिळक, नामदार गोखले, दे. भ. शिवराम महादेव परांजपे, न. चिं. केळकर, खाडिलकर, भोपटकर बंधू, दादासाहेब करंदीकर, रा. ब. काळे, रा. ब. चितळे, सेनापति बापट, बॅ. सावरकर, गंगाधरराव देशपांडे, श्रीनिवासराव कौजलगी, याळगी, ना. जोग, तसेच वऱ्हाड नागपूरकडील लोकनायक अणे, डॉ. मुंजे, बॅ. अभ्यंकर, दादासाहेब खापर्डे, सर मोरोपंत जोशी, नामदार तांबे, महाराष्ट्रकर्ते ओगले, अच्युत बळवंत कोल्हटकर, वगैरे ब्राह्मणांच्या चळवळीसच द्यावें लागेल. तसेंच गेल्या सत्याग्रहाच्या चळवळींत महाराष्ट्रापुरता विचार केल्यास शेंकडा नव्वद

सत्याग्रही ज. स. करंदीकर, से. सवाई महात्मा बापट, गाडगीळ, लिमये, गोसावी, पटवर्धन, देव, लागू, पळसुले, आठले वगैरे ब्राह्मण असून निरनिराळ्या तुरुंगांतून शिक्षा भोगत होते; ही गोष्ट कौन्सिलच्या प्रश्नोत्तरांतून बाहेर आल्याचें वाचकांना स्मरत असेलच. उद्यां प्रांतिक स्वायत्ततेचें उदक श्वेतपत्रिकेंतून सुटणारच आहे. सर्वत्र जंगल माजलें असतां, सार्वजनिक काका जोशी, न्यायमूर्ती रानडे, लो. टिळक, नामदार गोखले वगैरे ब्राह्मणप्रभृतींनीं आपलें रक्त आटवून किंबहुना सर्वस्व अर्पण करून, सॅपर्स मायनर्स पलटणीप्रमाणें स्वराज्याची पाऊलवाट प्रथम पाडली. आणि प्रांतिक स्वायत्ततेपर्यंत तिचाच आतां राजरस्ता झाला आहे. ही कामगिरी आपल्याच जातीची उन्नति व्हावी म्हणून त्यांनीं केलेली नाहीं. लोकसंख्येंत फक्त शेंकडा ५ च ब्राह्मण आहेत. तेव्हां संख्येच्या मानानें झालेली कामगिरी बहुमोल असून निःसंशय अभिमानास्पद आहे. भावी इतिहासांत केव्हांही ती चिरकाल नमूद होऊन राहील. तेव्हां कांहीं काल ब्राह्मणांनीं राजकारणापुरती विश्रांती घेणें न्याय्य होईल. किंबहुना त्यांना हा हक्क प्राप्त झाला आहे. दुसरें असें कीं, आतां इतर जातींतील बरेच लोक सुशिक्षित झाले आहेत. कौन्सिलांतून असेंब्लींतून ते काम बऱ्या प्रकारें करीत आहेत. शिवाय आतां बहुसंख्यांक जातीचे पुढारी कौन्सिलांतून दिवाणांच्या जागीं निवडून येतील. प्रांतिक स्वायत्तता सुरू झाल्यावर बरीचशी राजकीय सत्ता दिवाणांच्या हातीं येणार असल्यानें, बाहेरच्या चळवळीस फारसा वाव राहणार नाहीं. यापुढें दिवसेंदिवस ब्राह्मण या अल्पसंख्यांक जातीची भूमिका राजकारणांत सल्लागार स्वरूपाचीच राहणार. साताऱ्याच्या भाऊसाहेब सोमणांसारखा एखादा ब्राह्मण, बहुसंख्याकांच्या मदतीनें निवडून आल्यास तो अपवाद होय, नियम नव्हे. शिवाय लोकमान्य टिळक आपल्या ' स्वराज्य, ब्राह्मण–ब्राह्मणेतर ' या लेखांत म्हणतात कीं, " कायदेकौन्सिलांत एकही ब्राह्मण न आला तरी चालेल. आमचे इतर जातवाले आम्हां ब्राह्मणांच्या हक्कांचें रक्षण करतील, अशी आमची पक्की खात्री आहे. नावेवर गाडा, गाड्यावर नाव अशी जग रहाटीच आहे, ब्राह्मणेतर सर्व जातींनीं संतुष्ट राहावें म्हणजे झालें. " वरील उपदेशाप्रमाणें आम्हीं वागलों तर आमच्या हक्कांस कांहीं बाध येणार

नाहीं. तेव्हां कसाही विचार केल्यास राजकारण ब्राह्मणांनीं तूर्त सोडावें व आपल्या घराची व्यवस्था नीट लावावी हें उचित दिसतें.

' चॅरिटी बिगिन्स ॲट होम ' अशी इंग्रजींत म्हण आहे. तिच्यावर भाष्य तात्यासाहेब केळकर आपल्या " तरुण हिंदु नागरिकांत " पुढीलप्रमाणें करतात " आपणांस जी कांहीं धर्मबुद्धी आहे; जें काय दाक्षिण्य असेल त्याचा फायदा प्रथम आपल्या घराला नंतर क्रमानें आपल्या घराण्याला, देशाला व जगाला व्हावा. " म्हणजे ब्राह्मणसमाजरूपी आपलें घर व घराणें यांना आपल्या धर्मबुद्धीचा व दाक्षिण्याचा फायदा देणें हें ब्राह्मणांचें आद्य कर्तव्य होत नाहीं काय ? आजवर राजकारणांत भाग घेत असतां आपल्या समाजांतील कर्त्या पुरुषांनीं ब्राह्मण समाजरूपी घराचा व घराण्यांचा फायदा पाहिलेला नाहीं हें खास; आणि त्यांच्या या निष्काम कर्माबद्दल अभिमान बाळगला पाहिजे; पण हें त्यांचें निष्काम कर्म इतर जातींना किती रुजू व मान्य आहे, हा प्रश्नच आहे. हल्लीं ब्राह्मण समाजाची योग्यता सर्वत्र कमी होत आहे. इतर जातींतील लोक आज बरेच सुशिक्षित झालेले आहेत व त्यांना खरी स्थिति कळली आहे. तथापि या इतर जातींना अजूनही ब्राह्मणांनींच आपला सत्यानाश केला असें वाटतें. खरी वस्तुस्थिति मात्र याच्या अगदीं उलट आहे. प्रि० गोळे याबाबत लिहितात तें सोळा आणे खरें आहे. ते म्हणतात कीं " आपणां स्वतःस ब्राह्मणांनीं धर्मपाशांनीं विलक्षणपणें बांधून घेतलें, तसें त्यांनीं शूद्रांस बांधलें नाहीं. स्त्रियांस व शूद्रांस जेवढें विद्येचें व धर्माचें ज्ञान द्यावें म्हणून त्यांनीं ठरविलें तेवढेंच बाह्मणांच्या विद्येंत व धर्मांत महत्त्वाचें होतें, व व्यवहारांत उपयोगीं पडणारें होतें. भिक्षुकी व उपाध्येपणा हेच दोन धंदे ब्राह्मणांनीं आपल्याकडे ठेविले. त्याचा परिणाम असा झाला कीं, ब्राह्मणांचे अनेक उद्योगधंद्याचे मार्ग बुडाले व आत्मावलंबन नाहींसें होऊन उत्तरोत्तर दारिद्र्यदशाच त्यांस येत गेली. या स्थितींतून बाहेर पडण्याचा मार्ग अद्याप ब्राह्मणांस सांपडत नाहीं. शूद्र व इतर जातीची मंडळी चांगल्या मिळकतीचे उदीम व्यापार, शेती हे धंदे टाकून, क्षुद्र

मिळकतीचे भिक्षुकी उपाध्येपणाचे धंदे, धार्मिक आडकाठी नसती तरी पतकरते ना. ब्राह्मणांनीं आपणांस श्रेष्ठ समजून जे जे हक्क बळकावले ते ते सर्व त्यांच्या हानीसच कारण झालेले दिसतात. ब्राह्मणेतरांना जें जें करण्याची त्यांनीं बंदी केली तें तें त्यांचीं शरीरें सदृढ राखण्यास, उद्योगाची हौस कायम ठेवण्यास, अवलोकन शक्ति व आचाराचें स्वातंत्र्य राखण्यास कारण झालें". अशी स्थिती असूनही अद्यापि कांहीं सुशिक्षित ब्राह्मणेतर गृहस्थ ब्राह्मणांच्या स्वार्थानें आपला नाश झाला असा आक्षेप घेतात, ही फार दुःखाची गोष्ट आहे. नुकतीच अमेरिकेंत सर्व-धर्म-परिषद बडोद्याचे नरेश श्रीमंत सयाजीराव गायकवाड यांच्या अध्यक्षतेखालीं भरली होती. तींत श्रीमंत सयाजीरावांनीं ब्राह्मणांवर वरील स्वरूपाचा स्वार्थाचा आरोप केला, हें वाचकांनीं मॉडर्न रिव्ह्यूच्या (१९३४ च्या) जुलैच्या अंकांत वाचलें असेलच. यावरून अद्याप ब्राह्मणाबद्दलची अढी ब्राह्मणेतरांत कायम दिसते. ब्राह्मणांनीं केलेली चळवळ इतर जातींना हानिकारक लुडबुड वाटते. अशा स्थितींत ब्राह्मणांनीं लुडबुडत राहणें हें त्यांच्या स्वाभिमानास साजेसें आहे काय? 'नापृष्टः कस्यचिद् ब्रूयान्न चान्यायेन पृच्छतः ।' असें मनु सांगतो. तेव्हां ब्राह्मणांच्या सल्ल्याची व चळवळीची मदत इतर जातींना आज नको आहे. चोमडेपणानें लतकोडग्यासारखी आपण ती करीत राहणें योग्य होणार नाहीं व अशा स्थितींत अशी मदत कां करावी हें समजत नाहीं. सबब ब्राह्मणांनीं राजकारणाचा संन्यास घ्यावा; तूर्त तरी घ्यावा असें आमचें म्हणणें आहे. हें लिहिणें राजकारणाकडे स्वभावतःच ओढा असणाऱ्या बऱ्याच ब्राह्मणांना आवडणार नाहीं हें आम्हीं जाणून आहों. तथापि अधिकार नसतांही, एक प्रकारें लहान तोंडीं मोठा घास असेंही असलें तरी जें वाटतें तें लिहिलें. त्याबद्दल क्षमा असावी. शिवाय प्रश्न असा कीं, आज ब्राह्मण जात राजकारण करण्यास समर्थ आहे काय? हा 'धकाधकीचा मामला आहे.' अशक्ताला यांत वाव नाहीं. राजकारणी महत्त्वाकांक्षा सफल होण्यास प्रथम दीर्घोद्योग नंतर द्रव्यादि साधनें व सुविचार उपयोगीं पडतात. यांपैकीं हल्लीं पहिलीं दोन साधनें म्हणजे दीर्घोद्योग व द्रव्य हीं फारच थोड्या ब्राह्मणांना अनुकूल आहेत.

आमची आजची स्थिति सर्व बाजूंनीं पूर्णपणें खालावलेली आहे. प्रि. गोळे म्हणतात तसे विद्वान् ब्राह्मणांची उंची दर १० वर्षांस दोन इंच याप्रमाणें कमी होत आहे. स्त्रियांमध्येंही असाच किंवा याहूनही अधिक ऱ्हास सुरूं आहे. शरीरसामर्थ्य तृतीयांशानें तरी आमच्यांत कमी झालें आहे. मिशांना लावावयाला तूप घरांत नाहीं ' इतके श्रीमंत ' आज आम्ही आहोंत. स्वतःच बुडावयाला लागलेला हा समाज इतरांना वर काय काढणार? तेव्हां निदान सर्वच ब्राह्मणांनीं राजकारणाकडे वळण्याची सोय नाहीं. कारण बहुतेक लोकांचें बुद्धिसामर्थ्य माफक असतें. यामुळें त्याचा व्यय फार जपून केला पाहिजे. सर्वगामी प्रखर बुद्धिमत्तेचे न्यायमूर्ति रानडे अगर लो० टिळकांसारखे जे ब्राह्मण असतील त्यांनाच समाजकारण व राजकारण हीं दोन्हीं करतां येतील. अशाच ब्राह्मणांनीं फार झालें तर राजकारण चालूं ठेवावें. इतरांनीं त्याचा संन्यास घेणें श्रेयस्कर आहे. आजच्या मितीस ब्राह्मणांचें आद्य कर्तव्य म्हणजे स्वसंरक्षण होय. या कर्तव्यास थोडे दिवसही पराङ्मुख झाल्यास ब्राह्मण जातीचा नाश झाल्यावांचून राहणार नाहीं. इतर जाती बहुसंख्यांक असोत, अगर लघुसंख्यांक असोत, आपलें संघटन गेलीं १०-२० वर्षें करीत आहेत. मराठ्यांची मराठा मंडळें महाराष्ट्रभर पसरलेलीं आहेत. शिंप्यांचा नामदेव समाज, न्हाव्यांचा सेना न्हावी समाज, माळ्यांचा सांवता माळी समाज, लिंगायत समाज असे नाना जातींचे समाज व मंडळें ज्या त्या जातींचें रक्षण, शिक्षण व भरण करीत आहेत. आम्ही दीड शहाणे स्वतःला पुढारलेले समजणारे या बाबतींत पूर्णपणें मागसलेले आहोंत. जीवनकलह तीव्र होत आहे. आणि " सरव्हायव्हल ऑफ दि फिटेस्ट " या न्यायानें सगळ्यांत लायख तीच जात जगणार. तेव्हां आम्ही आमची सर्व बाजूंनीं योग्यता वाढविणेच्या खटपटीस आतां लागलेंच पाहिजे. रामदास म्हणतात कीं—

नसे आंथराया नसे पांघराया ।
नसे धाम ना दृढ छाया निजाया ॥
नसे अन्न खाया नसे रम्य जाया ।
वृथा शीण संसार कर्ता रडाया ॥ १ ॥

अशी आमची स्थिति आज आहे. तेव्हां आम्ही इतरांचा उद्धार काय करणार ? " घरींचीं माणसें राजी । राखावीं तीं परोपरी " हेंच आमचें आज कर्तव्य आहे. तथापि सर्व ब्राह्मण जात नष्ट झाली तरी बेहत्तर! आपण राजकारण सोडणार नाहीं असें जे ब्राह्मण म्हणत असतील, त्यांनीं पुढील गोष्टींचा विचार करावा.

हिंदुस्थानांतील सगळ्या प्रांतांत महाराष्ट्र हा कंगाल प्रांत आहे. येथें गुजराथ, बंगालसारखी सुपीक जमीन नाहीं. उद्योग धंदे, व्यापार हा परप्रांतियांच्या हातांत फारा दिवसांपासून गेलेला आहे. आणि विलिंग्डन कॉलेजचे विद्वान् प्रिन्सिपॉल लिमये यांच्या शब्दांत सांगावयाचें म्हणजे " महाराष्ट्रांत काळजाला घरें पाडणारी जर एखादी गोष्ट असेल तर ती ही कीं, महाराष्ट्रांत आणि महाराष्ट्रियांत इंडस्ट्रिअल लीडरशिप् नाहीं कर्नाटकांत दिसून येणारें समाधानही नाहीं. आपण अद्याप व्यापाराकडे लक्ष दिलेलें नाहीं. पण महाराष्ट्रियांच्या प्रगतीकरितां आतां तरी निदान आपणांस लक्ष द्यावेंच लागेल व इंडस्ट्रिअल लीडरशिप् वाढवावी लागेल. आपण जर इकडे लक्ष दिलें नाहीं तर आपलें **आर्थिक मरण** मला माझ्या डोळ्यापुढें दिसत आहे. आपलें घर दुसऱ्याच्या हातांत जाऊन महाराष्ट्रीय आर्थिक दृष्ट्यासुद्धां, **पूर्ण गुलाम** झाल्याशिवाय राहणार नाहीं. यांतून सुटण्याकरितां महाराष्ट्रानें संघटनात्मक कार्य करणें जरूर आहे. " तेव्हां आमच्यांतील ज्यांना राजकारणाचें व्यसन लागलें आहे त्यांनीं वरील गोष्टींचा विचार केल्यास, त्यांचें बुद्धिवैभव, राजकारणपटुत्व व डावपेंच दाखविण्यास, वरील गुलामगिरी नष्ट करण्याचें क्षेत्र, त्यांना पुरेसें नाहीं काय ? तात्पर्य कांहीं वर्षें तरी ब्राह्मणांनीं राजकारणांतून आपलें आंग काढून घ्यावें व त्याचा संन्यास घ्यावा.

परिस्थितीचा पेंचच इतका बिकट आहे कीं, ब्राह्मणांच्या मनांत असो अगर नसो त्यांना आतां व्यापारांत, उद्योगधंद्यांत पडल्याशिवाय गत्यंतर नाहीं. आम्हां ब्राह्मणांपुढें '**जगणार कीं मरणार**' हा एकच प्रश्न आतां उभा आहे. जगावयाचें असेल तर व्यापारांत शिरलें पाहिजे. पण त्यांत परप्रांतियांनीं आपलें बस्तान फार दिवस बसविलें असल्यानें

आमचा त्यांत शिरकाव होणें कठीण झालें आहे. ही कोंडी कशी फोडावी हा बिकट प्रश्न आहे. आम्हांस व्यापाराचें ज्ञान नाहीं. तें घेण्याचें शहाणपण आजवर आम्हीं दाखविलेलें नाहीं. तेव्हां व्यापार-धंद्यास काय गुण लागतात व ते आमच्यांत कितपत आहेत याची छाननी करणें जरूर आहे. तसेंच आमच्यांत कांहीं दोष असल्यास ते काढून टाकण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

पहिली गोष्ट आम्हांस शरीरसामर्थ्याचें महत्त्व बिलकूल कळेनासें झालें आहे. शारीरिक ऱ्हासामुळें दीर्घोद्योग व अंगमेहनत आमच्याकडून होत नाहीं. "जशास तसें व दोन हात वर" अशी वागण्याची धमक आमच्यांत नाहीं. शरीर दुर्बळ झाल्यामुळें मानसिक श्रम, उदात्त मनोवृत्ति, प्रबल महत्त्वाकांक्षा व दृढनिश्चय या गुणांचा आमच्यांतून लोप झाला आहे. उंच बांधा, धिप्पाड व पिळदार शरीर, उमदा चेहरा, बुद्धिमत्तादर्शक व निग्रहदर्शक मुद्रा अशा साधनांनीं युक्त असलेलीं माणसें आपली छाप दुसऱ्यावर बसवूं शकतात, असें रावसाहेब चांफेकर लिहितात तें अगदीं खरें आहे. तेव्हां

सिद्धं ह्येतद्वाचि वीर्यं द्विजानां । बाह्वोवीर्यं यत्तु तत्क्षत्रियाणाम् ॥

हें वचन उराशीं न बाळगितां 'शरीरमाद्यं खलु धर्मसाधनम्' हें वचन मनावर बिंबवून ब्राह्मणांनीं अगोदर **शरीरसामर्थ्य** मिळवावें. तसेंच आपल्यामध्यें शिस्तीचा फार अभाव असतो. किंबहुना शिस्तीचें महत्त्वच आम्हां सुशिक्षितांस अद्याप कळत नाहीं, असें म्हणावें लागतें. कोणाच्या हुकमतींत राहावेंसें वाटत नाहीं. जो तो आपल्यासच नाना फडणवीस समजून स्वयंभू पुढारी बनतो. वाण काय ती अनुयायांची असते! खरें पाहूं गेलें तर शिस्तीशिवाय जगांत कांहींही साध्य होत नाहीं. शिस्तीविरहित असलेला समाज योग्य नलिकामार्गें न सोडलेल्या वाफेसारखा असतो; आणि अशा वाफेनें जसे स्फोट होतात तसेच गैरशिस्तीनें समाजांत

होतात. शिस्त ही इंजिनमधील वाफेसारखी जोरदार असते. थोडे कवाईती शिस्तीचे लोक, प्रचंड पण बेशिस्त लोकसमुदायाला सहज जिंकू शकतात हें इतिहासच सांगतो. तरुणांना असें वाटण्याचा संभव आहे कीं शिस्त आली कीं, आपलें इतकें प्रिय असलेलें स्वातंत्र्य गेलेंच. पण ही त्यांची चुकीची कल्पना आहे. ज्या इंग्लंड देशांत स्वातंत्र्याची इतकी महती आहे तेथील राजे व आपले बादशहा पंचम जॉर्ज हे लहानपणीं शिस्त शिकण्याकरितां जहाजावर साध्या खलाशाप्रमाणें राहिले होते. एकदां त्यांचे वडील एडवर्ड बादशहा त्यांना भेटण्याचे उद्देशानें जहाजावर गेले. तेव्हां आपल्या कप्तानाची परवानगी न घेतां वडिलांना भेटण्यास जॉर्ज धांवले; परंतु एडवर्ड बादशहांनीं त्यांची भेट न घेतां त्यांना परत पाठवून दिलें आणि कप्तानाची परवानगी घेऊन येण्यास सांगितलें. भावी बादशाहा म्हणून जॉर्ज यांना शिस्तीचा भंग त्यांनीं करूं दिला नाहीं. यांतच इंग्रजांच्या यशाचें रहस्य आहे; आणि म्हणूनच ते आमचे राज्यकर्ते आहेत. असो. सबब ब्राह्मणांनीं शिस्त बाळगिली पाहिजे. एकदां आपण नायक निवडला कीं त्याचे हुकूम चुकीचे वाटले तरी पाळलेच पाहिजेत. आत्मसंयमन, आज्ञाधारकपणा आणि शिस्त या त्रयीवरच कोणत्याही समाजाचें यश अवलंबून असतें हें आम्हांस उमगेल तो सुदिन! डॉ० थिओडोर यांचा ' यंग मेन ऑफ इंडिया 'मध्यें प्रसिद्ध झालेला लेख अवश्य वाचावा. ते म्हणतात कीं " रोजचीं नित्यकर्में, ' रुटीनकामें ' हीं फार उपकारक आहेत. नित्यकर्मानें आयुष्यास स्थिरता येऊन मानसिक शांति लाभते. तरुणांत असा समज रूढ असतो की नवीन अनुभव मिळवितांना बंधनें तोडून टाकलींच पाहिजेत. परंतु बेशिस्त आयुष्यक्रम हा मूर्खपणाचा व निरुपयोगी असतो. बेकारीचा विचार करितांना कामास अपात्र असलेल्यांचा विचार आपण करीत नाहीं. आज पुष्कळ कचेऱ्यांतून व संस्थांतून अक्षमता " इनएफीशिअन्सी " दिसून येते. तिचें कारण बेशिस्त जीवन होय. आज जीं कांहीं राष्ट्रें मोठीं दिसतात त्यांच्या मोठेपणाचें रहस्य त्यांतील नागरिकांच्या जीवनांतील शिस्त हेंच आहे." वरील उताऱ्यावरून आपल्या आंगीं शिस्त किती बाणली पाहिजे, हें दिसून येईल. हिटलर,

मुसोलिनी* हे शिस्तीस महत्त्व फार देतात. देशाची सर्वांगीण उन्नति होण्याकरितां अनुयायांत शिस्त पूर्णपणें बाणली पाहिजे असें त्यांचें मत आहे आणि ती बाणविण्याची आटोकाट खटपट ते करित असतात. ब्राह्मणांची स्नान संध्या वगैरे नित्यकर्मे या दृष्टीनेंच उपकारक ठरतात. आमच्यांत दुहीही फार आहे. ती घालविली पाहिजे. चार ब्राह्मण एके जागीं काम करूं शकत नाहींत असा आरोप आमच्यावर केला जातो. त्यांत सत्य बरेंच आहे. तेव्हां हाही दुर्गुण टाकला पाहिजे. लो० टिळकांच्या मतें आमच्यांत दीर्घ प्रयत्न, रगेलपणा व आत्मसन्मान हे गुण नाहींत. ते संपादन केले पाहिजेत. दुही, मत्सर, आळस, परोत्कर्षासहिष्णुता हे दुर्गुण काढून टाकून आत्मसन्मान (सेल्फ रीस्पेक्ट), दीर्घ प्रयत्न, उदात्त मनोवृत्ति, प्रबळ महत्त्वाकांक्षा, दृढनिश्चय, सत्यप्रियता, प्रामाणिकपणा, शील व चालू परिस्थितीबद्दल दैवी असंतोष (डिव्हाइन् डिस्कंटेंट) हे गुण आमच्यांत आणण्यास झटलें पाहिजे. त्याजबरोबर शरीरसंपदा, शिस्त, आत्मसंयमन व आज्ञाधारकपणा यांची जोपासना केली पाहिजे. फाजील व्यक्ति-महात्म्य व स्तोम न माजवितां तत्त्वांचें परिपालन करण्यास आम्हीं शिकलें पाहिजे.

आतां वरील गुणांशिवाय वैश्य वृत्तीस कोणते गुण लागतात हें पाहूंया. आत्मविश्वास, परस्पर सहाय्य, सचोटी व पद्धतशीरपणा हे गुण व्यापारास आवश्यक आहेत असें अर्थशास्त्रज्ञ प्रो. वा. गो. काळे सांगतात. ते आम्हीं संपादन केले पाहिजेत. तसेंच प्रि. धनंजयराव

---

* "Discipline! I am for the most rigid discipline. We must impose upon ourselves the most iron discipline. It is only through National discipline that Italy will be able to gain a hearing in the Assembly of Nations. Discipline must be accepted. If not done so, it should be imposed. It is only by obeying, only by having the humble but sacred pride of obeying, that one conquers the Right to Command."

—BENITO MUSSOLINI

*From— Mussolini and the Cult of Italian Youth.*

गाडगीळ यांनीं दिग्दर्शन केल्याप्रमाणें आपण " बिझिनेस सेन्स " व्यापारी वृत्ति—धारण करून, चिकाटी, व्यापारी सचोटी, हिशेबीपणा व नफातोटयाकडे सतत लक्ष हे गुजराथी, पारशी व्यापाऱ्यांमध्यें दिसून येणारे गुण, आपण आत्मसात् केले पाहिजेत. प्रि. गाडगीळ यांच्या मतें आपण गैरहिशेबी आहोंत. तसेंच आपली दृष्टी व्यापक नसून आलेल्या संधीचा फायदा आपण घेत नाहीं. हे दोष टाळले पाहिजेत. जपानी लोकांना या कामीं आपण गुरु केलें पाहिजे. प्रिन्स जॉर्ज यांचे ग्रीसच्या राजकन्येशीं लग्न ठरल्याची बातमी बाहेर पडतांच जपानी व्यापाऱ्यांनीं सगळयांत अगोदर लग्नसमारंभाकरितां बंटिंग्ज वगैरे शोभेचा माल तयार केल्याचें वाचकांनीं नुकतेंच वाचलें असेल. अशी संधी साधण्यास आम्हीं शिकलें पाहिजे. भांडवल व संघटन यांचीही आपल्यास फार जरूरी आहे. आद्यापेक्षां खर्च कमी करण्याची आम्हां ब्राह्मणांस संवयच नाहीं. त्यामुळें भांडवल सांठत नाहीं. तसेंच हिशेब ठेवणें आपण कमीपणाचें समजतों.* पण प्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ प्रो० मार्शल 'हिशोब हा जीवनाचा पाया आहे' असें म्हणतात. हें तत्त्व उराशीं बाळगणें जरूर आहे. संघटन करणारे उद्योगधंद्याचे कप्तान आपल्यांत तयार होतील अशी व्यवस्था होणें जरूर आहे. " उत्तम संघटित आरंभ ही यशाची गुरुकिल्ली असून व्यापारांत अव्यवस्थितपणा म्हणजे मरण होय,"

---

* सुप्रसिद्ध व अतिहुशार म्हणून नाणावलेले आय्. सी. एस. गव्हर्नर सर मालकम हेले यांनीं 'काल्व्हीन तालुकदार' कॉलेजच्या विद्यार्थ्यांना नुकताच पुढीलप्रमाणें उपदेश केला; तोही ब्राह्मणांनीं ध्यानांत ठेवावा:—

"Keep straight and above board with other boys. Begin from now *to keep a proper account of your private expenditure*; that will help you afterwards to make the best use of your money. Keep out of Debts and prevent others from robbing you. Learn how to treat servants properly etc."

—**Sir Malcolm Haily**

(Retiring Governor of U. P.)

असें प्रि. सबर्नास म्हणतात तें अगदीं खरें आहे. तयार मालाची विक्री " डिस्ट्रिब्यूशन " याकडेही दुर्लक्ष होऊं देतां कामा नये. आपण सर्व ब्राह्मण स्वभावानें फार तुसडे असतों. व्यापारांत हा मोठा दुर्गुण आहे. आपल्यांतील हा दुर्गुण मुंबईच्या दक्षिणी ब्राह्मणांच्या व गुजराथ्यांच्या खाणावळींत गेल्यास फार चटकन ध्यानांत येतो. गुजराथी खाणावळींत जेवणारानें जिन्नस वाटेल तितके वेळां मागितला, तरी गुजराथी वाढपी त्रासत नाहीं व पाहिजे तितके वेळां आनंदानें आणून घालतो. शिवाय एक इसम पंक्तीवर नजर ठेवून वाढप्याकडून सारखे जिन्नस वाढण्याकरितां आणवीत असतो. ' आवे, शाखभाजी आवे, ' असा घोष त्याचा सारखा चाललेला असतो. उलट दक्षिणी खाणावळींत भाजीसारखा क्षुल्लक पदार्थ मागितल्यास जेवणाऱ्यास मिळण्याची पंचाईत पडते. यदाकदाचित मिळाल्यास वाढप्या ' आतांच घातला नव्हता काय ' असें गुरगुरत वाढतो. या आमच्या गुणांनेंच पुष्कळ विद्यार्थी, मुशाफर व प्रवासी, गुजराथी जेवण आवडलें नाहीं तरी, गुजराथ्यांच्याच खानावळी अधिक पसंत करतात. कारण तेथें बरदास्त " सर्व्हिस " चांगली मिळते. हा दोघांच्या वागण्यामधील फरक कापडाच्या व इतर दुकानांतूनहि दिसून येतो. तरी ह्या गुजराथ्यांचा सद्गुण आपण उचलला पाहिजे. केसरीचे सहसंपादक रा. रा. दा. वि. गोखले यांनीं, एका ब्राह्मण डायरेक्टरानें दुसऱ्या ब्राह्मण डायरेक्टरास तुसडेपणानें, अधिक प्रश्न विचारल्यास खिडकींतून फेकून देईन, असें बोलल्याची गोष्ट परवांच एका मुलाखतींत सांगितली. इतके तुसडे आम्ही आहोंत; तरी हा दुर्गुण टाकला पाहिजे. आतां आम्ही व्यापार व उद्योगधंद्यांत पडलेंच पाहिजे. किंबहुना सुशिक्षित म्हणविणाऱ्या ब्राह्मणांचें आज तें कर्तव्यच आहे. कारण धर्मराजांनीं " देश वैतागला, सुशिक्षित वर्गाची कुचंबणा झाली, आपसांतील दुही वाढून, देशांतील उपजीविकेचीं साधनें उचल्यांच्या हातीं गेलीं तर सुशिक्षित वर्गानें आपला बचाव कसा करावा व अशा प्रसंगीं सुशिक्षितांचें आद्य कर्तव्य कोणतें ? " असा सूचक प्रश्न भीष्माचार्यांना केला होता. त्यावर भीष्मांनीं जें उत्तर दिलें तें आम्हीं हृदयावर कोरून ठेविलें पाहिजे. भीष्म म्हणाले ' विज्ञानबलमास्थाय जीवितव्यं

भवेत्तदा।' म्हणजे असल्या भयंकर वेळीं शहाण्या माणसांनीं विज्ञान-शास्त्राची कास धरली पाहिजे. व्यापारधंदा केला पाहिजे. याबाबत भिडे शास्त्री यांनीं सुंदर विवेचन किर्लोस्कर मासिकामध्यें केलें आहे, तें वाचकांनीं अवश्य वाचावें. तेव्हां कसाही विचार केल्यास आजच्या घटकेस ब्राह्मणांनीं उद्योगधंदा केला पाहिजे; इतर सर्व गोष्टी सोडून केला पाहिजे; इतकी गोष्ट सिद्ध होते. इतकें एकदां ठरल्यावर नाना उद्योगधंद्यापैकीं ब्राह्मणांनीं कोणता उद्योगधंदा पसंत करावा हा प्रश्न क्रमप्राप्तच उद्भवतो. ब्राह्मणांची राहणी, आचार, विचार, धार्मिक व नैतिक कल्पना व संस्कृति यांना शक्य तितका अनुरूप धंदा असल्यास बरें हें सांगणें नकोच. खाटकाचा, मच्छीमारीचा अगर कातडी कमावण्याचा धंदा आपल्याला आवडणार नाहीं. तसेंच उन्हातान्हांत काम करण्याची निदान आजच्या पिढींतील ब्राह्मणांना संवय नाहीं. तेव्हां शेतकीचा उद्योगही आपल्या हातून होणार नाहीं. 'बॅक टु लँड—शेतीकडे परता, जमिनीकडे वळा—' असा घोष आपल्या कानांवर अलीकडे नेहमीं आढळतो. तथापि आजच्या शेतींत शेतकऱ्यास कांहीं उरत नाहीं ही गोष्ट खास. शिवाय शेतकऱ्यांची गरीबी कमालची असून त्यांना फुरसत अगर विश्रांती बिलकूल मिळत नाहीं असें प्रो० वॉटसन् यांनीं नुकतेंच ब्रिटिश असोसिएशनपुढें सांगितलें हें ध्यानांत ठेवण्यासारखें आहे. तेव्हां तूर्त तरी ब्राह्मणांनीं शेतींत शिरून गर्दी करूं नये व त्यांत असलेल्या शेतकऱ्यांच्या हलाखींत भर टाकूं नये. ज्या धंद्यानें ब्राह्मण शीलभ्रष्ट होतील, असे धंदे न केलेले बरे. बेकारी-मुळें कोणी करत असल्यास तेंही गौणच. आजकाल ब्राह्मण तरुण व विशेषत: तरुणी सिनेमाच्या धंद्यांत पडलेल्या दिसतात. त्यांत त्यांचें शील कितपत धड राहतें याबद्दल जबरदस्त शंका वाटते. तसेंच कांहीं ब्राह्मण अश्लील वाङ्मयाचें लेखन व प्रकाशनही करीत असल्याचें आढळून येतें. तेव्हां वरील धंदे टाळल्यास बरें. 'ब्राह्मण आणि त्यांची विद्या'-यावर टीकात्मक लिहिलेल्या लेखांत लो० टिळकांनीं, ब्राह्मणांनीं आपली दृष्टि इतर धंद्यांकडे वळविली पाहिजे ही गोष्ट कबूल करून, पुढील इषारा दिला; तो आपण लक्षांत ठेविला पाहिजे. ते म्हणतात कीं 'इतर

जातींचे धंदे ब्राह्मणांनीं करावयाचे ते असे केले पाहिजेत कीं, त्यामुळें इतर जातींचा थोडा फायदाच होईल; व खोखोच्या डावासारखें आम्हीं इतरांचे धंदे बळकावून संरक्षण केलें असा आरोप येणार नाहीं.' त्यावेळींच टिळकांनीं नोकरीवर ब्राह्मणांचा निर्वाह लागेल असें दिसत नसून इतर धंद्यांत ब्राह्मणांनीं प्रवेश केलाच पाहिजे असें बजावलें. हेंही वाचकांनीं ध्यानांत घ्यावें. तेव्हां इतरांचा धंदा बळकावला जाणार नाहीं, आणि दुसऱ्यांच्या तोंडचा घास काढून घेतला जाणार नाहीं, ही मर्यादा संभाळतांना, ज्या धंद्यांत ब्राह्मणांच्या बुद्धीस, कर्तबगारीस, व महत्त्वाकांक्षेस पूर्ण अवसर मिळेल, असाच धंदा आम्ही निवडला पाहिजे. नाहीं तर बुद्धि व कर्तबगारी क्षुद्र धंद्यांत व्यर्थ खर्च होईल; आणि असें करणें मूर्खपणाचें ठरेल. या दृष्टीनें विचार करतां विणकामाचा धंदा—कापडाच्या गिरणीचा धंदा—आमच्या अल्पमतीस ब्राह्मणांना सर्वस्वीं योग्य असा दिसतो. आमच्या मतें हा धंदा पत्करणें हाच ब्राह्मण बेकारीवर एकमेव व रामबाण असा उपाय आहे व हाच धंदा ब्राह्मणांनीं पसंत करावा, व पत्करावा अशी आमची त्यांस आग्रहाची विनंती आहे.

हाच धंदा पसंत कां करावा याबद्दल आमच्या मतें पुढील कारणें आहेत. एक तर हा धंदा सनातन आहे. फार प्राचीन काळापासून आमच्या येथें तो चालू असून, हिंदुस्थानाला वैभवशिखरावर बसविण्यास जर कोणता एक धंदा कारणीभूत झाला असेल तर हा विणकामाचाच होय. याच धंद्यामुळें हिंदुस्थानास सुवर्णभूमी हें नामाभिधान प्राप्त झालें होतें. येथून क्रोडो रुपयांचें कापड परदेशास रवाना होऊन त्या बदला सोनें हिंदुस्थानांत येत असे. म्हणूनच आमची ही भारतभूमी सुवर्णभूमी झाली होती; आणि तींत सोन्याचा धूर निघत होता. विणकामाचा हा धंदा आमचा सनातन कसा होता याचें वर्णन लो० टिळकांच्या शब्दांत पुढें देत आहों. " सूत काढण्याची व विणण्याची कला ही फार पुरातन कालापासून आमच्या देशांत प्रचलित आहे. किंबहुना पट आणि घट हे दोन धंदे वेदकालापासून चालत आले असल्यामुळें आमच्या लोकांत या दोन्ही कला अनादि किंवा वेदोक्त आहेत, असें म्हणण्यास हरकत

नाहीं. ब्राह्मणांचें यज्ञोपवीत किंवा जानवें हें हल्लीं जरी सूत झालें आहे तरी फार प्राचीन काळीं हें उपवीत म्हणजे विणलेलें वस्त्र होतें व तें ज्याचा तो विणीत असे अशाबद्दल वैदिक ग्रंथांत आधार सांपडतात. ऋग्वेदांतील मंत्रांत तंतू ( उभा धागा), ओत ( आडवा धागा ) आणि वयंती ( विणतात ) हीं पदें आलेलीं असून तीं वस्त्रासच लाविलेलीं आहेत. इतकेंच नव्हे तर दिवस आणि रात्र या दोन पांढऱ्या व काळ्या धाग्यांनीं, वर्षरूप वस्त्र कसें विणलें जातें, हें त्यांत सांगितलें आहे. महाभारतांत हेंच रूपक—

स्त्रियौ तंत्रे अधिरोप्य सुवेमे पटं वयंत्यौ तस्मिंस्तंत्रे कृष्णाः सिताश्च तंतवः।

अशा शब्दांनीं आदिपर्वांत सांगितलें आहे. यांतील तंत्र म्हणजे माग होय. उभे धागे मागांत ओढून धरून त्यांत हातानें आडवे धागे गुंतविणें यासच विणकाम म्हणतात. ही विद्या, इतर राष्ट्रें आंगास रंग लाऊन कातडीं पांघरीत होतीं त्या काळाच्या पूर्वीही हजारों वर्षें आर्य लोकांना माहितच होती. इतकेंच नव्हे तर त्यांच्यामध्यें पूर्ण दशेस आलेली होती; ती इतकी कीं हातानें विणलेल्या उत्तम मलमलीच्या तोडीचें कापड विलायतच्या यंत्रानें अद्यापही तयार होत नाहीं. विणकराचा धंदा किंवा घटाचा धंदा ( पॉटरी ) आमच्या लोकांत इतका सार्वत्रिक होता कीं, यज्ञासंबंधानें बोलावयाचें असो, वेदांतील प्रमेयें लोकांपुढें मांडावयाचीं असोत किंवा व्याकरण, न्याय शास्त्रांतील सिद्धांताचा उलगडा करावयाचा असो, कवींच्या, तत्त्वज्ञांच्या किंवा ऋषींच्या तोंडांत घटपटाचें उदाहरण सहजगत्या यावयाचेंच. कापसाच्या पिकांस देशांतील जमीन, हवा, पाणी सोइस्कर आणि विणण्याची कला अत्यंत ऊर्जितावस्थेस आलेली, त्यामुळें शंभर वर्षांपूर्वी हिंदुस्थानास, भूमंडळावर मँचेस्टरास आज जें महत्त्व आलें आहे तें आलेलें होतें व उंची मलमल आणि इतर कापड या देशांतून विलायतेस जात होतें. इतकेंच नव्हे तर कापडास पक्का रंग देण्याची युक्तिही हिंदुस्थानांतच

प्रथमतः निघून पूर्णावस्थेस आलेली होती. कॅलीको, टर्किरोड वगैरे इंग्रजी शब्दांचा पूर्व इतिहास ही साक्ष देत आहे व याहून आणखी बलवत्तर साक्ष पाहिजे असेल तर ती इंग्रजींतील 'वीव्ह' या शब्दाची होय. हा शब्द व्ये, वी, वय (मराठी विणणें) याचाच अपभ्रंश आहे व सर्व आर्य भाषेंत विणणें यास हाच शब्द लावला जातो. इतका प्राचीन व आमच्या देशांत इतका भरभराटीस व पूर्णतेस आलेला विणण्याचा धंदा शंभर वर्षांत सफाई बुडून जाऊन आम्ही अन्नान्न दशेस लागावें यापेक्षां कालचक्राचा दुसरा अगाध महिमा तो कोणता! दुर्दैवाची गोष्ट ही आहे कीं हें कालचक्र उलट फिरत असतां आम्हीं गाढ झोंप घेत पडलों होतों. ज्या हिंदुस्थानांत कापूस पिकतो व जेथें अनुवंशिक संस्कारानें कोष्टी लोक त्याचें उत्तम सूत काढून मलमलीसारखें कापड काढण्यांत तरबेज झालेले होते, त्या हिंदुस्थानास आपला कापूस विलायतेस पाठवून विलायतेस मँचेस्टर येथें तयार झालेलें कापड विकत घेण्याचा प्रसंग कसा व कोणी आणला व तो टाळण्याला काय उपाय करावे याच्या उहापोहांत आम्ही जितका काल घालवूं व जितके उद्योग करूं तितके थोडेच होत. कालचक्राची गति चालूच आहे. पण आपल्या हातून होईल तेवढा उद्योग करण्यास आपण प्रवृत्त झालें पाहिजे. विणकामाचा धंदा चालण्यास जर कोणता एखादा देश दुसऱ्या देशापेक्षां अधिक योग्य असेल तर तो हिंदुस्थान हा होय." लोकमान्यांनीं वर जे आपल्या जोरदार शब्दांत विणकामाच्या धंद्याचें महत्त्व व जरूरी वर्णन केली आहे त्यापेक्षां सरस वर्णन कोण करूं शकणार?

"गेल्याच शतकांत हिंदुस्थानांत उत्पन्न होणाऱ्या तलम, बारिक व खुमारीदार दुकूल वस्त्रांनीं व रमणीय चिटांनीं फ्रान्स व इंग्लंडदेशीय रंगेल चटकचांदण्या आपला नेपथ्यविधी अलंकृत करीत असत हें कोणास ठाऊक नाहीं?" असें लो. टिळक विचारतात, हें अगदीं खरें आहे. सतराव्या शतकांत इंग्लंडची राणी मेरी हिनें स्वतः हिंदुस्थानांत तयार झालेली कॅलिको व चिटें वापरण्याची फॅशन सुरूं केली होती. तेव्हां हिंदी विणकाम अत्युच्च दर्जाचें होत असे. सवाई माधवरावांनीं आंब्याच्या

64363
आ७१९३५

कोइंत मावणारा पटका डाक्याहून आणविल्याची गोष्ट प्रसिद्धच आहे. तसेंच इराणच्या वकीलानें आपल्या बादशहाकरितां साठ हात लांबीचें पागोटें नारळाच्या करटींतून दिल्लीहून पाठविल्याची गोष्ट तितकीच सुप्रसिद्ध आहे. एकदां बंगालच्या अल्लीवर्दीखान नांवाच्या नबाबानें, एका हिंदु विणकऱ्यास त्यानें गवतासारखें हुबेहूब दिसणारें कापड विणून त्यावर गाईस चरावयास लावून फसविल्याबद्दल, हद्दपार केल्याचें बंगालच्या इतिहासांत नमूद आहे. अत्यंत कडक, सोंवळा व रागीट, औरंगजेब बादशहा एकदां दरबारांत बसला असतां त्याच्या मुली, शाहाजाद्या, अत्यंत तलम, झिरझिरीत, आंतून आंग दिसणारें वस्त्र नेसून दरबारांत आल्या. भर दरबारांत मुली इतकें झिरझिरीत, आंतून आंग दिसणारें वस्त्र नेसून आल्याबद्दल, बादशहास फार संताप आला व तो रागानें त्यांना बोलूं लागला. तेव्हां शाहाजाद्यांनीं उत्तर दिलें कीं आम्हीं एकच वस्त्र नेसलों नसून सात वस्त्रें परिधान केलीं आहेत. या आख्यायिकेचें तात्पर्य इतकेंच कीं आम्ही दोनशें वर्षांपूर्वीं इतकें तलम कापड तयार करीत होतों; आणि जनावरें फसतील इतकें बेमालून रंगवीत होतों. तेव्हां वीस वार लांब व एक वार रुंद अशा कापडाला शंभर ते चारशें रुपये पडत आणि हे विणण्यास दहा ते साठ दिवस लागत. वायु-वस्त्र, सुभनाम ( रात्रींचें दव ), साबाण ( कोळ्याच्या जाळ्यासारखें दिसणारें ), अबरवण ( वाहणारे पाणी ), फूलकारी, पालमपोरी अशीं अर्थसूचक नांवें कापडांचीं तेव्हां असत. डाका, कलकत्ता, सुरत, मच्छलीपट्टण, कालिकत, मद्रास या बंदरांतून त्यावेळचे पंचवीस कोटी शिक्का रुपये किमतीचें कापड परदेशाला रवाना होत असे आणि त्या कापडाची किंमत आजच्या रुपयांत पन्नास कोटी झाली असती. पण पुढें इंग्लंड व फ्रान्स वगैरे देशांतून इ० स० १७६४ चे सुमारास हार-ग्रीव्हीज, आर्कराईड यांनीं 'स्पिनिंग जेनी व रोलर स्पिनींग फ्रेम हीं विणण्याचीं यंत्रें शोधून काढलीं तेव्हांपासून आमच्या ह्या व्यापारास उतरती कळा लागली. कारण वरील देश कापड तयार करूं लागले; आणि इ० सन १८१४ सालीं 'हाराक्स' यानें वाफेचा माग तयार केला. तेव्हांच आमच्या कापडाच्या धंद्याच्या नरड्यास नख लागलें. तथापि



नगर वाचनालय, सातारा.

तेव्हां जरी निर्गत व्यापार कमी होत चालला होता, तरी देशांतले देशांत आमचें कापड खपत असे. पण ही स्थिति कंपनी सरकारच्या अनुदार धोरणानें फार दिवस टिकली नाहीं. विणकामाचा धंदा कसा व कोणीं बुडविला याचें उद्वेगजनक आख्यान वाचकांनीं मेजर बसु यांच्या "रुइन ऑफ इंडियन ट्रेड अँड इन्डस्ट्रीज" (हिंदीव्यापार, उद्योगधंदे यांचा नाश) आणि डॉ० पट्टाभि सीतारामय्या यांचें 'खद्दर' या दोन पुस्तकांतून वाचावें व 'इंडिया, दि होम ऑफ वीव्हिंग' हा तारीख १७।८।१९३४ च्या टाइम्स ऑफ इंडियामधील लेख वाचावा अशी शिफारस आहे. वरील आख्यान पुन्हां लावून वाचकांच्या मनांस आम्हीं दुःख देऊं इच्छित नाहीं. असो.

इ० स० १८२९ सालीं प्रथम सत्तर लाखाचें परदेशीं कापड हिंदुस्थानांत आलें. तेव्हांपासून आतांपर्यंत ही आयात वाढून आज पन्नास कोटींचें कापड परदेशांतून हिंदुस्थानांत येत आहे. दोनशें वर्षांपूर्वीं इतक्याच रुपयांचें म्हणजे पन्नास कोटीचें कापड हिंदुस्थान परदेशाला पाठवीत असे. म्हणजे नशीबाच्या रहाटगाडग्यांतील हिंदुस्थानाचा पोहोरा अगदीं तळास आज चक्रनेमिक्रमें गेला आहे. वरील विवेचनावरून वाचकांच्या ध्यानांत आलें असेलच कीं, फार पुरातन कालापासून विणकामाचा धंदा आपल्या येथें सुरूं होता, आणि ब्राह्मणही तो करत असत. दोनशेंहे वर्षांपूर्वीं म्हणजे इतक्या अलीकडच्या काळापर्यंत हा धंदा उत्कर्षाच्या शिखरास पोहचलेला असून त्याच्याच जोरावर हिंदुस्थान हें सुवर्णभूमी म्हणून जगांत प्रसिद्धी पावलें होतें. तेव्हां आम्हीं पन्नास कोटी रुपयांचें कापड परदेशाला पाठवीत होतों. आपल्याकडे अशी एक म्हण आहे कीं, "जिथें सांडलें तिथेंच शोधावें". विणकामाचा धंदा नाश पावला त्यांतच आपलें वैभव सांडलें. तेव्हां तें आपण या धंद्यांतच शोधलें पाहिजे. 'तुझें आहे तुजपाशीं परी तूं जागा चुकलासी' या तुकारामबोवांच्या वचनाप्रमाणें आमची आज स्थिति आहे. विणकामाचा, हा आमचा राष्ट्रीय धंदा सोडून आम्हीं नोकरी, नोकरी, असा आक्रोश करीत तिच्याच मागें लागलों म्हणूनच

वैभवास मुकलों आहोंत. पुन्हां विणकामाचाच धंदा केल्यानें आमचें गेलेलें वैभव खास परत मिळेल यांत शंका नाहीं. एक तर आज हा धंदा आम्हांस नवा नाहीं. शिवाय महाराष्ट्रापुरता विचार केल्यास जितका हिंदुस्थानांत कापूस पिकतो त्याच्या तिसऱ्या हिश्शापेक्षां अधिक महाराष्ट्रांत पिकतो; म्हणजे कच्चा माल अगदीं आमच्या दारांत आहे. अशी स्थिति असली तरी दीर्घ शंकेखोर लोक असा प्रश्न विचारतील कीं या मंदीच्या दिवसांत विणकामाच्या धंद्यास वाव आहे काय? तर 'पूर्ण आहे' असें आमचें सविनय पण ठाम उत्तर आहे.

हिंदुस्थानची आजची लोकसंख्या पसतीस कोटी आहे, यांत शंका नाहीं. साधारणपणें माणशीं किती कापड लागतें याचा ठोकताळा तज्ज्ञांनीं बसविला आहे. इंग्लंड अमेरिकासारख्या सुधारलेल्या राष्ट्रांत दरवर्षी दर माणशीं १०० वार कापड लागतें. जपानमध्यें माणशीं ५० वार कापड लागतें. आपल्या या कंगाल देशांत माणशीं १५ ते २० वार कापड लागतें आणि आपली सांपत्तिक स्थिति जसजशी सुधारत जाईल व अभिरुची बदलेल तसतसें दरमाणशीं कापड अधिक अधिक लागेल; आणि लवकरच हें प्रमाण माणशीं वीस वार इतकें होणार, यांत शंका नाहीं. हिंदुस्थानास 'पसतीस कोट गुणिलें वीस' इतके वार कापड दरसाल पाहिजे. म्हणजे सातशें कोटी वार कापड पाहिजे. यांपैकीं हातमागावर शंभर कोटी वार म्हणजे एक अब्ज वार कापड फक्त निघतें. ही निपज गेलीं तीस वर्षें आहे इतकीच आहे. त्यांत वाढ झालेली नाहीं. हल्लीं हिंदुस्थानांत ज्या गिरण्या सुरू आहेत त्यांतून फक्त तीनशें कोटी वार कापड निघतें म्हणजे हातमाग व गिरण्या मिळून आज फक्त चारशें कोटी वार कापड हिंदुस्थानांत निघतें आणि आमची गरज सातशें कोटी वार कापडाची आहे. परदेशी कापड आपण बिलकूल घ्यावयाचें नाहीं आणि आपली आपणच गरज भागवायची असें आम्हीं ठरविल्यास आम्हाला आज निदान तीनशें कोटी वार कापड आणखी पैदास केलें पाहिजे. आणि इतकें कापड तयार करण्या-

करितां एक लाख माग व एक लाख चात्या असणाऱ्या निदान शंभर गिरण्यांची अत्यंत जरूरी आहे, असें विणकामाच्या धंद्यांतील तज्ज्ञ मि. एस्. एच. बाटलीवाला यांचें मत आहे. (तारीख १३–११–३४ च्या टाईम्स ऑफ इंडियामधील त्यांचा लेख पहा.) 'खद्दर' या आपल्या पुस्तकांत डॉ. पट्टाभि सीतारामय्या म्हणतात कीं " दररोज पंधरा हजार वार कापड सरासरीन एका गिरणींतून निघतें. जर माणशीं १५ ते २० वार कापड लागतें असें धरलें तर एक गिरणी तीन लाख माणसांनाच फक्त कापड पुरवूं शकेल, आणि याच गणितानें हिंदुस्थानांतील पसतीस कोट लोकांनीं फक्त गिरणीचेंच कापड वापरण्याचें ठरविल्यास इतकें कापड त्यांना पुरविण्याकरितां ५१०० गिरण्यांची जरूरी आहे. साधारणपणें अखिल हिंदुस्थानांत ३५० जिल्हे असून, लोकसंख्येच्या मानानें एकाच जिल्ह्याची कापडाची गरज भागविण्याकरितां सरासरीनें तीन गिरण्या पाहिजेत. पण जिल्ह्यामागें एकसुद्धां गिरणी आज पडत नाहीं; कारण हिंदुस्थानांत आज फक्त ३४४ गिरण्या आहेत. ( मुंबईच्या मिल ओनर्स असोशिएशनचा सन १९३३ चा रिपोर्ट पहा ) तेव्हां या धंद्यांत अद्याप किती वाव आहे, हें वाचकांच्या ध्यानांत आलें असेलच. कारण शंभर कोटी वार कापड हातमागावर आज निघतें आणि तीनशें कोटी वार कापड आज मितीस अस्तित्वांत असलेल्या गिरण्यांतून निघतें. आमच्यांतील बरेच लोक नुसती लंगोटी घालणारे असले तरी माणशीं दरवर्षी किमान कापड १५ ते २० वार लागतेंच. म्हणजे सर्व हिंदुस्थानास सातशें कोटी वार कापडाची गरज आहे. आणि त्यापैकीं आज मितीस फक्त चारशें कोटी वार कापड येथें तयार होतें. तेव्हां तीनशें कोटी वार कापड आणखी येथें तयार झाल्यास, आमची कापडाची गरज आम्हींच भागवूं शकूं; आणि हें तीनशें कोटी वार कापड उत्पन्न करण्यास पुरतील इतक्या गिरण्या आज हिंदुस्थानांत निघणें जरूर आहे. आणि एक गिरणी पंधरा हजार वार कापड रोज काढते. हें प्रमाण लक्षांत घेतल्यास निदान सहाशें गिरण्या तरी आज निघाल्या पाहिजेत मग हिंदुस्थान कापडापुरतें तरी स्वयंपूर्ण होईल. याचकरितां हल्लींची मंदीची परीस्थिती

असली तरी " एक लाख चात्या व एक लाख माग असणाऱ्या निदान शंभर गिरण्या काढणें निःसंशय फायदेशीर होईल " असें मि. बाटलीवाला म्हणतात, तें अगदीं पटण्यासारखें आहे.

आतां जरी सहाशें गिरण्यांची जरूरी असली तरी हल्लीं मुंबईच्या गिरण्या मंदीमुळें नुकसानींत आहेत. सबब नवीन गिरण्या काढणें श्रेयस्कर नाहीं असा आक्षेप घेतला जाईल. पण मुंबईच्या गिरण्यांच्या नुकसानीचें कारण मंदी नसून त्यांतील मॅनेजिंग एजन्सी सिस्टिम हें आहे, असें कॉमर्स कॉलेजचे प्रिन्सिपॉल दावर यांनीं सप्रमाण सिद्ध केलें आहे.* शिवाय १९२२ ते १९२९ पर्यंत गिरणीच्या शंभर रुपये किंमतीच्या शेअरवर एकशें पंचवीस रुपयाइतकें डिव्हिडंड देतां आलें. तशी आज स्थिती नाहीं. तथापि ज्या गिरण्यांतून मॅनेजिंग एजन्सी पद्धत नाहीं व व्यवस्था चोख आहे; त्या गिरण्यांनीं सहा ते सोळा टक्के डिव्हिडंड ( व्याज) आज मितीसही दिलें आहे. हें केसरीचा यंदाचा औद्योगिक अंक पाहिल्यास दिसून येईल. शिवाय सर लल्लुभाई

---

* आपले कारखाने नीट कां चालत नाहींत, त्यांत मुख्य दोष कोणते आहेत व देशाबाहेरील स्पर्धा हीच मोठी अडचण धंद्यांच्या प्रगतींत आहे काय वगैरेबाबत व मॅनेजिंग एजन्सीबद्दल कावसजी यांचें पुढील मत वाचकांना उद्बोधक वाटेल.

" The managing agency System has been the chief defect in the Industrial development of India. The Constant cry of the Industrialists has been, of outside competition. The real cause however, is internal mis-management, dissipation, and expansion without gaining experience. To check this, Government should, without any delay, amend the Company's Act giving greater power to share holders and doing away with *managing agencies.* "

—**Fakirjee Cowasjee,**

*a Prominent Karachi Basinessman.*

( from the opinion expressed to Sir Frank Noyce Member of the Viceroy's Council for Commerce and Industry. Oct. 1934. )

सामळदास या कर्तबगार डायरेक्टराच्या नजरेखालीं चाललेल्या म्हैसूर स्पिनिंग व वीव्हिंग गिरणीनें व गोकाक येथील गिरणीनें यंदाच्च पांच टक्के डिव्हिडंड भागीदारांना दिलें आहे. आज तारखेस अहमदाबादच्या सर्व गिरण्या भरभराटींत असून प्रत्येकीनें सहा ते बारा टक्के अगर अधिकही डिव्हिडंड (नफा) दिलें आहे. शिवाय मंदी सर्वसाधारण असली तरी हा धंदा आजही बेताचा फायदा देऊं शकतो. याचें गमक म्हणजे अहमदाबाद येथें गिरण्यांची सतत होणारी वाढ हें होय. इ. स. १९३३–१९३४ सालीं इतर प्रांतांत गिरण्या वाढल्या नाहींत. पण अहमदाबाद येथें मात्र ७८ च्या ८२ झाल्या; म्हणजे ४ गिरण्या वाढल्या. मुंबई व अहमदाबाद हीं शहरें सोडल्यास मुंबई इलाख्यांत इतर ठिकाणीं गिरण्यांची वाढ सदर सालास झाली नाहीं हें खरें. पण अहमदाबादचे लोक कांहीं इतके मूर्ख नाहींत कीं, मंदी असतांनाही चार गिरण्या नवीन काढतील. फायदा होतो म्हणूनच त्यांनीं नवीन चार गिरण्या काढल्या आहेत. आज जर कापडाच्या गिरण्या चालविण्याचें शहाणपण, भांडवल व यांत्रिक कौशल्य कोठें आहे असें विचारलें तर, अहमदाबादेकडेच बोट दाखवावें लागेल. मँचेटरच्या टेक्स्टाईल इन्स्टिट्यूटचे अध्यक्ष सर वुइल्यम क्लेअर यांनीं परवां असे उद्गार काढले कीं, अहमदाबादेमध्यें यांत्रिक कौशल्यांत बारीक तलम कापड काढण्यांत व रंगविण्यांत कल्पनातीत प्रगति झाली आहे. इतकी कीं, लँकेशायरनें आतां आपल्या धंद्यांत सुधारणा केली नाहीं तर त्याचें धंद्यांतील अग्रस्थान जाईल. क्लेअरसाहेबांनीं मुंबईच्या गिरण्यांना नांवें ठेवून त्या आहेत त्याच स्थितींत आहेत, त्यांत सुधारणा नाहीं असा शेरा मारला आहे, हें ध्यानांत ठेवण्यासारखें आहे. म्हणूनच करीमभाई ग्रुप गिरण्यांचें दिवाळें वाजण्याची पाळी आली. तेव्हां यावरून हा धंदा तोट्यांत आहे असें समजणें मूर्खपणाचें होईल. केसरीच्या औद्योगिक अंकांत श्रीयुत वैकुंठलाल ठाकूर यांची मुलाखत प्रसिद्ध झाली आहे. हे स्वतः बी. ए. असून गेलीं २८ वर्षें गिरणीच्या धंद्यांत आहेत.

आणि १९२८ सालापासून प्रसिद्ध 'सोलापूर मिलचे' मॅनेजरही त्यांना नेमिलें आहे. यावरून या धंद्यांतील त्यांचा अधिकार काय आहे याची कल्पना वाचकांस येईल. ते आपल्या मुलाखतींत "महाराष्ट्रांत नवीन गिरण्यांना कितपत वाव आहे?" या प्रश्नास "सध्यांचा काल कठीण असला तरी नवीन गिरण्यांना महाराष्ट्रांत अजूनही वाव खात्रीनें आहे" असें उत्तर देतात. हें दीर्घ शंकेखोरांनीं ध्यानांत ठेवावें. तसेंच दुसरे एक तज्ज्ञ एस्. एच्. बाटलीवाला 'हा धंदा अजून चांगला किफायतशीर आहे,' असें सांगतात. बाटलीवाला पुढें म्हणतात कीं, "या निराशेच्या दिवसांत दिशाभूल होण्याचा संभव असून खऱ्याखोट्याची निवड होणें अवघड होतें. म्हणूनच या धंद्यांत फायद्याची खात्री असूनही त्यांत पडणें अंधारांतील उडी आहे काय असें वाटण्याचा संभव आहे. यशाचा मार्ग बिकट तर आहे खराच. नाण्यांची टंचाई, उत्तम कारागिरांची वाण, वगैरे अडचणी आहेत. तथापि आंकडेशास्त्र पाहतां त्याच्या उजेडांत या धंद्याची नाव निराशेच्या अंधःकारांतून पार सहजच पडणार." तेव्हां वरील दोघां तज्ज्ञांचा उपदेश व सल्ला आणि अहमदाबादेच्या गिरण्यांचें उदाहरण विचारांत घेतां; या मंदीचे दिवसांतही नवीन गिरण्यांना पूर्णपणें वाव आहे ही गोष्ट सिद्ध होत आहे.

आतां या गिरण्या यशस्वी होण्यास कोणत्या गोष्टींची आज जरूरी आहे आणि त्या आपल्यांत कितपत उपलब्ध आहेत तें पाहूं. याबाबत वैकुंठलाल यांनीं चतुःसूत्री सांगितली आहे. ती फार महत्त्वाची आहे. "(१) त्यांच्या मतें पहिली गोष्ट गिरणी स्वयंपूर्ण, फार मोठी नाहीं, अशी पंचवीस हजार चात्या व तीनशें ते पांचशेंपर्यंत माग असणारी असावी आणि याकरितां भांडवल बारा ते पंधरा लाख पुरेल. (२) दुसरी गोष्ट दीर्घकाल टिकणारीं यंत्रें घेण्याकडे लक्ष न देतां दहा पंधरा वर्षांत बदलतां येईल, अशी यंत्रसामुग्री—मशिनरी—घ्यावी आणि दोन तापे (डबल शिफ्ट) करून रात्रंदिवस राबवावी. दहा वर्षांत नवीन यंत्रें घेण्यास पुरेशी रक्कम हातीं येईल; अशा रीतीनें दरवर्षी घसाऱ्याची रक्कम बाजूस काढून ठेवावी. (३) बँकांचें कर्ज व लोकांच्या ठेवी यांनीं

भांडवल न उभारतां गिरणीनें आपलें भांडवल शेअर व डिबेंचर्स यांनीं उभारावें. त्यामुळें स्वतंत्रता राहाते आणि आत्मविश्वास वाढतो. कामही अधिक धडाडीनें करितां येतें. (४) विक्रीची संघटना केली पाहिजे. आपला माल कसा विकला जाईल याची आंखीव योजना पाहिजे. ती फोर्ड कंपनीसारखी असावी. नाहीं तर वस्त्रप्रावरणें हीं मानवी जीवनास अत्यावश्यक असून, माल उठत नाहीं अशी स्थिति होते. जपानचें संघटन फार विलक्षण आहे. त्यामुळें त्याचा माल तेव्हांच खपतो. तसेंच जुळल्यास जपानला जाऊन तेथील परिस्थिति पाहून येऊन मग गिरण्या काढाव्यात. व्यवस्थापकीय शाखेंतील इसमांना जपानला पाठविल्यास फायदाच होणार आहे."

वरील गोष्टींकडे आपण लक्ष तर दिलेंच पाहिजे. पण आज जो देश विणकामांत सर्वांचे गुरुस्थानीं आहे त्याच्या यशाचीं व उत्कर्षाचीं कारणें काय आहेत, हेंही पाहणें मार्गदर्शक होणार आहे. नुकतेच जपानला जाऊन आलेले सर लल्लुभाई सामळदास व गुजराथ कॉलेजचे आंकडेपंडित–अर्थशास्त्रज्ञ–प्रिन्सिपॉल फिंडले शिरास हे दोघे जपानच्या यशाची पुढीलप्रमाणें मीमांसा करितात:— "नुसत्या अंतराचा विचार करतां जग हें आतां अगदीं संकुचित झालें आहे. जगाच्या एका कोपऱ्यांतील ज्ञान दुसऱ्या कोपऱ्यांत विद्युत् संदेशानें थोड्याच मिनिटांत पाठवितां येतें. त्यामुळें धंद्याचें कौशल्य अगर कसब याचा मक्ता (मोनापली ) असा कोणाकडेही राहिलेला नाहीं. जसें सगळयांच्याच जवळ सुंदर गुलाबाचें बीं उपलब्ध झाल्यास साऱ्यांनाच गुलाबाचा ताटवा लावतां येतो तशी आज ज्ञानाची स्थिति आहे. जपानमध्यें बहुतेक गिरणी कामगार पंधरा १५ वर्षांच्या शेतकऱ्यांच्या मुली असतात. प्रथम सहा महिने त्यांना विणकामाचें शिक्षण दिलें जातें. गिरणीच्या कंपाउंडमध्यें, खास बांधलेल्या इमारतींतून मुली राहातात. या इमारतींत स्वच्छता अप्रतिम असते. प्रत्येक मुलीला भरपूर हवा उजेड असणारी लहानशी खोली मिळते. त्यांत कपाटें वगैरे सर्व सोई असतात. मुली आपापल्या खोल्या इतक्या स्वच्छ ठेवतात कीं, भेटायला आलेल्या इसमास आपले

घाण जोडे बाहेर व्हरांड्यांत काढून ठेवून, दुसरे मुद्दाम याकरितां ठेविलेले जोडे घालून, मग खोलींत जावें लागतें. फुरसतीच्या वेळांत मुलींना शिवणकाम, गाणें यांचें शिक्षण देण्याची सोय, तसेंच गृहशिक्षण, गणित व इतर विषय शिकविण्याची सोय, गिरणीच्या शाळांतून केली जाते. हेतु हा कीं गिरणी सोडल्यावर सदर मुलींना आपला जीवनक्रम चांगल्या प्रकारें घालवितां यावा. कारण मुलीं अविवाहित असून, पांच सहा वर्षें गिरण्यांत काम करून पैसे सांठवितात आणि मग लग्नें करितात. त्या, गिरणींत असतांना, त्यांच्या सुखसोईकडे पूर्ण लक्ष दिलें जातें. थिएटर, सिनेमा, दवाखाना, वाचनालय, क्रीडांगणें हीं सगळ्यांनाच उपलब्ध असतात. तसेंच इतरांपेक्षां वीस टक्के स्वस्त देणारीं धान्यांचीं दुकानें त्यांच्याकरितां मालक गिरणीमध्यें ठेवतात. या सर्व गोष्टींमुळें मुलींची कार्यक्षमता फार उच्च दर्जाची बनते. सरासरीनें प्रत्येक जपानी मुलगी आठ साचे अगर माग चालविते. तीस माग चालविणारी मुलगी लल्लुभाईंना नायोगा शहरीं आढळली. आपल्याकडे एक पुरुष मजूर फक्त दोन साचे अगर माग चालवितो. कोण हा कार्यक्षमतेंत फरक ! तसेंच साडेआठ तासाचा एक ताफा असे दोन ताफे ( शिफ्ट् ) रात्रंदिवस जपानी गिरणींत काम करीत असतात. तसेंच या गिरण्यांमधील–मशीनरी–यंत्रें अगदीं नवीन अद्यावत् अपटुडेट असतात. तशीं ठेवण्याची खबरदारी मालक घेतात. हें त्यांच्या यशाचें दुसरें कारण होय. शिवाय मालक व मजूर आपल्या धंद्याबद्दल राष्ट्रीय अभिमान बाळगतात. ते धंद्यांत मागें राहणें राष्ट्राच्या कीर्तीस विघातक समजतात. त्यामुळें धंद्यांची प्रगति करण्यांत मालक व मजूर यांचें सहकार्यच दिसून येतें. शिवाय बदलत्या परिस्थितीशीं मजूर आपला जीवनक्रम तेव्हांच जुळवून घेतात. यंत्रांत अगर उत्पादन पद्धतींत नवीन सुधारणा झाली तर, तिच्याशीं तादात्म्य तेव्हांच जपानी मजूर होतो. पण आपल्याकडील मजूर कोणतीही नवीन गोष्ट करून पाहण्यास नाखूष असतो. सगळ्यांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे जपान्यांची संघटना ( ऑर्गनायझेशन ) ही अत्यंत निर्दोष व परिपूर्ण आहे. तेथील मालक व डायरेक्टर्स फारच माफक वेतन घेतात. साधारणपणें यांचें वेतन

दरमहा पांचशें रुपये असावें असा लल्लुभाईचा अंदाज आहे. पण आपल्याकडील मिल एजंटस् व मॅनेजींग डायरेक्टर्स यांच्या चौपट पगार घेतात. आपल्याकडे असा समज आहे कीं, जपानच्या यशाचें कारण मशिनरी, मजूर व मालक यांची अपटुडेट कार्यक्षमता हें नसून सरकार, सदर धंद्यांस मदत देतें, आणि मालक मजूरांना गुलामासारखे राबवून घेतात, हें आहे. पण फिंडले शिरास म्हणतात कीं, ही गोष्ट साफ खोटी आहे; आणि जपान मूळ किंमतीपेक्षांही माल कमी किंमतीस विकत नाहीं. तर त्यांना आज स्वस्त विकण्यास परवडतें, याचें कारण जपानची उत्कृष्ट संघटना व परिपूर्ण कार्यक्षमता हेंच होय. सरकार धंद्यास मदत करीत नाहीं; आणि मालक मजूराची काळजी मुलाप्रमाणें घेतात व गुलामासारखें वागवीत नाहींत." असो.

आतां आपल्याकडील मजूर कितपत कार्यक्षम असतो व मालक फायदा किती घेतात, हें समजून घेणें जरूर आहे; कारण आपलें धोरण आंखण्याच्या कामीं तें आपणास मार्गदर्शकच होईल. अहमदाबाद येथें परवां मजुरी कमी करणेबद्दल मालक व मजूर यांचा वाद झाला. त्यांतून या बाबतची माहिती चांगली बाहेर आली आहे. मालकांतर्फे असें दाखविण्यांत आलें कीं, मुंबईंत मजूराला साच्यामागें सोळा रुपये मिळतात, व तो दोनच साचे चालवितो. तर अहमदाबाद मध्यें साच्यामागें आपण पंचवीस रुपये देतों, आणि मजूर दोनच साचे अगर माग चालवितो. म्हणजे त्याला दरमहा ५० रुपये मिळतात. पण जपानमध्यें मजूर रोज आठ माग चालवितो आणि त्याला रोजमजुरी सव्वादोन रुपये मिळते, म्हणजे महिन्याचे ६७॥ रुपये त्याला मिळतात. लँकेशायरमध्यें मजूर सहा माग चालवितो; आणि त्याला दरमहा मजूरी ११५ रुपये मिळते. पण या हिशेबानें अहमदाबादच्या मजूराला १५० रुपये दरमहा पडतात. तसेंच सूत कांतणाऱ्या मजूरांच्या दरांतही फरक दृष्टीस पडतो. अहमदाबाद येथें २०० चात्या चालविणाऱ्या मजूराला ८१४८६ मजुरी द्यावी लागते तर जपानमध्यें ८०० चात्या चालविणाऱ्या मजूरास रु. १८१४ मजुरी मिळते. पण ती अहमदाबादच्या दरानें दिल्यास रु. ३८१० होते. म्हणून गिरणीचे मालक

"हिंदुस्थानांतील मजूरी महाग पडते कारण मजूर अक्षम आहेत," अशी तक्रार करितात. या वादांतील रहस्य समजण्यास पुढील कोष्टक थोडीशी मदत करील:—

| गांवचें नांव | मजूर रोज सांचे चालवितो त्याची संख्या. | रोजची मजूरी. रुपये. | दरमहा मजूरी रुपये. |
|---|---|---|---|
| अहमदाबाद | २ | १८१०८८ | ५० |
| जपान | ८ | २८४ | ६७८८ |
| इंग्लंड | ६ | ३८१२ | ११५ |

वरील कोष्टकावरून वाचकांच्या ध्यानीं येईल कीं, अहमदाबाद येथें सहा माग चालविण्यास दरमहा १५० रुपये खर्च येतो आणि तितकेच माग चालविण्यास इंग्लंड व जपानमध्यें अनुक्रमें ११५ व ५१ रुपये खर्च येतो. अर्थात् अहमदाबादमध्यें मजूरी जपानपेक्षां तिप्पट व इंग्लंडपेक्षां सवापट महाग पडते. सबब ती कमी करावी असें मालकांचें म्हणणें आहे. उलट पक्षीं मजूरसंघाचें म्हणणें असें आहे कीं, १९१६ ते १९३२ पर्यंत प्रत्येक मालकाला आपलें नुकसान भरून काढूनसुद्धां सरासरीनें ३२ टक्के नफा पडला आहे. ९ टक्याखालीं तर कधींच तो गेला नाहीं, फक्त एकदांच तो ९ टक्के पडला होता. ५८ टक्याइतकी भरमसाट रक्कम मिल एजंटांना देऊनही प्रत्येक गिरणीवाल्यास निव्वळ फायदा १६ टक्के पडला आहे. १९१८ ते १९३२ पर्यंत नुसता कागदोपत्रीं दिसणारा फायदा, आठ कोटी रुपये इतका, मिल एजंटांना मिळाला होता. यापेक्षां कितीतरी पट अधिक फायदा त्यांनीं मारला आहे. तेव्हां वरील वादांतून निष्कर्ष इतकाच निघतो कीं, हा धंदा अद्याप किती तरी फायदेशीर आहे. शिवाय

कार्यक्षमतेंत इंग्लंड, जपान यांतील मजूरांपेक्षां आपले मजूर किती कमी दर्जाचे आहेत हेंही दिसून येतें.

सेन्सस कमिशनर डॉक्टर हूटन यांनीं पुढील सूचना हिंदी कामगारांबद्दल केल्या आहेत. त्या चिंत्य आहेत. ते म्हणतात कीं, " वाढत्या लोकसंख्येच्या प्रमाणांत धंद्याची वाढ हिंदुस्थानांत झालेली नाहीं. शिवाय येथ संघटित ( ऑर्गनाइज्ड लेबर ) असा कामगार वर्गच नाहीं. फारच थोडा म्हणजे पन्नास लाख अवघा आहे. आणि हा वर्ग वरचेवर बदलत राहतो. चार महिने शेतकींत व आठ महिने गिरणींत हा वर्ग काम करतो. त्यामुळें धंद्यांतील कौशल्य त्याच्यांत उत्पन्न होत नाहीं. शिवाय त्याच्या राहण्याच्या चाळी अत्यंत घाणेरड्या व आरोग्य-विघातक असतात; आणि त्यांत गर्दी बेसुमार असते. ज्याला गांवांत शेत नाहीं व घरीं ज्याचा कांहीं उपयोग नाहीं अशा टाकाऊ वर्गांतून गिरणीच्या वाड्यांस कामगार येतो. या कारणामुळेंच इंग्लंड व जपानपेक्षां आपला मजूर महाग पडतो. सबब डॉक्टर हूटन म्हणतात कीं, वरील दोष नाहींसे झाल्याशिवाय औद्योगिक भरभराट होणार नाहीं. पण शेतीवर इतकी गर्दी झाली आहे कीं, औद्योगिक भरभराट होणें आज अत्यंत अवश्यक आहे. यावरून वाचकांच्या ध्यानांत आलें असेलच कीं कामगार वर्ग जर कुशल वाकबगार पाहिजे तर तो पिढ्यान्‌पिढ्या त्याच धंद्यांत सारखा काम करणारा असल्यास बरें. रोज नवीन धंदे बदलणारा कामगार कधींही कार्यक्षम होत नाहीं. आणखी एक लक्षांत ठेवण्याची गोष्ट ही कीं सिडनहॅम कॉलेजचे प्रो. एम्. जी. ॲंटिया यांनीं नुकतेच ' विणकामाच्या धंद्याबद्दलच्या कल्पना आतां पार बदलल्या आहेत ' असें व्याख्यानांत सांगितलें आहे. लॅंकेशायरमधील दमट वातावरण ( ह्युमिडिटी ) आतां आपल्या येथेंही उत्पन्न करतां येते. म्हणजे अमुकच देश या धंद्याला योग्य आहे अशी स्थिति आज राहिली नाहीं व सर्वच देश या धंद्याला सारखेच योग्य आहेत हें सांगण्याचा त्यांचा हेतु होता.

आशियाखंडांत विणकामाचा धंदा वाढीस लागल्यामुळें युरोपखंडांतील देशांत आतां धडकी भरूं लागली आहे. याबाबत तारीख ५

माहे ९ सन १९३४ च्या टाईम्स ऑफ इंडियांतील अग्रलेख पहावा. त्यांत पोलंड देशांतील गिरणीच्या धंद्यांतील प्रमुख ( मिल मॅग्नेट ) ओटो बॅकविट्झ म्हणतात कीं " युरोपांतून आशियामध्यें विणकामाचा धंदा जात आहे, ' मायग्रेट ' होत आहे, हें पाहून फार वाईट वाटतें. आशियामध्यें नवीन गिरण्या निघून जी कापडाची पैदास आज होत आहे, त्यामुळें युरोपखंडाची कधींही भरून न येणारी हानी झाली आहे. उद्यां आफ्रिकाही आशियाप्रमाणें हा धंदा करूं लागल्यास युरोपचे दिवस भरलेच म्हणावयाचे. या धंद्यांत अग्रेसर जपान व हिंदुस्थान हे देश आहेत. " वरील ओटोच्या दुःखोद्गारांवरून एक गोष्ट स्पष्ट होत आहे कीं, व्यापाराचा लंबक युरोपच्या अगदीं टोकास गेला होता तो आतां आशियाकडे–हिंदुस्थानाकडे–परत फिरला आहे; आणि आज ना उद्यां हिंदुस्थानाला आपला हातचा गेलेला कापडाचा व्यापार पुनः हस्तगत करून घेण्याचा सुयोग लवकरच येणार. मात्र आलेल्या संधीचा फायदा आम्ही घेतला पाहिजे. पण आपण तसें करीत नाहीं; असें दुःखानें म्हणावें लागतें. कारण नुकतेच 'केसरीं'त मागांच्या वाढीचें तुलनात्मक आंकडे पुढीलप्रमाणें आले होते:—

| | सन १९३० | मागांची संख्या | सन १९३३ | मागांची संख्या |
|---|---|---|---|---|
| इंग्लंड | ,, | ६९३००० | ,, | ५८८००० |
| अमेरिका | ,, | ६९९००० | ,, | ६१४००० |
| जपान | ,, | १८८००० | ,, | २७७००० |
| हिंदुस्थान | ,, | १८०००० | ,, | १९०००० |

हें पाहतां आमची प्रगति गोगलगाईचे पायानें चालली आहे, असें दिसतें. शिवाय जपानी लोक आपल्या गिरणींत बाहेरून तज्ज्ञ आणीत नाहींत. आज त्यांच्या सर्व गिरण्यांतून जपानीच तज्ज्ञ ( एक्स्पर्ट ) आहेत. पण आम्हीं मात्र परदेशांतून तज्ज्ञ आणतों. त्यामुळें जपानपेक्षां वीस वर्षें अगोदर आम्ही या धंद्यांत पडलों असलों तरी जपानप्रमाणें आम्हांला मागांत अगर इतर विणकामाच्या धंद्यांत व यंत्रांत कोणताच

नवीन शोध लावतां आलेला नाहीं; आणि या परावलंबित्वामुळें आमचा विणकामाचा धंदा बराच मागासलेल्या स्थितींत आहे. मि. तोयोडा या जपानी गृहस्थांनीं आपोआप चालणारा माग शोधून काढून क्रोडो रुपये मिळविले. तसें एकाही हिंदूनें आजवर केलेलें नाहीं; त्याचें कारण इतकेंच कीं अद्यापपावेतों बुद्धिमान् वर्ग या धंद्यांत पडलेला नाहीं. असो.

ब्राह्मणांतील बेकारी घालविण्यास आज एकमेव उपाय, रामबाण उपाय, म्हणजे विणकामाचा धंदा असें आम्हीं वर नमूद केलें आहेच. लो. टिळक म्हणतात त्याप्रमाणें विणकामाचा धंदा चालविण्यास जर कोणता एखादा देश दुसऱ्या देशापेक्षां अधिक योग्य असेल तर तो हिंदुस्थानच होय. आणि हिंदुस्थानांतही दुसऱ्या प्रांतापेक्षां कोणता एखादा प्रांत हा धंदा करण्यास अधिक योग्य असेल, तर तो महाराष्ट्रच होय असें आमचें नम्र पण ठाम मत आहे. वर केलेल्या चर्चेवरून वाचकांच्या ध्यानांत आलें असेलच कीं अजूनही या धंद्यांत वाव आहे.इतकेंच नव्हे तर या *मंदीच्या

---

* मंदीचे दिवस सरून कापडाच्या धंद्याला आतां पुनः चांगले भरभराटीचे दिवस येऊं लागले आहेत हें ताज्या व्यापारी बातम्यांवरून वाचकांच्या ध्यानांत आलें असेलच. म्हणजे कापडाच्या गिरणीचा धंदा सुरूं करण्यास कांहींच हरकत नाहीं. त्यांत धोकाही आतां उरलेला नाहीं. मंदी सरली असल्यानें तिला भिण्याचें कारण नाहीं; याचे पुष्टयर्थ ता. २।१०।३४ च्या साप्ताहिक सकाळमधील पुढील बातमी पहाः—

" मुंबईतील जवळ जवळ निम्या गिरण्या रात्रंदिवस चालू असून गिरण्यांच्या जवळ तयार मालाचा मुळींच साठा नसल्याचें दिसत आहे. "बॉम्बे, स्वदेश, कुलाबा" वगैरे मोठाल्या गिरण्यांचे माग १९३६ च्या एप्रीलपर्यंत ' बुक ' झाले असून नवीन डीझाइन्स-नवीन माल-काढण्यास मुळींच वाव नसल्याचें गिरणीवाल्यांनीं ठिकठिकाणच्या व्यापाऱ्यांना कळविलें आहे. ह्या सर्व बाबी हेंच दर्शवितात कीं गिरण्यांची परिस्थिति चांगल्या तऱ्हेनें सुधारत आहे व अशीच परिस्थिति पुढील २–३ सालें राहील यांत शंका नाहीं. गिरण्यांच्या शेअर्सना तेजी आहे. " टाईम्समध्येंही अशाच बातम्या अलीकडे येतात.

काळांत सुद्धां अहमदाबादच्या गिरण्या १६ टक्के फायदा काढीत आहेत; आणि जपान व इंग्लंडांतील कामगारासारखे येथील कामगार सराईत कसबी नसतांनाही हा फायदा काढीत आहेत. तेव्हां या धंद्यांत पडणें म्हणजे अंधारांत उडी घेणें नव्हे हें खास. आतां भांडवलाचा प्रश्न मुख्य आहे, कारण ' सर्वारंभास्तंडुलाः प्रस्थमूलाः । . भांडवल डिबेंचर्स काढून अगर शेअररूपानें उभें करावें असें ठाकूर यांचें मत वर दिलेंच आहे. पण आमच्या मतें बेकारी घालविण्याकरितां तसें करूं नये. तर फंड जमा करून तें उभें करावें. प्रथम ब्राह्मण बेकारी निवारक मंडळ स्थापण्यांत यावें आणि या मंडळानें ब्राह्मण बेकारी निवारक फंड उभारावा. ब्राह्मणांतील विद्वान्, लायख, कर्तबगार व विश्वासार्ह असेच लोक मंडळांत असावेत. फंड गोळा केल्यानंतर त्यांनीं टस्ट्री या नात्यानें फंडावर देखरेख ठेवावी. ज्याप्रमाणें पैसाफंड अगर डेक्कन-एज्युकेशन-सोसायटी-फंड गोळा केला जातो तसा हा फंड गोळा केला जावा. महाराष्ट्रांत स्थूल मानानें कोंकणस्थ, देशस्थ, कऱ्हाडे वगैरे मिळून पांच सहा लाख ब्राह्मण आहेत. त्यांपैकीं समजूतदार अशा एक लाख ब्राह्मणांनीं माणशीं बारा रुपये दिल्यास बारा लाख रक्कम तेव्हांच गोळा होईल. आणि एक गिरणी काढण्यास आज इतकी रक्कम पुरे आहे, असें ठाकूर यांचें मत आहे. आतां वरील गणिताबद्दल कोणी हंसतील तर हंसोत. पण लो० टिळकांनीं आपल्या ' स्वदेशीवरील आक्षेप' या लेखांत " माणशीं चार आणे घेऊन पसतीस कोटींतील निम्यापेक्षां कमी अशा समजूतदार लोकांतून तीन कोट भांडवल विणकामाच्या धंद्यास उभारावें "; असा सल्ला दिला होता हें हंसणाऱ्यांनीं लक्षांत ठेवावें. या वेळींच एक गोष्ट ब्राह्मण समाजापुढें ठेवावीशी वाटते कीं देशस्थ ऋग्वेदी संघ, कऱ्हाडे ब्राह्मण संघ, यजुर्वेदी ब्राह्मण संघ व शेवटीं इतरांनीं आपले संघ स्थापले म्हणून निघालेली ' चित्पावन लीग' अशा संस्थांतून फुटकळ व फुटीर उद्योग न करितां, सगळ्या ब्राह्मणांनीं एक होऊन फंडाच्या उभारणीस मदत करावी. नुसतें ' कलौ संघे शक्तिः ' हें घोकण्यांत कांहींही हशील नाहीं. कोंकणस्थ, कऱ्हाडे व देशस्थ यांनीं एक झालेंच पाहिजे, असें सन १८८१ सालीं लो०

टिळकांनीं प्रतिपादिलें होतें. यांतील मर्म सर्व ब्राह्मणांनीं ध्यानांत घ्यावें, अशी आग्रहाची विनंति आहे. आज ब्राह्मण समाजास कोंकणस्थांच्या स्वच्छपणा, उद्योगीपणा, धाडस, मुत्सद्दीपणा व मितव्यय वगैरे गुणांची; देशस्थांच्या परोपकार, दातृत्व व औदार्य या गुणांची; आणि कऱ्हाड्यांच्या टापटीप व व्यवहारचातुर्यादि गुणांची फार जरूर आहे. प्रत्येक पोट जातींत हे सर्व गुण कमीजास्त प्रमाणांत असले तरी कमी असतील ते इतरांकडून संपादन केले पाहिजेत. सांगण्याचें तात्पर्य इतकेंच कीं, ' संभूय समुत्थान ' व्हावें. फुटीरपणा नको.

तेव्हां माणशीं बारा रुपयेप्रमाणें बारा लाख रुपये ब्राह्मण जातींतून गोळा करणें अवघड नाहीं. ब्राह्मण जात मरूं द्यावयाची नसेल तर इतका स्वार्थत्याग आम्हीं केला पाहिजे. दुसऱ्या तऱ्हेनेंही हा फंड गोळा करतां येईल. तो असा. आज मुंबई युनिव्हर्सिटीस वीस आर्ट्स कॉलेजें जोडलेलीं आहेत. धारवाड, बेळगांव, कोल्हापूर, सांगली, नाशीक, सुरत, बडोदें, अहमदाबाद, भावनगर व जुनागड या प्रत्येक ठिकाणीं एक अशीं दहा व पुण्यांत तीन, मुंबईत चार आणि सिंध कराची इकडे तीन मिळून हीं वीस होतात. या प्रत्येक कॉलेजांतून सरासरीनें दोनशें ब्राह्मण विद्यार्थी असतात असें मानणें चुकीचें होणार नाहीं. म्हणजे या वीस कॉलेजांतून आज चार हजार ब्राह्मण विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. यापैकीं श्रीमंत, तैल बुद्धीचे व उपाशीं मेलों तरी पदवी घेणारच असे हेकेखोर, मिळून एक हजार विद्यार्थी वगळल्यास समजूतदार विद्यार्थी तीन हजार शिल्लक राहतात. त्यांना व त्यांच्या पालकांना आर्ट्स कोर्स ( बी. ए. चें शिक्षण ) अगदीं कुचकामाचा, एरंडाच्या गुऱ्हाळासारखा आहे असें पटवून दिल्यास सदर विद्यार्थी कॉलेजमध्यें जाणार नाहींत. हल्लीं या कॉलेजांची फी दरसाल शंभर रुपये असते हें सगळ्यांना माहितच आहे. तेव्हां प्रत्येक विद्यार्थ्यामागें दरसाल शंभर रुपयेप्रमाणें फुकट जाणाऱ्या या फीची बचत केली तर तीन हजार विद्यार्थ्यांची शंभराप्रमाणें तीन लाख रुपये फी वाचेल; आणि ही

नगर वाचनालय सातारा
संगणकीकृत

रक्कम ब्राह्मण बेकारी निवारक फंडास उपलब्ध होईल. शिवाय पुस्तकें, परीक्षा, फी यांवर खर्च होणाऱ्या सर्व रकमेची बचत झाल्यास ही रक्कम चार लाखांपर्यंत सहज जाईल. तेव्हां ब्राह्मण पालकांनीं आंधळ्याप्रमाणें मराठी चवथी ते इंग्रजी चवथी, मग मॅट्रीक व मग बी. ए. अखेर बेकारी व भीक, अशी शिक्षणक्रमाची प्रणाली व योजना न आखतां, वरील फंडास मदत केल्यास त्यांच्या मुलाबाळांच्या पोटापाण्याची तरतूद होईल. दरसाल चार लाख याप्रमाणें तीन वर्षें फीची रक्कम सांठवल्यास बारा लाख रुपये जमतील व त्यांतून एक गिरणी सहज निघेल. तेव्हां फंड गोळा करतांना आपल्याला, पालकांना असें सांगतां येईल कीं, " चार वर्षें मुलास कॉलेजांत ठेवून आपण चारशें रुपये नुसत्या फीवर खर्च करतां आणि इतका खर्च करून तुमच्या मुलांचा पोटापाण्याचा प्रश्न सुटत नाहीं व तो प्रश्न कोणचेंही कॉलेज सोडवत नाहीं. पण जर हेच चारशेंहे रुपये तुम्ही आमच्या फंडास द्याल तर आम्ही गिरणी काढूं व त्यांत तुमच्या मुलाची सोय, बी. ए.पेक्षां अधिक चांगली करून देऊं. तुमचा मुलगा बी. ए. झाल्यास फार तर २०।२५ रुपये दरमहा मिळवील. पण आमच्याकडे गिरणींत राहिल्यास त्याला आम्ही ३५ ते ४० रुपये निदान दरमहा खास देऊं. बी. ए. झाल्यावर नोकरी मिळणें दुरापास्त असतें. तसें आमचे येथें होणार नाहीं." वरीलप्रमाणें सभांतून, वर्तमानपत्रांतून प्रचंड चळवळ केली पाहिजे. म्हणजे पालकांचीं व तरुण विद्यार्थ्यांचीं मनें धंद्याकडे वळतील. तेव्हां भांडवलाचा प्रश्न प्रथम वाटतो तितका अवघड नाहीं, हें वाचकांच्या ध्यानांत आलें असेलच. भांडवलाचा प्रश्न सुटल्यावरही कांहीं भेदरट लोक तथापि म्हणतील कीं, " पहा बुवा हा धंदा आपण बाप जन्मांत केला नाहीं. तेव्हां खास बुडूं. हा धंदा गुजराथ्यांचा आहे. कारण ' जेनू काम तेनू थाय बिजू करेसो गोतू खाय ' असा आक्षेप घेतल्यास गोंधळून जाणेचें कारण नाहीं. एक तर नेपोलियन म्हणतो त्याप्रमाणें जगांत अशक्य असें कांहीं नाहीं. उद्योगानें, चिकाटीनें व सायासानें तुकोबा म्हणतात तसें ' असाध्य तें साध्य होतें, ' हें आपण पाहतोच. तेव्हां समर्थवचनाप्रमाणें ' केल्यानें

होत आहे रे ' हेंच खरें. ' यत्न तो देव ' केला म्हणजे झालें. शिवाय आपल्या सुदैवानें आज मुंबई, अहमदाबाद, सोलापूर, धुळें, जळगांव व चाळीसगांव येथील गिरण्यांतून २०० ते २००० रु० पर्यंत पगारावर वीव्हिंग मास्तर, इंजीनियर, एजंट, मॅनेजर या जागांवर नेहमींच्या श्ववृत्तीला अनुसरून ब्राह्मण मंडळी आहेत. खुद्द अहमदाबाद येथें पुढील ब्राह्मण सद्गृहस्थ निरनिराळ्या मिलमध्यें मोठमोठ्या कामावर आहेत अशी माहिती मिळते. मि. व्ही. टी. मनोहर, मि. टी. जी. चौधरी, मि. नानासाहेब जोशी व मि. एस. ए. खरे हे अनुक्रमें ' वेस्ट कॉटन मिल, लक्ष्मी कॉटन मिल, भालाखिया मिल, ज्युबिली मिल ' या गिरण्यांचे म्यानेजर आहेत. तसेंच मेसर्स व्ही. आर. दाते, कवठेकर, जोशी, नागले, खरे, उपाध्ये, गोडशे, सप्रे, जांबकर, कोठावळे, पाध्ये, केळकर, दामले, नवाथे, व राजगुरु ही मंडळी डाईंग व वीव्हिंग मास्तर व ब्लीचिंग मास्तर अशा कामावर 'मानेक चोवक, न्यू कमर्शिअल, चंद्रकांत, सिल्व्हर कॉटन, असरावा, सरसपूर कॅलिको, भरतखंड, मार्सडेन, राजनगर ' अशा नांवाच्या गिरण्यांतून अनुक्रमें आहेत. तसेच मेसर्स करंदीकर, बक्षी हे ज्युबिली व नागरी ह्या मिलमध्यें इंजीनियर आहेत. धुळें येथें प्रताप मिलचे मॅनेजर केळकर असून इंजीनियर महाजनी आहेत. तात्पर्य इतकेंच कीं ब्राह्मणांत गिरणीच्या धंद्यांतील तज्ज्ञ आज बरेच आहेत. आम्हास अशी उमेद वाटते कीं, आम्हीं भांडवल गोळा केल्यावर वरील सद्गृहस्थांना विनंती केली तर यांपैकीं निदान निम्मे तरी स्वार्थत्याग करून, आपुलकीच्या भावनेनें आमची गिरणी चालविण्यास पुढें येतील. टिळक, चिपळूणकर, व आगरकर या थोर गृहस्थांनीं अपूर्व स्वार्थत्याग करून ज्याप्रमाणें न्यू स्कूल काढलें; तसा स्वार्थत्याग आज मितीस वरील सद्गृहस्थांपैकीं निदान निम्मे तरी लोक करून परंपरा कायम राखतील यांत शंका नाहीं. तेव्हां हा धंदा आमचा नव्हे, आपल्यांत यांतील तज्ज्ञ नाहींत या विचारानें घाबरून जाण्याचें कारण नाहीं.

राहिला प्रश्न मजूरांचा. पण हा इतका अवघड नाहीं. मात्र आमच्या तरुणांनीं अंग मेहनतीचा अलंकार, श्रमाचें लेणें ( डिग्निटी

ऑफ लेबर ) हें त्यालें पाहिजे. श्रमजीवी झाल्याशिवाय आतां भागणार नाहीं. ज्यांना शिक्षण नाहीं अगर डॉ० हूटन म्हणतात त्याप्रमाणें ज्यांना कांहींच येत नाहीं असे टाकाऊ लोक देशावरचे व कोंकणांतले आज गिरणींत कामगार आहेत. यापेक्षां आमचे ब्राह्मण तरुण कांहींसे बरे शिकले सवरलेले आहेत हें खास. तेव्हां मजूरांची अडचण नाहीं आणि जपानमध्यें जर शें० ८० गिरणी कामगार मुली आहेत व या मुली उत्तम प्रकारें विणकाम करतात; तर आम्हीं पुरुषासारखे पुरुष असून जर आम्हांला हा धंदा करतां आला नाहीं तर ब्राह्मण जात नष्ट झालेली काय वाईट ! कारण तिला मग जगण्यास पात्र असें म्हणतां येणार नाहीं. पण ब्राह्मण तरुण जपानी तरुणीपेक्षां, आपली योग्यता कमी असल्याचें कालत्रयीं दाखविणार नाहींत अशी आम्हांस उमेद वाटते; इतकेंच नव्हे, तर आमची अशी पक्की खात्रीही आहे. शिवाय निव्वळ रुपये आणे पै यांमध्यें विचार केल्यास आज गिरणी कामगार हा बी.ए.पेक्षां अधिक सुखी आहे; कारण बी.ए.ला २०।२५ रुपयांपेक्षां जास्त पगार आज कोणीं देत नाहींत; आणि इतक्या कमी पगारावर राहण्याची तयारी असूनही त्यास नोकरी मिळत नाहीं ती नाहींच. पण गिरणी कामगार रोज फक्त दोन माग चालवून दरमहा ५० रुपये मिळवितो. ब्राह्मण तरुणांनीं जपानी मुलींप्रमाणें आठ माग चालवून दाखविल्यास दरमहा १५० ते २०० रुपये त्यांना मिळण्यास कांहींच हरकत नाहीं. लो. टिळकांनीं 'जपान व हिंदुस्थान' या लेखांत म्हटलें आहेच कीं हिंदु लोक जपानी लोकांपेक्षां शरीरानें अगर बुद्धीनें कोणत्याही प्रकारें कमी नाहींत. तेव्हां ब्राह्मण तरुणांनीं २०।२५ रुपड्यांच्या श्ववृत्तीच्या नोकरीपेक्षां १५० ते २०० रुपयांचा गिरणी कामगाराचा धंदा कां करूं नये ! वरील विवेचनावरून वाचकांच्या ध्यानांत आलें असेलच कीं, ब्राह्मणांना भांडवल उभारणें अशक्य नाहीं, त्यांच्यांत विणकाम धंद्यांतील तज्ज्ञांची वाण नाहीं व कामगार सुशिक्षित लागेल तितके मिळतील आणि प्रत्येक गिरणीस साधारणपणें पंधराशेंहे मजूर लागतात. रात्रपाळी केल्यास आणखी पंधराशें मजूर कामावर लावतां येतील.

म्हणजे एकदम तीन हजार तरुणांची बेकारी एक गिरणी निवारण करूं शकेल. म्हणूनच आजच्या परिस्थितींत आम्ही हा गिरणीचा धंदा बेकारीवर एकमेव व रामबाण उपाय म्हणतों.

आतां अशी गिरणी काढतांना त्याबरोबर आणखी एक गोष्ट ब्राह्मणांनीं करावी अशी आमची सूचना आहे. ती ही. कांहीं अंशीं ब्राह्मणांची व ज्यू लोकांची स्थिति सारखी आहे. ज्यू लोकांना पृथ्वीच्या पाठीवर थारा कोठेंच मिळेनासा झाला, तेव्हां त्यांनीं आपलें म्हणतां येईल असें शहर असावें असें ठरविलें. त्याप्रमाणें निरनिराळ्या देशांत असलेल्या ज्यू लोकांनीं लहान मोठ्या रकमांनीं फंड गोळा करून 'टेल अव्हिव्ह' नांवाचें शहर जाफा बंदराचे शेजारीं पॅलेस्टाईनमध्यें वसविलें. पूर्वी जेथें अगदीं ओसाड मैदान होतें, त्या जागेवर हें शहर वसविलें आहे. १९१२ सालीं याची लोकसंख्या बारा हजार होती; ती आज पंचेचाळीस हजार झाली आहे. या शहराचे सन्माननीय नागरिक 'फ्रीडम् ऑफ सिटी' धारण करणारे प्रसिद्ध मुत्सद्दी सर हरबर्ट सॅम्युअल, लॉर्ड बालफोर, प्रोफेसर इनस्टीन व बॅरन रॉथचाइल्ड असे आहेत. शहरांत ज्यूशिवाय इतर इसम जवळ जवळ नाहींतच. हें शहर स्वयंपूर्ण आहे. पोलीस, फायर ब्रिगेड, शाळा, दवाखाने, वर्तमानपत्रें हीं सगळीं स्वतः ज्यूंचीं आहेत. आराखडा आंखून शहर वसविलें असल्यानें जगांत अत्यंत सुंदर अशा शहरांत आज हें मोडतें. पन्नास कोटी रुपये भांडवल आजपर्यंत या उद्योगांत ज्यूंनीं गुतविलें आहे. पृथ्वीच्या सर्व भागांतून या शहरांत जे ज्यू स्थायिक होण्यास येतात, त्यांच्याकरितां मुद्दाम बोर्डिंगें ठेविलीं असून त्यांना काम मिळेपर्यंत त्यांत फुकट राहतां येतें. नवीन धंदा काढण्यास त्यांना आर्थिक मदतही बँकेंतून मिळतें. पण धंदा मिळेपर्यंत ज्यूंना कायम रहिवासी म्हणून राहतां येत नाहीं. त्यामुळें बेकार हा शब्द या मोठ्या शहरास माहित नाहीं. उद्योगधंदेही आपोआप पुष्कळच या शहरांत वाढले आहेत. सिगारेट, चॉकोलेट, विणकाम, फर्निचर यांचे धंदे जोरांत चालतात. शिवाय डेअरी, शेतकी व फळफळावळीचा धंदा हे फार मोठ्या प्रमाणांत चालतात.

पड असलेली हजारों एकर जमीन लागवडीस आणली असून ओसाड मैदानांत झाडें लावून जंगल राखलें आहे. धंद्याबरोबर संस्कृती-पोषक उद्योगही ज्यूंचे सुरू आहेत. शहरांत दोन हिब्रू वर्तमानपत्रें सुरू असून दरसाल कादंबऱ्या वगैरे बरींच पुस्तकें छापून प्रसिद्ध होतात. तसेंच शाळा सोडलेल्या लोकांकरतां त्यांचें शिक्षण पुढें चालू रहावें या हेतूनें व्याख्यानें व शिक्षण वर्ग सुरू असतात. नाटक-गृहांतून नाटकें बसविणेचा उद्योग ज्यूंनीं चालू ठेविला आहे. एक भाषा, एक धर्म, एक तत्त्वज्ञान ज्यांचें आहे, असे लोक एके ठिकाणीं पाहण्याचा देखावा पृथ्वीच्या पाठीवर इतरत्र पाहण्यास न मिळणारा, असा येथें या ' टेल आव्हिव्ह ' शहरांत पहावयास मिळतो.

ब्राह्मणांनीं ज्यू लोकांचें ध्येय व उदाहरण डोळ्यांपुढें ठेवून शक्य तितका उद्योग आरंभावा आणि ' टेल अव्हिव्ह ' सारखें शहर वसवावें. या शहाराला आपण तूर्त ब्रह्मपुरी म्हणून संबोधूंया. या ब्रह्मपुरीस सुरवात ब्राह्मण-बेकारी निवारक गिरणीपासून होणेंची. गिरणींतील कामगारवर्ग व इतर मंडळी यांची वसाहत करतांना ती नगर-रचनेच्या पद्धतीनें करण्यांत यावी. हेतू हा कीं तिचा विस्तार भव्य व सुंदर नग-रींत व्हावा. सुरवातीसच उत्तम वाचनालय, लहानसें नाटकगृह व सिनेमाहौस, क्रीडांगणें व दवाखाना यांची सोय जपानी गिरणींत असते त्याप्रमाणें आमच्याही गिरणींत व्हावी. यांतूनच पुढें टेल-अव्हिव्हांतील उद्योगांप्रमाणें वर्तमानपत्रें, छापखाने, देवालयें, ब्यॉंका व इतर उद्योगधंदे निर्माण होणेचे. या ब्रह्मपुरींत ब्राह्मणांना आपल्या इच्छेप्रमाणें शिक्षणक्रम आंखतां येईल. नोकरीचें ध्येय व पदवीचा मोह हीं दोन सुटलीं म्हणजे असें करण्यास अडचण भासणार नाहीं. * जपानी युनिव्हर्सिटीप्रमाणें आपल्यास आपलें शैक्ष-णिक ध्येय ' शास्त्रीय तत्त्वें व त्यांचा उपयोग शिकविणें व नवीन संशो-धन चालू ठेवणें व त्याबरोबरच राष्ट्रीय भावना व शीलसंवर्धन

---

* The University Act of 1928 lays down that 'the object of University is to teach the principles and application of science essential to the State and to carry on their

करणें ' असें ठरवितां येईल. असें ' ब्रह्म-विद्यापीठ ' निर्माण होईपर्यंत उत्तम वाचनालयावर काम भागविणें इष्ट होईल. कारण उत्तम पुस्तकांचा सांठा हीच आजची खरी युनिव्हर्सिटी होय, असें प्रसिद्ध तत्त्ववेत्ता कार्लाईल याचें म्हणणें आहे. तें एका अंशीं खरें आहे. सर्व जातींतील गरीब लोकांकरितां मोफत दवाखाना व हॉस्पिटल चालवून परोपकारास पूर्ण वाव ठेवण्याचें धोरण ब्रह्मपुरींत राहील व राहावें; कारण भूतदया ही आपल्या उद्योगाचा पाया असली पाहिजे. अशी सर्वांग सुंदर ब्रह्मपुरी स्थापण्याचें ध्येय आम्हीं व विशेषतः आमच्यांतील तरुणांनीं डोळ्यापुढें ठेवावें. ' नोच्चार्थो विफलोपि दूषणपदम् दुष्यस्तु कामो लघुः ' हें ब्रीदवाक्य तरुणांचें असावें आणि ज्याप्रमाणें ज्यूनीं आपलें शहर स्वयंपूर्ण केलें; तेथें नानाविध उद्योग आरंभिले आणि आश्रयाचें स्थान उत्पन्न केलें; तसें ब्राह्मणांनीं करावें, अशी आमची आग्रहाची व व कळकळीची विनंती आहे. जगांत कुठेंही मार खाल्ला व संकट आलें तर ब्राह्मणांना निदान आश्रयाचें स्थान म्हणून ब्रह्मपुरीसारखें शहर असणें जरूर आहे व तसें असावें. येथें अनाथ व पोरक्ीं बालकें,विधवा व म्हातारे यांचीही व्यवस्था लागेल आणि बेकार तरुणांना काम लागेपर्यंत येथें आसरा घेतां येईल.ब्राह्मणांनीं शैक्षणिक, औद्योगिक व सांस्कृतिक उद्योग ब्रह्मपुरींत, टेल अव्हीवमध्यें जसे आहेत, तसे शक्य तितके सुरू करण्याची महत्त्वाकांक्षा बाळगिली पाहिजे.

ब्राह्मणांच्या आचारांत, विचारांत, राहणींत व संस्कृतींत जितकें म्हणून चांगलें आहे, त्याचें संरक्षण, जोपासना व वाढ होणें जरूर आहे; आणि ब्रह्मपुरीसारखी कांहीं व्यवस्था झाल्याशिवाय हें होणार नाहीं. जातिसंस्था आज अगदीं पोथीबंद वॉटर-टाईट-झाली

---

research, without neglecting the Cultivation of National Consciousness and the elevation of Personal Character.

**--From ' My impressions of Japan.'**

*( Compare with this the purely cultural and literary object of the Bombay University. )*

आहे. त्यांत लवचिकपणा नाहीं. जातिसंस्था देशाच्या उत्कर्षास कितपत उपकारक आहेत याबद्दल शंका तरुणांत उत्पन्न झाली आहे. त्यामुळें जातपात–तोडक मंडळें अस्तित्वांत येऊं लागलीं आहेत. जुन्या व नव्या नीतीचा पुरस्कार करणारांमध्यें, वर्तमानपत्रें व मासिकें यांतून झगडे सुरूं आहेत. वरील झगड्यांत ब्राह्मण जातींत जे कांहीं सद्गुण आहेत, समाजास उपकारक अशा विवाहादि संस्था आहेत, त्या नष्ट होण्याचा संभव आहे. तेव्हां " जन्मना जायते शूद्रः संस्कारात् द्विज उच्यते ।" हें तत्त्व ध्यानांत ठेवून जन्मजातीबरोबर गुणजातही ब्राह्मण तयार करूं शकतील काय, याचाही विचार झाल्यास तो उपकारच होईल. आणि ' एकवर्णमिदं पूर्वं विश्वमासीद्युधिष्ठिर । ' या दृष्टीनें रा. रा. भास्करराव जाधव एम्. एल्. सी. यांच्या इच्छेप्रमाणें सर्वांनाच ब्राह्मण होतां येईल काय हेंही पाहतां येईल, तेव्हां—

परद्रव्य आणिक कांता परावी ।
यदर्थीं स्वयें सांड जीवीं करावी ॥

इतकी मर्यादा पाळून जातिसंस्थेंत काय बदल करतां येईल, हेंही पाहण्यास कांहीं हरकत नाहीं. याचें स्थानही पण ब्रह्मपुरीच होईल. असो. हें जरासें विषयांतर आवरतें घेऊं. आतां ब्रह्मपुरीची उभारणी होण्याकरितां ठिकठिकाणीं ब्राह्मण बेकारी निवारक संघ स्थापणें जरूर आहे. अशा संघांतूनच द्रव्याची मदत झाली पाहिजे; आणि ब्रह्मपुरींत कापड वगैरे जो माल तयार होईल तो विकण्याची खटपट व सोय सदर संघांनींच केली पाहिजे. अशा सोयीचें महत्त्व काय आहे हें सोलापूर मिलचे मॅनेजर ठाकूर यांनीं सांगितलें आहेच.

आज जिकडे तिकडे इटालींत, रशियांत, अमेरिकेंत बेकारी हटविण्याकरितां प्लॅन्ड एकॉनमी व पंचवार्षिक, दशवार्षिक योजना जारी असल्याचें आपण ऐकतों. तर बारा लाख रुपये बेकारी निवारक फंड गोळा करून, त्यांतून कापडाची गिरणी काढणें; व त्याचें पुढें रूपांतर ब्रह्मपुरींत करणें हीच आज आपणां सर्व ब्राह्मणांची

द्विदशवार्षिक (वीस वर्षांची) योजना समजूंया. या मुदतींत ब्रह्मपुरी स्थापून बेकारी निवारणापलीकडे कांहीं एक उद्योग करावयाचा नाहीं असें आपण ठरवूंया. हें एक गोड स्वप्न आहे खरें; पण जर शहाजहान बादशहानें आपलें गोड स्वप्न ताजमहालांत उतरविलें व ज्यू लोकांनीं आपलें स्वप्न * 'टेल अव्हिव्ह' वसवून सत्यसृष्टींत आणिलें तर आम्हां ब्राह्मणांना तसें कां करतां येऊं नये ? विश्वास बाळगल्यास जरूर करतां येईल.

---

* जवळ जवळ 'टेल अव्हिव'सारखीच संस्था आपल्या येथें आग्र्याजवळील '**दयाळबाग**' ही आहे. येथेंही नाना तऱ्हेचे उद्योग सुरू असून, ही संस्था स्वयंपूर्ण आहे. राधास्वामी पंथाचे गुरु साहेबजी महाराज यांनीं दयाळबाग येथें वसाहत करून आपल्या पंथांतील लोकांना शिक्षण देण्याकरितां उद्योग-शाळा काढल्या आहेत. चाकू, कातऱ्या, फौन्टनपेनें, ग्रामोफोन, रेशमी व सुती कापड येथें तयार होतें. डेअरी व कातडीं कमाविणेचे कारखानेही येथें उत्तम चालविले जातात. याबाबत सविस्तर माहितीकरितां **श्रीमंत नारायणराव बाबासाहेब घोरपडे**, अधिपति इचलकरंजी, यांनीं किर्लोस्कर मासिकांत "दयाळबागवर" लिहिलेला लेख अवश्य पहावा.

---

# प्रकरण चवथें.

## उपसंहार

आतांचे ब्राह्मणीं काय केलें ।
अन्न मिळेना ऐसें जालें ॥
तुम्हा बहुतांचे प्रचितीस आलें ।
किंवा नाहीं ॥ १ ॥
बरें ऐसा प्रसंग जाला ।
जाला तो होऊन गेला ।
आतां तरी ब्राह्मणीं आपणाला ।
शाहाणे करावें ॥ २ ॥

—श्रीसमर्थ रामदास.

पहिल्या प्रकरणांत जागतिक बेकारीचीं कारणें काय व त्यांवर उपाय काय याची थोडीशी चर्चा केली. त्यांत सुचविलेले हे उपाय बहुतांशीं राज्यकर्त्यांना व स्थानिक सरकारांना अंमलांत आणतां येतील. एखाद्या व्यक्तीला, जातीला अगर समाजाला तसें करतां येणार नाहीं. तथापि कायदेमंडळांतून, वर्तमानपत्रांतून व सभा भरवून कर कमी करावेत, बेकारांना काम लावण्याकरितां, सरकारनें दुष्काळी कामांसारखीं कामें सुरू करावींत व औद्योगिक पाहणी करावी; अशाबद्दल चळवळ करतां येईल आणि कायदेमंडळांतील लोकप्रतिनिधींनीं याबाबत ठराव आणून चालना द्यावी, अशी आमची त्यांस नम्र पण आग्रहाची विनंती आहे. लोकांत जागृति करण्याकरितां अशी चळवळ सुरू होणेंहि इष्टच आहे.

दुसऱ्या प्रकरणांत हिंदुस्थानांत कोणत्या प्रकारची बेकारी आहे व तीवर उपाय काय याची चर्चा करण्यांत आली. येथें औद्योगिक युग अद्याप सुरू नसल्यानें, इतर देशांप्रमाणें कारखान्यांतील मजूरांत बेकारी नसून, ती मध्यम वर्गांतील लोकांत व सुशिक्षित वर्गांत बरीच आहे असें आपण पाहिलेंच आहे. या बेकारीचें प्रमुख कारण हल्लींची सदोष शिक्षणपद्धति हें होय, असें वाचकांना दिसून आलें आहेच. तेव्हां "मूले कुठारः" या न्यायानें ही घातुक शिक्षण-पद्धति जितक्या लवकर बदलेल तितकें बरें. पण दुर्दैवाची गोष्ट ही कीं पालकांचें व शिक्षणतज्ज्ञांचें इकडे जावें तितकें लक्ष अद्यापि जात नाहीं. आणि अमळनेर व अहमदाबादसारख्या ठिकाणीं नवीन आर्ट्स् कॉलेजें काढण्याची खटपट सुरू आहे. यावरून अजूनही हें शिक्षण अमृत नसून मदिरा आहे, हें आम्हांस उमगत नाहीं. अद्याप वारा कसा वाहतो हेंही यावरून चांगलें दिसून येतें. तेव्हां हल्लींच्या शिक्षण-पद्धतिविरुद्ध आतां बंड करण्याची पाळी आली आहे. पालक-वर्गही अत्यंत गाफील, उदास व कर्तव्यपराङ्मुख झाला आहे. आजच्या परिस्थितींत आपल्या मुलांस कोणतें शिक्षण देणें इष्ट आहे, याचा तो विचारच करीत नाहीं. शिक्षकवर्गही तितकाच दोषी आहे. मनापासून शिकविणारा शिक्षक आतां विरळा. सर्व भाडोत्री कार-भार झाला आहे. " शिष्यादिच्छेत्पराजयम् " ही भावना शिक्षकांत नाहीं. तसेंच शिक्षकाबद्दल विद्यार्थी आदर बाळगीत नाहींत. " सुखा-र्थिनः कुतो विद्या, विद्यार्थिनः कुतः सुखम् । " हें ब्रीद वाक्य ते पार विसरले आहेत. तेव्हां उभय पक्षीं ही स्थिति पालटली पाहिजे. तसेंच ' डिग्निटी ऑफ लेबर '-श्रमाचें लेणें-विद्यार्थ्यांनीं धारण केलें पाहिजे. कोणताही धंदा प्रामाणिकपणानें केल्यास त्याची योग्यता सारखीच. मग तो धंदा करणारा रस्ते झाडणारा झाडू असो अगर साम्राज्याचा मुख्य प्रधान असो; हें तत्त्व विद्यार्थ्यांच्या मनावर बिंबविलें पाहिजे. औद्योगिक पाहणी, धंद्याची वाढ वगैरे गोष्टी सरकारच्या हातांतल्या आहेत, त्याही सरकारनें केल्या पाहिजेत. नुसती शिक्षण-पद्धति

आ। ५। १३९

बदलून बेकारीस आळा बसणार नाहीं. हें आपण या प्रकरणांत पाहिलें आहेच.

तिसरे प्रकरणांत महाराष्ट्रापुरता विचार केल्यास खरी बेकारी इतर जातींत नसून ती ब्राह्मणांतच आहे, हें वाचकांना दिसून आलेंच आहे. त्याचें कारण ब्राह्मण नोकरीचे मागें लागले आणि नोकरीचें साधन म्हणून हल्लींचें दोषी शिक्षण घेऊं लागले हें होय. सगळ्यांत कोणता मोठा अपव्यय एखादा समाज अगर राष्ट्र करूं शकेल, तर तो बुद्धीचा होय असें अर्थशास्त्रज्ञ प्रो. मार्शल म्हणतात. तसा आजवर आम्ही करीत आलों आहोंत. हल्लीं मिळणारें शिक्षण अमृत नाहीं, मदिरा आहे असें लो॰ टिळक म्हणत तें खोटें कोण म्हणेल ? या शिक्षणापासून आमच्यांत 'बंधुभाव उत्पन्न होत नसून चमत्कारिक आळशी मनुष्य मात्र तयार होतो,' हा प्रि. गोळ्यांनीं काढलेला सिद्धांत आजही अगदीं बरोबर तंतोतंत लागूं आहे. तेव्हां आमच्यांतील तरुणांत या शिक्षणाबद्दल व डिग्रीबद्दल तिटकारा उत्पन्न होईल तो सुदिन ! नोकरीबद्दलही असाच तिटकारा आमच्यांत उत्पन्न होणें जरूर आहे. ही चतकोर भाकरीची गुलामगिरी पत्करून ब्राह्मणांनीं आपला पूर्ण नाश करून घेतला आहे. नोकरीस आपण श्ववृत्ति म्हणतों. पण श्ववृत्तिपेक्षांही नोकरी वाईट असें सुभाषितकार म्हणतात तें खरेंच. कारण—

सेवा श्ववृत्तिर्यैरुक्ता नतैः सम्यगुदाहृतम् ।
स्वच्छन्दचारी कुत्र श्वा, विक्रीतासुः क्व सेवकः ॥

तेव्हां डिग्री व नोकरीबद्दल खंती व तिटकारा आमच्या तरुणांनीं बाळगिला पाहिजे. याबद्दल विस्तृत चर्चा तिसऱ्या प्रकरणांत केली आहेच.

आमच्यांत पुष्कळ दोष आहेत. याचीही चर्चा या प्रकरणांत कली आहे. विशेषतः दुही, तुसडेपणा, कृतघ्नपणा, मत्सर व परोत्कर्षासहिष्णुता हे दोष आमच्यांत फार आहेत. कर्तव्यनिष्ठा (सेन्स ऑफ ड्यूटी) एकी, धाडस, महत्त्वाकांक्षा आपल्यांत नाहीं. शीलसंपदा, सद्‌गुणाची चाड व दुर्गुणाची चीड आमच्यांत नाहीं; आणि तशी उत्पन्न झाल्याशिवाय, 'दया तीचें नांव संतांचें पालन । आणिक निर्दळण कंटकांचें।'

नगर वाचनालय, सातारा.

हें तत्त्व ध्यानांत घेऊन चढाईचे सद्गुण अंगीं बाणविल्याशिवाय, जगास सुख व शांति लाभणार नाहीं. लंडनमधील हिंदी विद्यार्थ्यांच्या युनियनपुढें 'हल्लींच्या दुःस्थितीचें मूळ' या विषयावर बोलतांना सायमन कमिशनमुळें परिचित झालेले लॉर्ड लोथियन म्हणाले कीं "आर्थिक दुःखें नाहींशीं करावयाचीं असतील तर नुसते तज्ज्ञांचे देखरेखीखालीं उद्योगधंदे सुरू करून भागणार नाहीं; अगर राजकारणी पुरुषही ती नाहींशीं करूं शकणार नाहींत. तर प्रामाणिकपणा, परार्थ बुद्धि, सत्य व सुनीति ह्या साध्या घरगुती सद्गुणांचीच वाढ झाली पाहिजे. त्याशिवाय जगाची अगर आमची सुस्थिति होणार नाहीं व सुखही लाभणार नाहीं." "प्रल्हादानें इंद्रास शील (सत्यानें व धर्मानें वागण्याचा स्वभाव) हीच त्रैलोक्याचें राज्य मिळविण्याची गुरुकिल्ली असून तेंच श्रेय होय असें सांगितलें व इंद्रानें प्रल्हादाकडे त्याचें शील मागितल्यावर प्रल्हादानें तें दिलें. पण त्यामागून धर्म, सत्य, वृत्त व अखेरीस श्री किंवा ऐश्वर्य या देवता प्रल्हादाचे शरीरांतून निघून इंद्राचे शरीरांत प्रवेश करत्या झाल्या व त्यामुळें इंद्रास राज्य परत मिळालें;" अशी प्राचीन कथा सांगून लो. टिळकांनीं शीलाचें महत्त्व गीता–रहस्यांत वर्णन केलें आहे, तें आम्हीं ध्यानांत घेतलें पाहिजे. विशेषतः तरुणांनीं नवीन विचारांच्या व नव्या नीतीच्या लाटा उसळत असतांना, शीलाची कास सोडूं नये अशी आमची आग्रहाची त्यांस विनंती आहे.

"आतांचे ब्राह्मणीं काय केलें। अन्न मिळेना ऐसें झालें॥"

अशी समर्थवचनाप्रमाणें स्थिति आमची आम्हीं करून घेतली आहे. ब्राह्मण समाज नाशाच्या कडयावर उभा आहे. जर लवकर तोल सांभाळला नाहीं तर कडेलोट होऊन समाज पार नाहींसा होईल. गेलीं पांच सहाशें वर्षें व्यापाराकडे दुर्लक्ष करण्याचें पाप आम्ही करीत आलों आहोंत. त्याचें प्रायश्चित्त आज आम्हांस भोगावें लागत आहे. मागच्या पिढ्यांनीं इकडे लक्ष दिलें नाहीं; याबद्दल आम्हीं त्यांना दोषी ठरवीत आहोंत. आम्हीं कांहींच हातपाय हालविले नाहींत तर आमची गत तीच व्हावयाची. पण तेवढ्यानेंच भागणार

नाहीं, तर जातीचा संपूर्ण नाश आम्ही केला, या गुन्हेगारीचा शिक्का आमच्या कपाळावर बसल्याशिवाय राहणार नाहीं. तेव्हां एकही पळ फुकट घालविण्याची सोय नाहीं. "आतां अगर कधींही नाहीं" ( नाऊ ऑर नेव्हर ) असा मोकाच प्राप्त झाला आहे. घराला आग लागल्यावर विहीर खणण्यांत काय शहाणपण !-संदीप्ते भवने तु कूपखननं प्रत्युद्यमः कीदृशः ।-तर अगोदरच तरतूद केली पाहिजे.

ब्राह्मण जातींत अठरा विश्वें दारिद्र्य बोकाळलें आहे. गरीबी फार वाईट. जर कोणती एक गोष्ट गरिबांच्या सर्व नाशाला कारणीभूत होत असेल तर ती गरीबीच होय, असें प्रो. मार्शल म्हणतात. तें अगदीं खरें आहे. ( डिस्ट्रक्शन ऑफ दि पुअर इज देअर पॉव्हर्टी ). साधी राहणी आणि उच्च विचारसरणी ( प्लेन लिव्हिंग अँड हाय थिंकिंग ) हा उपदेश दारिद्र्यांत खितपत पडलेल्या समाजास करणें नुसतें मानभावी-पणाचें, दुःखावर डाग देण्यासारखें आहे. इंग्लंड अमेरिकेसारख्या संपन्न देशांना हा उपदेश ठीक आहे. गरीब हिंदुस्थानास त्याचा उपयोग नाहीं. स्टँडर्ड ऑफ लिव्हिंग-राहणी-उच्च दर्जाची झालीच पाहिजे. पारशी व गुजराथी समाजासारखें लाखांनीं कमावून मग हजा-रांनीं दानधर्म वगैरे करण्यास आम्ही शिकलें पाहिजे. कविवर्य टागोर म्हणतात तसें 'हें जग सत्यमय व आनंदमय 'ही आहे. सात्विक सुखाचा आस्वाद आम्हांस घेतां आला पाहिजे. तेव्हां दारिद्र्य घालविणें, बेकारी हटविणें हाच आजच्या परिस्थितींत आमचा खरा धर्म आहे. भयंकर दुष्काळ पडल्यावेळीं ज्याप्रमाणें ब्रह्मर्षि विश्वामित्रानें मांगाच्या घरची कुत्र्याच्या मांसाची तंगडी भक्षण करून, हाच या परिस्थितींत खरा धर्म आहे असें सांगितलें; त्याप्रमाणेंच आजच्या परिस्थितींत, व्यापारांत शिरून पैसा मिळविणें हाच ब्राह्मणांचा खरा धर्म होय. जीवितं मरणाच्छ्रेयो जीवन्धर्ममवाप्नुयात् । जगलों तर धर्म हेंच खरें. तेव्हां—

ब्राह्मण तितुका मेळवावा । आपुला वाणिज्य धर्म वाढवावा ।
ये विषयीं न करितां तकवा । पूर्वज हांसती ॥

हाच आमचा आजचा महाराष्ट्र धर्म व हेंच त्याचें सूत्र आणि हाच खरा

पुरुषार्थ ! तेव्हां आबाल तरुण वृद्ध ब्राह्मण स्त्री-पुरुषांनीं, या धर्माचें पालनास कंबर बांधिली पाहिजे व व्यापार आवडो अगर न आवडो त्यांत पडलेंच पाहिजे. पण " आजचा हा खरा महाराष्ट्र धर्म नव्हे; आम्ही जशी वकिली, डॉक्टरी व नोकरी करीत आलों तशीच तुम्ही करा " असा जर उपदेश कोणी वृद्ध करूं लागतील तर तिकडे तरुणांनीं लक्ष देऊं नये, असें त्यांना आमचें सांगणें आहे. कारण 'वृद्धास्ते न विचारणीयचरिताः– वृद्धांच्या कृत्यांचा फारसा विचार करूं नये हेंच खरें.

सर्वत्र निराशा पसरली आहे. तथापि आशेचे किरण तुरळक दिसत आहेत. अजूनही ब्राह्मणाजवळ थोडीबहुत बुद्धिमत्ता आहे. ब्राह्मण मूळचे गरीब असले तरी त्यांच्याजवळ अद्याप थोडी माया आहे. तेव्हां ब्राह्मण समाजांत असलेल्या सर्व शक्ति, बुद्धिमत्ता, संपत्ति, शरीर-संपदा आतां एकत्रित केंद्रीभूत केल्या पाहिजेत. सर्व साधनें एकवटलीं पाहिजेत. ( पुलिंग दि रिसोर्सीस ). जे ब्राह्मण संपत्तिमान असतील त्यांनीं आपलें द्रव्य समाजोद्धारास, पारशी, गुजराथी, लिंगायत गृहस्थांप्रमाणें, दिलें पाहिजे. पारशी, गुजराथी लोकांच्या दानधर्म संस्था–चॅरिटीज–लाखों रुपयांच्या आहेत. आपल्याकडे लिंगायतांनींही सिरसंगी ट्रस्टसारखा बराच पैसा आपल्या समाजाच्या उद्धाराकारितां दिला आहे. आमच्यांत तसा पैसा फक्त धारवाडचे रा० ब० रावजी बाळाजी करंदीकर एज्युकेशनल इनस्पेक्टर यांनीं दिला आहे. त्यांचेंच उदाहरण पुढें ठेवून आमच्यांतील निपुत्रिकांनीं निदान या मार्गानें दानधर्म केलाच पाहिजे. आमच्यांतील स्त्रियांनींही आपली " गृहरत्नानि बालकानि " हीं बेकारीच्या खाईत होरपळून द्यावयाचीं नसतील तर, दानधर्माचा ओघ बेकारी-निवारक फंडाकडे वळविला पाहिजे. चातुर्मासांतील हेंच ' व्रतानां व्रतमुत्तम् ' आहे. ' सगळी साळ्याची, अर्धी माळ्याची, धनीण तेल्याची आणि ऋणकरीण ब्राह्मणाची ' अशी म्हण आहे. इतर जातीच्या बायका नवऱ्यांना त्यांच्या व्यवसायांत मदत करतात पण ब्राह्मणाची बायको तशी करीत नाहीं. तर दागिने

फक्त हक्कानें मागून घेते असा या म्हणीचा आशय आहे. तेव्हां आमची माताभगिनींना, आयाबहिणींना विनंती ही कीं वरील आरोप थोडा फार दूर करण्याकरितां दागिन्यांचा हट्ट थोडा कमी घेऊन निदान बेकारी निवारक फंडास मदत करा. दान धर्म, 'देशे कालेच पात्रेच' याचा विचार करून, करा असें गीता सांगते. आजच्या परिस्थितींत ब्राह्मणांचें आत्मसंरक्षण हेंच आद्य व पवित्र कर्तव्य असल्यानें, ब्राह्मण बेकारी निवारक फंडाशिवाय इतरांना ब्राह्मण स्त्री पुरुषांनी बिलकुल दानधर्म करूं नये. निदान ज्यानें बेकारीस बळ चढेल अशा आर्ट्स् कॉलेजसारख्या संस्थांकडे आजवर चालत आलेल्या पैशाचा ओघ त्यांनीं थांबवावा. अमळनेर व अहमदाबाद येथें कॉलेजें कोणीं काढणार असल्यास एक पैचीही मदत त्यांस करूं नये. अपूर्व स्वार्थत्याग करून चिपळूणकर, आगरकर व टिळक यांनीं न्यू स्कूल काढलें ते दिवस आतां नाहींत. तेव्हां इंग्रजी शिक्षणाचा फैलाव करणें इष्ट वाटत होतें. आतां तशी परिस्थिति नाहीं. पण त्यावेळची स्वार्थत्यागबुद्धी कायम ठेवून दानधर्माचा ओघ आम्ही औद्योगिक संस्थांकडे वळविला पाहिजे. तात्पर्य ब्राह्मण स्त्रीपुरुषांनीं यथाशक्ति, यथामति सालाला निदान प्रत्येकीं बारा रुपये तरी, 'ब्राह्मण बेकारी निवारक फंडास' देण्याचा संकल्प सोडावा व इतरांना नकार घंटा दाखवावी.

कोणत्याही चळवळीचा व उद्योगाचा आधारस्तंभ तरुण पिढीच होय; आणि बेकारी निवारण करण्याच्या चळवळीचें यश बऱ्याच अंशीं आमच्या तरुणांवर अवलंबून राहणार हें खास. आजच्या तरुण पिढी-बद्दल आम्हांस पूर्ण आदर असून सहानभूतिही आहे; हें सांगावयास पाहिजे असें नाहीं. 'सजीवम् दहते चिंता' याप्रमाणें आपल्या जीवि-ताचें पुढें काय होणार, या काळजीनें तरुण पिढी करपून जात आहे. तथापि आजचे तरुण लोक उद्योगी असावेत तितके नाहींत असें दुःखानें म्हणावें लागतें. कष्ट सोसण्याची तयारी त्यांची नसते. थोड-क्याच श्रमांत चैन करतां यावी एवढेंच ध्येय तरुणांचें असतें. तेव्हां "कष्टेंविण राज्य नाहीं, कष्टेंविण फळ नाहीं" हें तरुण पिढीनें लक्षांत

घ्यावें. आज आम्ही सर्वच एक प्रकारें दानवी वंशाचे आळशी झालों आहोंत. कारण समर्थ म्हणतात " साक्षेपी अंश देवाचे । आळशी वंश दानवी ॥ " तेव्हां आपण सर्व साक्षेपी होऊन देवाचे अंश झालें पाहिजे.

परिस्थिति बिकट आहे खास. कारण परप्रांतियांनीं व्यापार आक्रमिलेला आहे. तथापि गांगरून जाण्याचें कारण नाहीं; व कसें होईल म्हणून रडत बसण्यांत हशील नाहीं. आपलें नशीब आपल्या हातांत आहे कारण—

लोके गुरुत्वं विपरीततां वा । स्वचेष्टितान्येव नरं नयंति ॥

असा सिद्धांत आहे. * आपल्या जुलिअस सीझर नाटकांत शेक्सपिअर म्हणतो कीं, " केव्हां ना केव्हां तरी पुरुष हा आपल्या नशिबाचा धनी असतो आणि आपण जर पददलित, हाताखालचे बगले झालों असलों तर त्याचा दोष आपल्या ग्रहाकडे नसून आपल्याकडे आहे. " आज आपण आर्थिक गुलाम होण्याच्या बेतांत आहोंत, पण अजून झालों नाहींत. मारवाडी, गुजराथी, पारशी हे लोक वेळींच सावध झाले, म्हणूनच सुखांत आहेत, आणि त्यांच्यांत अंबालाल साराभाई, विठ्ठलदास ठाकरसी, पुरुषोत्तमदास ठाकूरदास, माधवलाल चुनीलाल, वाडिया, टाटा, कावसजी जहांगीर, पेटीट, जमनालाल बजाज, घनःशाम बिर्ला-सारखे कोट्याधीश आहेत आणि आपण मात्र भिक्षाधीश आहोंत. इ० स० १८२७ सालीं प्रथम परदेशी गिरणीचें कापड हिंदुस्थानांत आलें; आणि १८५१ सालीं पहिल्या हिंदी गिरणीची योजना सी. एन. दावर या पारशी गृहस्थानें आंखली आणि १८५३ मध्यें ही गिरणी सुरू झाली. तसें आम्हीही तेव्हां करतों तर आज भुके कंगाल कां होतों ? असो ! अजूनही पन्नास कोटी रुपयांचें कापड परदेशांतून येत आहे आणि हें पन्नास कोटी रुपयांचें **आर्थिक स्वराज्य** हस्तगत

---

* Men at some times are masters of their " fates ";
The fault, dear Brutus, is not in our stars,
But in our-selves, that we are underlings ;
— **Julius Caesar.**

करण्याची सुवर्ण संधी ब्राह्मण तरुणांना आज लाभली आहे. पण ही दवडल्यास पुन्हां कधींही येणार नाहीं; व पुढील सर्व पिढ्यांना आर्थिक गुलामगिरींत खितपत पडावें लागेल आणि याबद्दल भावी पिढ्यांचे शाप आजच्या तरुणांना घ्यावे लागतील. * दारिद्र्याचा नाश करणें ही एक प्रबल व उदात्त मनोवृत्ति असल्याचें अमेरिकेचे माजी प्रेसिडेंट हूव्हर सांगतात. तेव्हां ही उदात्त मनोवृत्ति तरुणांनीं धारण केली पाहिजे. **एकवेळ राजकीय स्वातंत्र्य लवकर मिळेल; पण आर्थिक स्वातंत्र्य तसें मिळणार नाहीं !** तेव्हां 'दलित देवोभव' हा उपदेश हृदयांत साठवून व वीरवृत्ति धारण करून ब्राह्मण तरुणांनीं आजच कामास लागलें पाहिजे. मग यश मिळणार हें खास. कारण आमची मागील परंपराच इतकी उज्ज्वल आहे. ज्यांची भूतकाळची परंपरा उज्ज्वल असते त्यांचा भविष्यकाळही तितकाच उज्ज्वल होतो असें इतिहासशास्त्रच सांगतें.

आजवर ब्राह्मणांनीं आपलें बुद्धिवैभव तत्त्वज्ञान व तरवार या दोन शास्त्रांत पूर्णपणें दाखवून त्यांत अग्रस्थान पटकावलें आहे. श्रीज्ञानेश्वर, एकनाथ, रामदास व लो. टिळक एवढींच नांवें आमची तत्त्वज्ञानांतील पारंगतता दाखविण्यास पुरेशीं आहेत. याच ब्राह्मण जातींतून वीर व मुत्सद्दी भट पेशवे, पटवर्धन, पुरंदरे, फडके, पेठे, मेहेंदळे, घोरपडे, बुंदेले, फडणीस, प्रतिनिधी विंचूरकर, गोखले वगैरे पुरुष पेशवाईचा अंत होईपर्यंत निर्माण झाले असून, तरवार शास्त्रांतील अग्रस्थान त्यांनीं पटकावलें होतें. नुसते पुरुषच नव्हे तर स्त्रियांनींही आपली योग्यता पूर्णपणें दाखविली होती. मुक्ताबाई, बेणाबाई व बहिणाबाई या स्त्रिया तत्त्वज्ञानांत पूर्ण अधिकारी होत्या, हें संत-लीलामृत सांगतें. पेशव्यांच्या स्त्रिया राधाबाई, पार्वतीबाई व

---

* One of the oldest and perhaps the noblest of human aspirations has been the abolition of poverty.

—**Herbert Hoover**
Ex-President, U. S. A.

आनंदीबाई, अनुबाई घोरपडे व झांशीवाली लक्ष्मीबाई या सर्वच स्त्रिया वीर मुत्सद्दी होत्या, हें इतिहासच सांगतो. श्रीशिवरायांनीं स्थापलेल्या स्वराज्याचें साम्राज्य करून दिल्लीपदाला हात घालणारा नरवीर पहिला बाजीराव, हा ब्राह्मणच होता. भीमथडीचीं घोडीं अटकेपार नाचवून अहमदशहा अबदालीस जरब बसविणारा समशेरबहाद्दर राघो भरारी, हा ब्राह्मणच होता. इ० स० १८५७ सालीं इंग्रज लोकांना अतुल पराक्रम दाखवून व बऱ्याच जणांस आपल्या समशेरीचें पाणी पाजून आश्चर्यानें तोंडांत बोट घालण्यास लावणारी संग्रामदेवता प्रसिद्ध झांशीची राणी लक्ष्मीबाई व तात्या टोपे, हे ब्राह्मणच होते. इतके पारंगत समशेरीच्या शास्त्रांत तेव्हां ब्राह्मण होते. आज तरवारी म्यान करण्याचा प्रसंग आला हा प्रश्न निराळा. पण ज्या जातींतील वीर पुरुषांनीं इतकी प्रखर बुद्धिमत्ता तत्त्वज्ञान व तरवार या दोन शास्त्रांत दाखविली; त्याच जातींतील आजचे स्त्रीपुरुष तागडी तुकाप्पाच्या शास्त्रांत म्हणजे व्यापारांत आपली प्रखर बुद्धिमत्ता दाखविणार नाहींत काय? अलबत दाखवितील. एवढेंच शास्त्र आजवर आम्हीं आत्मसात् केलें नाहीं. पण एकदां यांत पडलों कीं त्यांतील अग्रस्थान पटकाविल्याशिवाय कधींही राहणार नाहीं. आणि हें अग्रस्थान पटकावूंच अशी महत्त्वाकांक्षा ब्राह्मण तरुणांनीं बाळगिली पाहिजे. कारण अपयशाची मातब्बरी नाहीं. पण हीन आकांक्षा हा गुन्हा होय. (नॉट फेल्युअर बट लो एम इज क्राइम् ) तेव्हां आज आम्हीं,

अग्रतश्चतुरो वेदान् सदंडां पृष्ठस्तुलाम् ।
इदं ब्राह्ममिदं वैश्यं शापेन तुलयाऽपिवा ॥ १ ॥

असें सुसज्ज झालें पाहिजे. आमचे ब्राह्मण बटु असे होतीलच होतील.

बेकारीचा भस्मासुर सारखा थैमान करीत आहे. त्याच्या धिंगाण्यामुळें रामदासांच्या या 'आनंदवनभुवनाचें, 'दुःखभुवन झालें आहे. लढाईच्या वेळीं ज्याप्रमाणें सर्व शक्ति एकवटून शत्रूवर चाल केली जाते तसें या असुरावर आपण चाल करून जाऊंया. ब्राह्मणांच्या बुद्धीला, उद्योगाला व धडाडीला हें एक प्रकारें आव्हानच (चॅलेंज) आहे. यावेळीं 'डर तो पीछे रही,' असें मनास सांगून हें

आव्हान स्वीकारलें पाहिजे. या भस्मासुराला गाडावयाचें असेल तर विष्णूची मोहिनीच पाहिजे. ती म्हणजे कापडाची गिरणी होय. या प्रसंगीं भोळ्या शंकराचा चरखा उपयोगी नाहीं. कापडाच्या धंद्यांत पूर्वी या महाराष्ट्राला, हिंदुस्थानाला, जें स्थान प्राप्त झालें होतें, तें आज जपान व मँचेस्टर यांनीं पटकाविलेलें आहे. तें पुन्हां पटकाविण्याची, महाराष्ट्राचें मँचेस्टर बनविण्याची महत्वाकांक्षा ब्राह्मण तरुणांनीं बाळगली पाहिजे. हा उद्योग त्यांच्या बुद्धिमत्तेस पुरेसा नाहीं काय? तेव्हां तागडी तुकाप्पा होऊन महा_ राष्ट्राचें मँचेस्टर बनविण्याचे उद्योगास–' ब्राह्मण तरुणांनो ' लागा व एक मिनीटसुद्धां फुकट घालवूं नका. बेकारी ही पूतना मावशी आहे. ही तुमचा जीव घेण्यास आली आहे. पण ' पूतना हरिवधार्थमाययौ। प्राप तत्र वधमेव ह्यात्मनः ' अशी बेकारीची स्थिति ' तरुणांनो ' तुम्ही करणार नाहीं काय? ' निश्चयाचें बळ ' पाहिजे, म्हणजे खात्रीनें कराल. ' सत्य संकल्पाचा दाता भगवान् ' सर्व मनोरथ पूर्ण केल्याशिवाय राहणार नाहीं. तेव्हां ' एकमेकां सहाय करून हा सुपंथ धरूं या. आणि आजच हा निश्चय करूंया कीं, वीस वर्षांचे आंत या महाराष्ट्राचें पुन्हां आनंदवनभुवन करूंच करूं. उद्योगाला हात आतांच घालूंया. मग—

बुडाली नोकरी पापी। बेकारी संहार जाहला॥
मोडलीं मांडलीं छत्रें। आनंदवनभुवनीं॥

असा जयघोष करण्याचा सुदिन लवकरच प्राप्त होईल हें खास. तेव्हां ' शुभस्य शीघ्रम् ' या न्यायानें या उद्योगाला लागण्याची सुबुद्धि सर्व ब्राह्मणांना होवो अशी बुद्धिदात्या श्रीगजाननाचे चरणीं आमची अंतःकरणपूर्वक प्रार्थना आहे. सरते शेवटीं या पुस्तकांत कांहीं कमी अधिक झालें असल्यास वाचकांनीं सुधारून घ्यावें असें त्यांस खालील मंत्रानें विनवून हें बेकारीचें विवरण येथें पुरें करतों—

समानी व आकूतिः समाना हृदयानि वः।
समानमस्तु वो मनो यथा वः सुसहासति॥

" तुमचा अभिप्राय एकसारखा व तुमचीं अंतःकरणें एकसारखीं, व तुमचें मन एकसारखें असो. जेणें करून तुमचे सुसहाय म्हणजे संघशक्तिची बळकटी होईल. "

दा. नं. ........
ता. नं. ........

# परिशिष्ट प्रकरण.

## (१) ब्राह्मण स्त्रिया आणि बेकारी:—

इंग्रजी अंमल सुरू झाल्यावर कांहीं दिवसांतच ज्याप्रमाणें ब्राह्मण मुलांनीं इंग्रजी शिक्षण घेण्यांत आघाडी मारली, त्याप्रमाणेंच ब्राह्मणांच्या मुलींनींही इतर जातींच्या मुलींपेक्षां हें शिक्षण घेण्यास अगोदर सुरवात केली. गेल्या खानेसुमारींत ही गोष्ट प्रामुख्यानें निदर्शनास आली आहे. आमच्या मुलांच्या मनावर जशी डिग्रीची मोहिनी पडली आहे तशीच मुलींच्या मनावरही तिची पक्कड विलक्षण आहे. प्रो० कर्वे यांनीं स्थापिलेल्या नाथीबाई महिला युनिव्हर्सिटीचा अभ्यासक्रम, मुंबई युनिव्हार्सिटीपेक्षां सरस व स्त्री–जीवनास उपयुक्त असा आहे. पण दुःखाची गोष्ट ही कीं, त्या विद्यापीठांत विद्यार्थिनींची संख्या नेहमींच बेताची असते. पण मुंबई विद्यापीठास जोडलेल्या कॉलेजांतून मात्र दिवसेंदिवस विद्यार्थिनींची गर्दी होत चालली आहे. आपल्या नांवापुढें पदवीचीं दोन अक्षरें असावींत असें, ब्राह्मण तरुणांसारखेंच, ब्राह्मण तरुणींना फार वाटतें. त्यामुळें आय्. सी. एस. वर मिळेल, निदान मिळावा, अशीही त्यांची प्रछन्न इच्छा असते. ज्ञानाकरितां ज्ञान या भावनेनें शिकणाऱ्या मुली विरळाच.

हल्लीं मिळत असलेलें शिक्षण त्याज्य व टाकाऊ असून मुलांची शारीरिक, मानसिक व आर्थिक उन्नति त्यानें बिलकूल होत नाहीं; उलट हानीच होते असें आतां ठाम ठरलें आहे. तथापि याच कुशिक्षणाचे मागें मुलींच्या मनानें धांव घ्यावी हें दुर्दैव नाहीं काय? हल्लीं समान हक्काचें युग आहे हें आम्ही जाणून आहोंत. परंतु पुरुषांच्या वाईट

गोष्टींत समान हक्क कशाला? म्हणूनच असलें 'टाकाऊ पुरुषी शिक्षण आपल्या मुलींना देण्यांत शहाणपण कोणतें?' असा सवाल पदवीदान-समारंभाच्या आपल्या भाषणांत मद्रास हायकोर्टचे माजी चीफ जस्टिस सर सी. व्ही. कुमारस्वामी शास्त्री यांनीं म्हैसूर युनिव्हर्सिटीच्या विद्यार्थ्यांना केला तो यथायोग्यच नाहीं काय?

आधुनिक स्त्रियांत आर्थिक स्वातंत्र्याची लालसा उत्पन्न झाली असून पुरुषांचे अंकित राहूं नये, लग्नाचे भानगडींत पडूं नये, असेंहि त्यांना वाटूं लागलें आहे. ही गोष्ट साधण्याकरितां आमच्या तरुण मुली पुरुषी शिक्षण घेऊं लागल्या आहेत. हेतु हा कीं पुरुषांप्रमाणें आपण नोकरीस लायख होऊन, आर्थिक स्वातंत्र्य संपादन करावें. पण याचा परिणाम मात्र विपरीत होत आहे. खुद्द अशा स्त्रियांतच बेकारी वाढत आहे. याबाबत त्रावणकोर संस्थानचा बेकारीवरील रिपोर्ट ( पान १७ ) पहा. दुसरें असें कीं पुरुषांच्या नोकऱ्या या स्त्रिया पटकावूं लागल्यामुळें पुरुषांतील बेकारींत भरच पडत आहे. खरें पाहूं गेलें तर स्त्रियांच्या उद्योगाचें क्षेत्र म्हणजे घरच होय; आणि घरांतील सर्व मंडळींचें—लहान थोरांचें—जीवन जेणेंकरून सुखकर करण्याची पात्रता अंगीं येईल असेंच शिक्षण स्त्रियांनीं घ्यावें हेंच उचित. हें लिहिणें बऱ्याच स्त्रियांना पसंत पडणार नाहीं, हें आम्ही जाणून आहों. तथापि वरीलप्रमाणेंच कानडाचे सुप्रसिद्ध विनोदी लेखक प्रो. लिकॉक यांनीं आपल्या 'इंग्लंडावरील स्वारी' या पुस्तकांत स्त्रियांनीं बॅरिस्टर प्रोफेसर न होतां, नर्सिंग, डोमेस्टिक सायन्स—गृहव्यवस्था शास्त्र—यांचा अभ्यास करावा असें विनोदप्रचुर भाषेत प्रतिपादन केलें आहे. असाच उपदेश सांगलीच्या श्री. स. सौ. राणीसाहेबांनीं नुकताच महिला परिषदेंत केला, हेंही ध्यानांत ठेवावें. शिवाय जर्मनीचे नेते हिटलर यांनीं परवां राष्ट्रीय स्त्रियांच्या मेळाव्यापुढें भाषण केलें, त्यांत स्त्रियांचें विश्व पुरुषांच्या विश्वापेक्षां लहान असून, तें विश्व नवरा, कुटुंब व घरें यांनीं बनलेलें असतें, आणि स्त्रियांचा कार्यक्रम ( प्रोग्रॅम ) म्हणजे शिशुसंवर्धन हा एकच असें प्रतिपादिलें. लेफ्टनंट कर्नल सर हसन सुऱ्हावर्दी ( माजी व्हाईस चॅन्सलर कलकत्ता युनिव्हर्सिटी )

यांनीं म्हैसूर विद्यापीठाच्या पदवीदान समारंभाचे प्रसंगीं नुकतेंच भाषण केलें, त्यांत पाश्चिमात्त्य देशांतील बेकारीचें कांहींसें कारण स्त्रियांनीं पुरुषांचे धंदे उचलले हें असून तीच चूक आमच्या स्त्रियांनीं करूं नये असा इषारा दिला. आणि "घर हेंच स्त्रियांच्या कर्तव्याचें क्षेत्र". असें सांगितलें. हेंही विचारांत घ्यावें अशी भगिनीवर्गास आमची विंनती आहे. "आर्थिक स्वातंत्र्य व ती मिळवून देणारी नोकरी हीं दुरून जितकीं गोंडस व आकर्षक दिसतात तितकीं तीं असत नाहींत व नोकरीच्या धकाधकीच्या मामल्यांत स्त्रियांना बराच मारा सोसावा लागतो. प्रथम जरी नोकरी व काम करणें हें त्याच्या नाविन्यामुळें गोड वाटलें तरी कांहीं दिवसांनीं तें जीवन निर्जीव वाटूं लागतें. घरांतील वडीलधाऱ्या माणसांची, पतीची व मुलांची सेवाशुश्रूषा करतांना वाटत असलेली ताबेदारी किंवा गुलामगिरी पतकरली असें वाटूं लागतें. कारण तसल्या त्या गुलामगिरीच्या उन्हाळ्यांतही मधून मधून तरी प्रेमाचे, वात्सल्याचे, आपलेपणाचे व स्नेहाचे शीतल वारे मिळून शीण दूर होतो. पण नोकरींत नोकरांच्या वैयक्तिक सुखसोयींची, भावनांची, विचारांची, व सानथोरपणाची वेळोवेळीं इतकी पायमल्ली केली जाते कीं, आर्थिक स्वातंत्र्यासाठीं कराव्या लागणाऱ्या या रुक्ष नोकऱ्यांत प्रेमाचा किंवा स्नेहाचा जरासाुद्धां आसरा मिळत नाहीं. पण हा अनुभव व हें शहाणपण येईपर्यंत या स्त्रीचें वय बरेंच प्रौढ झालेलें असतें व तिच्या पसंतीचा वर मिळणें कठीण होतें." असा इषारा सुप्रसिद्ध विदुषी सौ. सरलाबाई नाईक एम्. ए. यांनीं "आधुनिक स्त्रिया" या लेखांत दिला आहे; तो स्त्रीमासिकाच्या ताज्या दिवाळीच्या अंकांत आमच्या तरुण भगिनींनीं पहावा अशी आग्रहाची विनंती आहे. आणि मगच आपलें कार्यक्षेत्र ठरवावें. 'जिच्या हातीं पाळण्याची दोरी ती जग उद्धारी' हें तत्त्व खरें आहे. अपवादात्मक कांहीं स्त्रिय अविवाहित राहिल्यास प्रश्न निराळा. तेव्हां विनंती इतकीच कीं पुरुषी धंद्यांत शिरून आपल्या बंधूंच्या बेकारींत सुशिक्षित भगिनींनीं भर टाकण्याचें पाप हल्लींच्या परिस्थितींत तरी करूं नये.

(२) पारशी व बेकारी–

पारशी समाज हा लोकसंख्येनें कोंकणस्थ ब्राह्मणांच्या इतका म्हणजे एकलक्ष तीस हजार आहे. हा समाज व्यापारप्रिय असून फार श्रीमान आहे. या समाजाइतका दानधर्म (चॅरिटी) फारच थोड्या इतर समाजांनीं केला आहे. जमशेटजी टाटा, वाडिया, बोमनजी वगैरे दानशूर लोकांनीं लाखो रुपये जातबांधवांच्या उद्धाराकरितां दिले आहेत. नुकतीच या जातीची पाहणी मार्कहॅम यानें केली. त्यानें केलेल्या सूचना अमलांत आणण्याकरितां, लेडी नवजीबाई रतनटाटा, मिसेस हेमाबाई मेथा, मि. जहांगीर मेथा व मि. इराणी यांनीं आपल्या सह्यांनीं एक विनंतीपत्रक आपल्या जातीस सादर केलें असून; त्यांत पुढील गोष्टींचा उहापोह केला आहे. (१) आज बाराशेंहे पारशी कुटुंबें मुंबईंत फक्त एकाच खोलींत आपला गुजारा करीत आहेत. बरींच कुटुंबें एकच वेळ जेवून उपासमारीनें दिवस कंठीत आहेत; (२) तिसऱ्या प्रतीच्या बुद्धिमत्तेचे पदवीधर दरसाल बाहेर पडत असून मद्रासी पदवीधरांनीं नोकऱ्या व्यापल्यामुळें बेकार रहात आहेत; (३) मुलीं-करितां योग्य अशा शिक्षणाच्या अभावीं मुली मुलांच्या कॉलेजांतून पुरुषी शिक्षण घेत आहेत व त्यामुळें भावी जीवनक्रमांत मुली निरुपयोगी (मिसफिट्स) ठरत आहेत. वरील दोष व आपत्ति नाहींशी करण्याकरितां समाजानें खालील गोष्टी कराव्यात; (१) वाडिया बंधूंनीं मध्यम वर्गास राहण्याकरितां धर्मार्थ इमारती बांधून दिल्या तशा अगदीं गरीब लोकांकरितां बांधाव्यात. (२) एक वेळ जेवून उपास-मारीनें राहणाऱ्याकरितां हुन्नर शाळा पारशी पंचायतींनीं काढाव्यात व त्यांत सदर इसमांना कामास लावून पोटभर अन्न मिळेल अशी मजूरी त्यांना देणेंत यावी. (३) सर रतनटाटा इंडस्ट्रिअल होममध्यें आणखी बेकार स्त्रिया व मुली घेण्याची सोय करण्यांत यावी. (४) तैलबुद्धीच्या हुषार विद्यार्थ्यांनाच फक्त कॉलेजचें शिक्षण घेण्यास समाजानें मदत करावी. इतर दुय्यम तिय्यम प्रतीच्या बुद्धिमत्तेच्या मुलांना मध्यवर्ती औद्योगिक शाळेंत घालण्यांत यावें. अशी शाळा पुण्यासारख्या मध्यवर्ती

ठिकाणीं सुरू करावी. (५) गुजराथेंतील पारशांकरितां, डेन्मार्कमधील शेतकी शाळेप्रमाणें, शाळा काढण्यांत येऊन खेडवळांचा शहराकडे धांवणारा ओघ थांबवावा. (६) शीलसंवर्धन व गृहव्यवस्थाशास्त्र (डोमेस्टिक् सायन्स) ज्यांत शिकविलें जाईल व स्त्रीजीवनास उपयुक्त शिक्षण जेथें मिळेल अशी शाळा मुलींच्याकरितां काढण्यांत यावी.

वरील उपाय, जो समाज इंग्रजांचें अनुकरण करण्यांत व समाज-सुधारणेंत आज अग्रेसर आहे अशा पारशी समाजांतील पुढारी व जबाबदार स्त्रीपुरुषांनीं सुचवले आहेत. यावरून योग्य तो बोध घ्यावा. आर. एच. पटूक नांवच्या एका दानशूर पारशी गृहस्थानें कांहीं लाख रुपये देऊन मुंबईपासून २० मैलांवर कांदिवली येथें मॉडर्न इंडस्ट्रिअल होम अँड स्कूल नांवाची संस्था काढली आहे. कारकुनी पेशाचें नव्हे तर फक्त औद्योगिक शिक्षण देण्याचें ध्येय सदर संस्थेचें आहे.

**(३) थोर व विद्वान लोकांचे त्यांच्याच शब्दांत बेकारी आणि प्रचलित शिक्षण यावरील अभिप्राय:—**

"हल्लीं शिक्षण म्हणजे एक प्रकारचा चाकरी करून भाकरी मिळविण्याचा धंदा झाला आहे ! हें शिक्षण नव्हे, हमाली आहे; व त्यापासून राष्ट्राचा उत्कर्ष न होतां उलट अवनति होण्याचा संभव आहे.

"उपासमार टाळायची असल्यास, आपल्या पोराबाळांच्या पोटाची तजवीज करावयाची असल्यास, झीज सोसून स्वदेशी चळवळ यशस्वी करण्याच्या मार्गास लागलें पाहिजे."

—लो० टिळक.

"विश्वविद्यालयीन पदव्या घेण्यांत तुम्ही भूषण मानतां हें आश्चर्य आहे. व्यावहारिक धंद्याकडे आपलें लक्ष कां जात नाहीं ? हिंदुस्थानांत मी पुष्कळ बॅरिस्टर, डॉक्टर पाहतों पण कारखाने व गिरण्या चालविण्याचें शिक्षण घेतलेला अगर इंजिनियर, भूगर्भशास्त्र-वत्ता, धातुशास्त्रज्ञ कोणी दिसत नाहीं. पुष्कळ एल्एल्. बी आहेत, पण सुशिक्षितांत साखरेचा अगर कागदाचा कारखानदार दिसत नाहीं. आज खरी गरज शास्त्रांच्या व धंदेशिक्षणाच्या अभ्यासाची आहे.

पण त्याची सोय कोठेंच दिसत नाहीं. डिंक, वाक, गळिताचीं धान्यें वगैरे कच्चया मालांचा पक्का माल बनवून उद्योगधंदे वाढविण्याचें कोणी मनांत आणीत नाहींत. त्यांना नोकरी पाहिजे आहे हें विचित्र आहे. ”

—सुप्रसिद्ध थिऑसॉफिस्ट, कर्नल आलकॉट.

“ सन १९२९–३० सालांत परदेशांतून पुढील किंमतीच्या वस्तु हिंदुस्थानांत आल्या——

| रुपये कोटी किंमतीचे | | रुपये कोटी किंमतींचे | |
|---|---|---|---|
| ६३ | कापड सूत वगैरे | १॥। | साबण |
| १६ | साखर | १। | मीठ |
| ५॥ | अन्नसामुग्री ( प्रोव्हिजन्स ) | १ | स्टेशनरी |
| ५॥ | धान्य, डाळी वगैरे | १ | सुवासिक तेलें वगैरे |
| ५ | लोखंडी सामान | १ | बायकांचें कापड (मिलिनरी) |
| ४॥ | रेशीम व रेशमी सामान | रुपये लक्ष किंमतीचे | |
| ४॥ | लोकर व लोकरीचा माल | ८८ | बूट, शूज |
| ३॥। | दारू | ७३ | टॉयलेट (साबणे व अत्तरे वगैरे ) |
| ३॥। | कागद व कागदीबोर्ड | | |
| ३॥ | रबरी सामान | ६५ | खेळणीं |
| ३। | सुपारी वगैरे | ४४ | छत्र्या |
| ३॥। | केमिकल्स | ४२ | चाकू कात्र्या इ. |
| २॥। | तमाखू (विशेषतः सिगारेट) | २३ | छोटीं मोठीं घड्याळें |
| २। | कांच सामान | | |

वरील आंकड्यावरून संसारांत लागणाऱ्या नित्याच्या वस्तूंसाठीं आपण प्रतिवर्षी सुमारें २५० कोटी रुपये परदेशीं पाठवितों व त्याचा परिणाम देश परमावधीचा दारिद्र्यग्रस्त झाला आहे हें होय. हिंदी माणसाची सांपत्तिक स्थिति परदेशीयांशीं तुलना केल्यास पुढील-प्रमाणें आहे:——

| दर माणशीं रोजचें उत्पन्न | रु. आ. पै |
|---|---|
| हिंदुस्थान | ०—२—६ |
| जर्मनी | २—०—० |
| इंग्लंड | २—१—४ |
| अमेरिका (सं. संस्थानें) | ३—०—० |

ही स्थिति पालटण्याला एकच उपाय म्हणजे स्वदेशी व्रताचा स्वीकार हा आहे." (–केसरीवरून)

"बेकारी घालवावयाची असेल तर सुशिक्षितांनीं आतां लाज सोडली पाहिजे. लाजेची व पेजेची गांठ कधींच पडणार नाहीं."

**—डॉ० परुळेकर एम्. ए. पी. एच. डी., सं. सकाळ.**

"प्रत्येक तरुण महाराष्ट्रियाच्या अंगीं नोकरी मिळवण्याची हांव जी दिसून येते ती आपल्या आर्थिक उन्नतीला विघातक आहे. महाराष्ट्रियास व्यापारी वृत्ति झेपेल कीं नाहीं हा संशयवाद त्यांनीं टाकलाच पाहिजे. आपली प्रचलित शिक्षणपद्धति अशी आहे कीं तीमध्यें आपणांस आवश्यक अशा गुणांचा परिपोष होण्यास अवसरच नाहीं."

**—(अर्थशास्त्रज्ञ) प्रो. वामन गोविंद काळे, एम्. ए.**

"युरोपची वारी याचा अर्थ दहा पंधरा हजार रुपये घालविणें एवढाच. पाश्चात्य विश्वविद्यालयांत पदव्या मिळवणें फार सोपें असून परीक्षांना किंमतही बेताचीच असते. खरी किंमत आहे, उद्योगधंदा चालविण्याच्या दृष्टीनें प्रत्यक्ष अनुभवाला. आपल्या शिक्षणाचें सध्याचें स्वरूप पार बदलून शिक्षणांत आरोग्यसंपादन, बुद्धिविकास व शीलसंवर्धन यांचा अंतर्भाव करावा लागेल."

**—प्रि. रा. प. सबनीस एम्. ए. (केंब्रीज)**

" जो समाज परदेशी वस्तू वापरतो तो आळसाचे पायीं परावलंबी व गुलाम होतो. "

—डॉ० खैर एम. ए., पी. एच्. डी. **अनाथ विद्यार्थीगृह, नाशिक.**

" एखादा सुखवस्तु गृहस्थ आपण पाहिल्यास तो काय धंदा करीत आहे असें न विचारतां, नोकरी कोठें आहे असें विचारतों. म्हणजे महाराष्ट्रियांच्या आशेची मजल सेवावृत्तिपर्यंतच जाते. ही सेवेची मन:प्रवृत्ति बदलली पाहिजे. महाराष्ट्रीयांचें शिक्षण बघितलें तर त्याचें ध्येय नोकरीच असतें; पण नोकरीमागें न लागतां नाना उद्योग सुरू करून, कच्या मालाचा पक्का माल येथेंच बनवून त्याचा व्यापारही आपल्याच हातांत ठेविला तरच महाराष्ट्रीयांचा तरणोपाय आहे. "

**--प्रि० लिमये एम्. ए., विलिंग्डन कॉलेज, सांगली.**

---

" For myself I have used only one big book. For myself I have had only one great Teacher. The book is life lived. The teacher is day-by-day experience. "

**—Benito Mussolini.**

" I believe University life does more harm than good to most men. "

**—Ramsay MacDonald**

" I am thankful to have had twentyfive years of the great University of Public Life. "

**—Lord Haldane**

" A University degree is rather a disqualification and a handicap in the way of success in life, so far as trade and business are concerned. When one considers the great captains of industry, one has to confess that most of them have not been University men, but mostly men, who have risen from the ranks by sheer hard work, coupled with a

peculiar sense, which, for want of a better term, we can call the Money-Making Sense."

—**Gilbert Brandon.**

"The present educational system has too much to do with books and too little with things. And it is not so much in the interest of industry as in that of the breadth of culture that I echo the common complaint, against the bookish and theoretical character of our primary education. And, it is almost a crime that the use of the eye and the hand should not be taught to the mass of the population. Everybody must be taught Drawing and elementary notions of Natural Science and use of simple tools. Technical education has become a necessity for two reasons namely (1) The guild system has vanished and partly there is no trade secret as such (2) The memory loaded with mere book-work is worse, useless for scientific subjects."

—**T. H. Huxlay** ( *From Evolution and Ethics* )

"I have come from a distant country that showed the danger of allowing clericalism to be the guiding motive of the Educational life of a great country. Half of the appalling condition in India is due to the wrong aims of education and the idea that the examinations are the be-all and the end-all of teaching. The real difficulty in India is the unemployed intelligencia striving after the Government service and only few able to find it".

—**Lord Burnham,**
*Member of the Simon Commission.*

"High School students and College Graduates do not see the dignity of hand labour, without which no Nation can rise out of its poverty. A large number of these

graduates are unemployed. Education is not well related to the lives of the pupils or their environment ".

—Dr. Hatch,

*Author of 'Up from Poverty.'*

" India needs Industrial prosperity and the foundation for that must form part of education. There is a difficulty here that does not exist abroad to the same extent–the looking on manual work as degrading. The son of an English Nobleman who wishes to be an Engineer, is turned into a Blacksmith's shop to wield the hammer, to weld the iron. This is how England and Germany have gained their position in the world of Industry. India needs fewer clerks, much fewer lawyers, fewer doctors, and more agriculturists, engineers, mineralogists, electricians, chemists. National education should aim at diminishing the supply of the other. In view of the special and immediate necessity for Industrial progress, special stress should be laid at first on the commercial, trade and agricultural side of education. Such an education is a crying need in the Country ".

—**Dr. Annie Besant.**

" The other class which deserves your special attention is the educated middle class. Hundreds, nay thousands of young men find themselves today without adequate opportunity for occupation and it is little to be wondered at that. Some of them afford a fruitful tool for those whose culture takes the form of direct action of a revolutionary character. I therefore suggest to you as employers and particularly to those who are British, that it is of the utmost importance to provide what opportunities you can for the employment of young Indians. That is the remedy for terrorism ".

—**H. E. the Viceroy, Lord Willingdon.**

" Are we not now coming round to the view that our present system of training, the somewhat narrow, uniform,

literary training, that is given in our schools is responsible in some measure at least for the accumulation of our present economic and social difficulties—the widespread unemployment, the distress of the lower middle classes, the failure to create and take advantage of new avenues of honourable industry and business ? Many boys come to school and go on to College because they cannot find anything else to do; but when they pass out of School and college, they are little better off and have the added grievance of an education that proves disappointing and deceptive. "

**—H. E. Sir John Anderson**
*( Governor of Bengal )*

" We have not as yet fully realised the soul destroying effect of cramming for examinations. We must encourage our students to rise above the fetish of examinations. A very exaggerated value is often attached to the mere possession of a degree. The wastage in the present University course is phenominal; and smaller is the number of degree-holders who obtain suitable employment. The provision of vocational training appears to me to be one of the proper methods to solve this problem. Remember that there is nothing undignified or discreditable about working with your hands and that the true value of University training lies in making you a better worker, whatever line you take up, even if it be the humblest. At a time like this, education has to be more than academic"

**—Sir Fredrick Sykes,**
*Ex-Governor, Bombay.*

" I think that all are beginning to realize that perhaps the best method of meeting the problem of unemployment among the educated classes, as shown by the number of arts graduates who are unable to obtain a livelihood, is to revise our ideas of the ideals of high school education, and the

most promising line in this respect is that boys—I have no doubt this equally applies to girls—should be able to specialise at an early stage of their educational career in the forms of education which will be of more practical use in after life."

—**H. E. Lord Brabourne.**

*( Governor of Bombay )*

" One of the chief causes of unemployment in India is the lack of application of science to agriculture and Industry. Universities produce men who are incapable of being absorbed by the services and when their ambitions are not fulfilled, they are tempted into paths which are a danger to the state. University Graduates have thus become a difficult social problem. While other Countries of the World are steadily pursuing a policy of progressive industrialization I regret, that no such change is visible in India which is purely an agricultural country. It is the duty of the leaders of the People to induce Government to adopt a bold system of planned economy as in Fascist Italy or Soviet Russia. The ruin of the middle classes and the degradations of the proletariat into a pauper Rabble has before now destroyed great Nations. It will not do in these troublous times to play for safety, demand secure careers and look out for soft options."

—**Sir Radhakrishnan**

*( Vice Chancellor, Andhra University )*

" What is the value of education if it does not fit pupils for their different avocations in life? However much we may ridicule 'the bread and butter' view of education, it is really its bread and butter, the ability it gives us to earn out living, that matters in actual life.

"Our graduates and Matriculates find it extremely difficult to find suitable employment. The Philippines have given the vocational bent to their system of education. May we not do the same?"

**K. S. Vakil, M. Ed; F. R. C. S; I. E. S.**

*Principal Shri Tarabai B. T. College, Kolhapur.*

" A Revolutionary recasting of the educational organization is called for, with a strong vocational bias at an appropriate stage. The first defect is the enormous wastage practically at all stages and the other, the unfortunate unemployment of the successful output. It is significant that whereas in other countries the problem of unemployment takes the form of lack of work for the artisan class and manual labourers generally, with us it is a case of ' middle class unemployment.

"To cure this there is only one solution namely that the Universities should themselves provide Post-Secondary Vocational Courses on successful completion of which, Diplomas will be given".

**—N. S. Subba Rao**

*Director of Public Instruction, Mysore.*

" I am not tired of reiterating that Politics are only an avenue and a means for securing our economic and social regeneration. Our first and paramount duty should be to stop the economic rot that has set in. This economic crisis is scarcely less grave than that occassioned by the great war. If India is economically ruined, what kind of Swaraj can we build on the economic ruin of the country?"

**--H. H. The Aga Khan.**

" The acute unemployment problem in India is not receiving as much attention as it deserved, from Government and Politicians."

**—The Hon. Mr. Shriniwas Shastri. P. C.**

"There is no better Teacher than Nature. Study for the examination, is not the end of life. Use the book of Nature first hand".

—**Sir C. V. Raman,**

*Principal, Tata Research Institute, Bangalore.*

"This inordinate, insane craze-almost a mania for securing a degree-has been working infinite mischief. It has become a canker eating into the vitals of intellectual life and progress. The young man turned out by the University training, betrays, as a rule, lamentable lack of initiative resourcefulness and pluck, when he is thrown upon the world and has to fight his way through it. The average graduate is found to be a licensed ignoramus. I do not hesitate to say, that the degree only serves as a cloak to hide the degree-holder's ignorance. He knows little and cares to know less beyond the irreducible minimum required for passing the examinations. Even the holders of the Premchand Scholarship have sunk into oblivion. It is the steady life long devotion to a Subject or cause which counts."

—**Sir P. C. Ray**

( *Bengali Scientist.* )

" What good does it do to the Nation, to Society and to India at large to produce year in and year out these fine cultured gentlemen, who after they have left the portals of the University wake to the reality of the situation to find that the call of hunger is more insistent than the call of culture—I feel that generally speaking the interests of our Country will be better served if we lay greater emphasis on and make better provision for practical scientific education, which will enable us to stand the stress of modern competitive life—Why should we fight shy of vocational educa-

tion ? as something to be dispised and unworthy of ourselves ? It is not desirable that our Universities should allow themselves to be used as factories for manufacturing candidates for Deputy Collectorships and Munsiffships not all of whom can fulfil their ambitions—The University, the Government and the Indian Society must all combine to attack the problem. It is necessary to provide more vocational schools for the vast majority of our young men, in whose case the earning of a livelihood is a necessity and the pursuit of culture at the University a luxury, and thus save that wastage of our youth, which to my mind is one of the most alarming signs of the times. What is wanted is action—Rooseveltian action, on the part of the Government–an action based on a well-thought out plan, aiming at the opening of new avenues of work for the youth, who are the output of the entire educational machinery."

**—Sir Tej Bahadur Sapru.**

"There is great need in this country for technical and vocational education. The Universities are turning out hundreds of graduates, who are struggling for existance".

**—Sir Chimanlal Setalwad,**
*Ex-Vice Chancellor, Bombay University.*

"The present system of education, obtaining in India has been very defective. If the present unemployment problem is to be solved, the people of India should be given Industrial and Technical educaton".

**—Pandit Madan Mohan Malviya,**
*Vice Chancellor, Benares Hindu University.*

"The tragedy of our Indian Education is that we produce graduates for whom there is nothing to do.

**—Sir C. P. Ramaswami Iyer**
*Ex-Executive Councillor, Madras.*